# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१३/ २०१६** **दिनांक १९.०९.२०१६**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक १९.०९.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २९८०/ २०१६, दिनांक १० सप्टेंबर, २०१६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दिनांक १९.०९.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य
०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०६. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०७. मा.सौ. अनिताताई विजयराव जगताप, सदस्य

मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली. सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.ॲड मोहन मोतीराम जयकर- सदस्य, श्री.मा.डॉ.राजेंद्र राजाबली सिंग- सदस्य, मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी दूरध्वनीवरुन तसेच, मा.डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे- सदस्या व मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी फॅक्स पत्राद्वारे कळविले होते. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २२.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६३८** दिनांक २२.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्री साईनाथ रुग्णालयातील आय.सी.सी.यु. विभागातील Adult Ventilator बायबॅक करुन नवीन मशिन खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील आय.सी.सी.यु. विभागात अत्यवस्थ रुग्ण दाखल झालेले असतात. त्यांचे उपचारासाठी Ventilator ची आवश्यकता असते. सध्या आय.सी.सी.यु. विभागात सन २००० या वर्षात Siemens कंपनीचे एक व Drager कंपनीचे एक असे एकुण दोन Ventilator मशिन आहेत. त्यापैकी Siemens कंपनीचे Ventilator हे वारंवार बंद पडते तसेच Siemens कंपनीने देखील त्याचे उत्पादन बंद केलेले आहे. त्यामुळे त्याचे स्पेअर्स पार्टस बाजारात उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे आय.सी.सी.यु. विभागाने दि.२९/०६/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये एक नग नविन Ventilator मशिन मागणी केलेली आहे.

जुन्या Siemens कंपनीचे मशिनची किंमत रु.७,४६,४५०/- इतकी होती, सध्या सदर मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.२५,०४६/- इतकी आहे.

सदरहू Ventilator खरेदीकामी M/s. Inter Medics, Mumbai यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दरपत्रकानुसार नविन Ventilator मशिन खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Adult Ventilator | 1 | 1250000.00 | 1250000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **1250000.00** |

त्यानुसार दि.१२/०६/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.५२० अन्वये Adult Ventilator मशिन विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या पुर्णांकिंत रक्कम रु.१२,५०,०००/- (अक्षरी रु. बारा लाख पन्नास हजार मात्र) चे खर्चास व जुने Adult Ventilator Machine बायबॅक करणेस तसेच सदरचे खरेदीकामी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेस व मा.खंडपीठाने सुचविलेप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता मिळालेली आहे.

वरील ठरावास अनुसरुन दि.०३/०७/२०१४ रोजीचे पत्रान्वये विधी विभागास Adult Ventilator Machine खरेदीकामी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी कळविण्यात आलेले होते. त्यानुसार सिव्हील अर्ज क्र.६८४६ दि.१७/०७/२०१५ अन्वये सदरचे खरेदीस खंडपीठाची मान्यता मिळालेली आहे.

मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयानुसार व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार सदरचे खरेदीकामी दैनिक दबंग दुनिया– मुंबई, पुण्यनगरी– नाशिक, सामना- पुणे, सामना– औरंगाबाद, संध्यानंद– मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 29/01/2016 |
| 2 | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | 29/01/2016 |
| 3 | M/s. Excel Corporation, Nashik | 29/01/2016 |
| 4 | M/s. Aditi Enterprises, Nashik | 30/01/2016 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेली ०४ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यावर संबंधित वापर करणा-या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली असून त्यांनी मशिनचा Demo मिळणेबाबतची शिफारस केलेली आहे. परंतु वरील प्राप्त निविदाधारकांपैकी M/s. Excel Corporation, Nashik यांनी मशिनचा Online Technical Complinace दिलेला नाही, त्यामुळे त्यांची निविदा अपात्र होत आहे.

उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या ०३ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | **११,८०,०००/-** |
| २ | M/s. Austin Health Care, Pune | १४,२०,०००/- |
| ३ | M/s. Aditi Enterprises, Nashik | ११,८७,६६३/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील आय.सी.सी.यु. विभागातील Adult Ventilator मशिन बायबॅक करुन नवीन मशिन खरेदीकामी M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांचे रु.११,८०,०००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांनी दिलेल्या दरामध्ये आणखी सवलत मिळणेकरीता त्यांना पुढील स्थानिक उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०२ **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- I विभागासाठी Single Chamber Temporary Pacemaker खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I विभागाने दि.०५/०५/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०४/०६/२०१४) तीन नग Single Chamber Temporary Pacemaker ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे २ नग Single Chamber Temporary Pacemaker Set आहे. सदर Pacemaker सन २००९ मध्ये खरेदी केलेले आहे. परंतु सदर वॉर्डमध्ये सर्वच २० खाटांवर रुग्ण दाखल असतात. तसेच Emergency Condition मध्ये कधी-कधी उपलब्ध पेसमेकर दुस-या पेशंटला लावलेले असल्यामुळे

एखादे पेशंटला पेसमेकर लावणे गरजेचे असल्यास तो उपलब्ध नसतो. सध्या CRU I या विभागात २० बेडची संख्या असुन दोन Pacemaker आहेत. त्यामुळे CRU I विभागाने ०३ नग Single Chamber Temporary Pacemaker ची मागणी केलेली आहे.

सदरचे खरेदीकामी M/s. Seva Medical Equipment Pvt. Ltd., Pune यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रकाची ई-मेलद्वारे मागणी करण्यात आली होती. त्यांनी दि.०४/०८/२०१४ चे ई-मेल पत्रान्वये १ नग Single Chamber Temporary Pacemaker करिता प्रति नग १,०५,०००/- इतका खर्च कळविलेला आहे. तेव्हा उपरोक्त ३ नगांसाठी अंदाजे रक्कम रु.३,१५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Particulars | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | SINGAL CHAMBER TEMPORARY PACEMAKER | 03 | 1,05,000.00 | 3,15,000.00 |
| | **Total Amt in Rs.** | | | **3,15,000.00** |

दि.25/09/2014 निर्णय क्र.868 अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत ०३ नग Single Chamber Temporary Pacemaker विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.३,१५,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात आपला वार्ताहर मुंबई, पुढारी– पुणे, दिव्य मराठी- नाशिक, जयहिंद मास्क कम्यूनिकेशन– अहमदाबाद, हितवाद– नागपूर या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०४ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.०२/०२/२०१५ ते १८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 19/02/2015 |

उपरोक्त प्रमाणे सदरचे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झालेली असुन खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे पुन्हा सदरचे खरेदीकामी दि.२३/०३/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन फेर ई- निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार निविदा विक्रीचा कालावधी दि.०५/१०/२०१५ ते २४/१०/२०१५ अखेर ठेवण्यात आला होता, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२६/१०/२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन एकच निविदा प्राप्त झालेली आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 26/10/2015 |

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी दुस-यांदा फेर ई निविदेस अनुसरुन देखील एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.२४/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये सदरचे खरेदीकामी पुन्हा दैनिक सामना– औरंगाबाद, गावकरी– नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.१५/०२/२०१६ ते ०५/०३/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०१ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 08 /03/2016 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी तिस-यांदा वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेली ०१ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेली असून तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यावर संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे ०१ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे सभेपुढे संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडून मिळण्यास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I विभागासाठी Single Chamber Temporary Pacemaker खरेदीकामी तिसऱ्या वेळेस ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. परंतु तिनही वेळेस M/s. Austin Health Care, Pune यांची एकच निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, याकामी नव्याने ई-निविदा मागविणेसाठी देशपातळीवरील विविध वर्तमानपत्रामध्ये फेरजाहिरात प्रसिध्द करणेत यावी, अशी या उपसमितीने शिफारस केलेली होती. परंतु Single Chamber Temporary Pacemaker खरेदीकामी देशपाळीवरील वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करावयाची झाल्यास त्यास जास्त प्रमाणात खर्च येईल, याकरीता सदरहू खरेदीकामी विविध कंपन्यांना दर देणेसाठी आवाहन करणेत यावे अथवा देणगी स्वरुपात स्विकारणेसाठी संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०३ **श्री साईभक्तांना पुस्तके/ फोटो देणेसाठी नॉनवूल पिशव्या तयार करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या तांत्रीक व ई-निविदा उघडून पात्र निविदाधारकांचा तक्ता तयार करणेबाबत.**

**अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं. ठ. मध्ये खालील तरतुद आहे. "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्तावः-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०६.२०१५ निर्णय क्र. १६२ अन्वये श्री साईभक्तांना पुस्तके/ फोटो देणेसाठी नॉनवूल पिशव्या तयार करणेकामी रुपये. ३,५०,०००/- पिशवीधारकांकडून दरपत्रके मागविणेस मान्यता मिळालेली आहे.

प्रकाशने विभाग दि. १५.१२.२०१५ चा मंजूर प्रस्तावानुसार नॉनवूल पिशवी तयार करणेकामी खालील तपशिलाप्रमाणे जाहिरात देऊन ई निविदा मागविण्यात आलेले आहे.

१) दि. २१.०१.२०१६ ते दि. ३०.०१.२०१६ अखेर ०१निविदा प्राप्त झाल्याने फेर ई निविदा मागविणेकामी मान्यता घेण्यात आलेली आहे. (प्रकाशने मंजूर प्रस्ताव दि. १५.१२.२०१५)

२) दि. १०.०३.२०१६ ते दि. १९.०३.२१६ अखेर ०१निविदा प्राप्त झाल्याने फेर ई निविदा मागविणेकामी मान्यता घेण्यात आलेली आहे. (प्रकाशने मंजूर प्रस्ताव दि. १५.०२.२०१६)

३) दि. ०९.०४.२०१६ ते दि. १६.०४.२१६ अखेर ०१ निविदा प्राप्त झाली होती.

प्राप्त ०१ निविदा तांत्रिक व दरपत्रके मा. उपसमितीचे सभा दि. १३.०५.२०१६ रोजी उघडण्यात येऊन रु. ५.८५/- दर देऊ केल्याने निर्णय क्र. ३०७ नुसार श्री साईभक्तांना पुस्तके/फोटो देणेसाठी नॉनवूल पिशव्या तयार करुन घेणेकामी प्राप्त झालेले दर रु.५.८५/- अंदाजीत खर्चापेक्षा खुपच जास्त असल्यामुळे सदरहुकामी जाहिरात देण्यात येऊन फेर ई- निविदा मागिवण्यात याव्यात असा निर्णय झालेला आहे.

४) सदर निर्णयास अधीन राहून दि. २०.०६.२०१६ ते १०.०७.२०१६ अखेर फेर ई निविदा मागविण्यात आलेली आहे. त्यास ०४ निविदाकार यांनी निविदा भरलेली असून त्यांचा तपशिल खालील प्रमाणे. (प्रकाशने मंजूर प्रस्ताव दि.१८.०५.२०१६)

| अ.नं. | सिलबंद दरपत्रकांचा तपशिल | आवक क्र. |
|---|---|---|
| ०१ | शिवम एंटरप्रायजेस, नाशिक | ६३८२/ दि. १२.०७.२०१६ |
| ०२ | क्लासिक स्टेशनरी कंपनी, मुंबई | ६५१०/ दि. १३.०७.२०१६ |
| ०३ | मित्तल स्टेशनरी& प्रिंटर्स, मुंबई | ६५११/ दि. १३.०७.२०१६ |
| ०४ | सुर्या स्टेशनरी& झेरॉक्स, मुंबई | ६५१२/ दि. १३.०७.२०१६ |

विभागाची मागणीः- श्री साईभक्तांना पुस्तके/ फोटो देणेसाठी नॉनवूल पिशव्या तयार करुन घेणेकामी तांत्रिक निविदांचे सिलबंद पाकीटे व ई निविदा (Technical Bid) उघडून पात्र निविदाधारकांचा तक्ता तयार करणेकामी सदर विषय उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांना पुस्तके/ फोटो देणेसाठी आवश्यक असलेल्या नॉनवूल पिशव्या खरेदीकामी यापुर्वी उघडणेत आलेल्या निविदांमध्ये खुपच जास्त दर प्राप्त झालेले होते. तसेच या पिशव्या संस्थान प्रकाशने खेरदी करणाऱ्या साईभक्तांना विनामुल्य पुरवावयाच्या आहेत, त्यामुळे प्रकाशने विभागासाठी व इतरत्रही वापरणेसाठी सदरहू नॉनवूल पिशव्या देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारणेत याव्यात. यासाठी संस्थानचे अधिकृत संकेस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी व त्या पिशव्यांवर देणगीदार साईभक्तांच्या व्यवसायाची जाहिरात छापणेसाठी परवानगी देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

०४ **फायर विभागाकरीता फायर सल्लागार (कन्सल्टंट) नेमणूक करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद -** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व पशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमूद आहे.

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मंदिर व परिसराचे ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाकरीता फायर सल्लागार (कंन्सल्टंट) नेमणुक करणेकामी मा.व्य.समितीचे दि.०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.२४ व निर्णय क्रमांक २४ नुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली आहे.यापुर्वी दोन वेळेस ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती परंतु सदर ई-निविदा प्रकियेमध्ये कमीत कमी तीन निविदाधारकांनी निविदा भरलेली नसल्यामुळे तिस-यांदा ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. सदर प्रक्रिये मार्फत मागविणेत आलेल्या ऑनलाईन/ प्राप्त लिफाफ्यातील तांत्रिक बाबीची पडताळणी करणेकामी दि.१४.०७.२०१६ रोजी सकाळी ११.०० संस्थानचे अतिथीगृह येथील सभागृहात मा.प्र.अ.सो, लेखाशाखा विभागाचे कर्मचारी, फायर विभागाचे श्री गंगावणे सो, ई.डी.पी. विभाग तसेच ध्वनीक्षेपण विभागाचे यांचे उपस्थितीत खालील निविदाधारंकाचे मागविलेल्या तांत्रिक बाबीची तपासणी संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत करणेत आली आहे. सदर सल्लागार नेमणुक करणेकामी खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्याचा सविस्तर तपशिल खालिल प्रमाणे आहे.

| अ. नं | निविदा धारकांचे नाव | Tender fee dd 10,000/- | Licenced agency from director Maharashtra services act 2006 & rule 2009 | Technical form 1 to 8 | Service tax certificate | Pan card | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | A | B | C | D | E | |
| ०१ | **ग्राफीक इंन्फ्रास्ट्रकचर प्रा.लि. औरंगाबाद** | √ | √ सदरचे लायसन्सची मुदत दि.०८.०५.२०१६ पर्यत आहे.परंतु सदर निविदा धारकाने महाराष्ट्र राज्य अग्निशमन मुंबई यांचेकडे **RENEWAL** करीता पाठविलेबाबत पत्र स्कॅन केलेल आहे. | √ | √ | √ | **पात्र** |
| ०२ | **ग्लोटेक फायर इंजि.पुणे** | √ | √ | √ | √ | √ | **पात्र** |
| ०३ | **स्टारटेक इंजि.मुंबई** | √ | √ | √ | √ | √ | सदर निविदाधारकाने हॉडकॉफीव्दारे सर्व कागदपत्राची पुर्तता केलेली आहे परंतु ऑनलाईन निविदा न भरल्यामुळे सदरची निविदा अपात्र ठरविण्यात आलेली आहे. **अपात्र** |
| ०४ | **ओम साई सिव्हील कॉन्ट्रक्टर पनवेल** | X | X | X | X | √ | सदर निविदाधारकाने कागदपत्राची पुर्तता केलेली नाही तसेच हार्ड कॉफी प्राप्त नसल्यामुळे सदरची निविदा अपात्र ठरवण्यात आलेली आहे.**अपात्र** |

**मागणी–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मंदिर व परिसराचे ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाकरीता फायर सल्लागार (कंन्सल्टंट ) नेमणुक करणेकामी उपरोक्त निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्यापैकी अ.नं. ०३ यांनी ऑनलाईन निविदा भरलेली नाही. तसेच व अ.नं०४ यांची हार्डकॉफी प्राप्त नसल्यामुळे दोनही निविदा अपात्र होत असून उर्वरीत ०२ पात्र ई-निविदाधारकांचे दरपत्रके उघडून न्युनतम दरधारकास सल्लागार म्हणुन नेमणुक करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** संस्थान मार्फत प्रसिध्द केलेल्या ऑनलाईन निविदेमध्ये उपरोक्त A,B,C,D व E बाबींची मागणी करणेत आलेली होती. परंतु टेक्नीकल बीड मध्ये अ.नं.०३ यांनी ऑनलाईन निविदा भरलेली नसल्यामुळे व अ.नं.०४ यांची कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्यामुळे त्यांची ई-निविदा कमर्शिअल बीड साठी अपात्र होणेस तसेच पात्र अ.नं.०१ व ०२ निविदाधारकांच्या प्राप्त कमर्शियल निविदा उघडणेस मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर विभागाकरीता फायर सल्लागार (कन्सल्टंट) नेमणूक करणेकामी फक्त दोनच ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे सदरहू निविदा प्रकिया रद्द करणेत येऊन, याकामी नव्याने ई-निविदा मागविणेसाठी विस्तृत प्रमाणात फेरजाहिरात देण्यात येऊन नामांकित फायर सल्लागाराची नेमणूक करणेत यावी, जेणेकरुन नवीन प्रस्तावित दर्शनलाईन साठीही त्यांची सेवा उपयोगात येईल, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

०५ **साईटेक प्रकल्पाचे System Audit या प्रकल्पातंर्गत अकाऊंट विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ईआरपी कार्यप्रणाली Migration Audit करणेकामी पात्र निविदाधारकांच्या व्यावसायिक निवीदा उघडून त्यातील न्युनतम दरधारक निविदाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** ८३५/ दि. १९/११/२०११

**प्रास्ताविक :** साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींचे System Audit व लेखाशाखा विभागातील ERP कार्यप्रणालीचे System Audit व Migration Audit करणेकामी संस्थानचे प्रचिलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून न्युनतम दरधारकास कार्यादेश देण्याच्या व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००/- मात्र खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २३४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

विषयांकीत प्रकरणी ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. निविदेत दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे, दि. २५/०७/२०१६ रोजी उपरोक्त संदर्भ क्रं. ३ चे परिपत्रकान्वये अतिथीगृहातील सभागृहामध्ये ई-निविदेअंतर्गत प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा उघडणेकामी बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीस प्रशासकीय अधिकारी, लेखाशाखेचे प्रतिनीधी, आयटी विभाग व श्री.रतिश तावडे CISA (Certified Information System Auditor) हे उपस्थित होते. ई-निविदेअंतर्गत पुढील ५ निविदाधारकांनी त्यांच्या निविदा अपलोड केलेल्या आहेत.

१. K.K. Chanani & Associates, Kolkata
२. Suma Soft Pvt.Ltd., Pune
३. AAA Technologies Private Ltd., Mumbai
४. R S P H & Associates, Nashik
५. Digital Age Strategies Pvt. Ltd. Bangalore

उपरोक्तपैकी Digital Age Strategies Pvt. Ltd. Bangalore या निविदाधारकाची तांत्रिक निविदेची लिखीत प्रत (हार्ड कॉपी) दि. २५/०७/२०१६ रोजी इनवर्ड नं. ७४३२ अन्वये, दि. २६/०७/२०१६ रोजी इकडील विभागास प्राप्त झालेली आहे. तांत्रिक निविदेची लिखित प्रत बंद पाकीटामध्ये जमा करण्याची अंतिम दि. २३/०७/२०१६ हि होती, सबब दि. २३/०७/२०१६ अखेर प्राप्त झालेल्या उपरोक्त अ.क्रं. १ ते ४ च्या तांत्रिक निविदा वेळापत्रकानुसार दि. २५/०७/२०१६ रोजी उपरोक्त अधिका-यांच्या उपस्थितीत उघडण्यात आलेल्या आहेत. तसेच Digital Age Strategies Pvt. Ltd. Bangalore यांनी त्यांची ई-निविदा वेळेत अपलोड केलेली असल्याने, ई-निविदा प्रक्रियेत अधिक निविदाधारकांचा समावेश केल्यास निकोप स्पर्धा होईल

यादृष्टीने मा.प्रशासकीय अधिकारी, श्री औटी सो. यांचे परवानगीने त्यांचेसमोर Digital Age Strategies Pvt. Ltd. Bangalore यांची तांत्रिक दि २८/०७/२०१६ रोजी उघडण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे उघडण्यात आलेल्या तांत्रिक निविदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे

| Sr. No. | Bidder's Name | Ann.–A (6.1 & 6.2) | DD (20,000/- & 500/-) | Experience & Customer List | It Returns | Audited Balance Sheet |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | K.K. Chanani & Associates, Kolkata | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| 02. | Suma Soft Pvt. Ltd., Pune | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| 03. | AAA Technologies Private Ltd., Mumbai | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| 04. | R S P H & Associates | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| 05. | Digital Age Strategies Pvt.Ltd., Bangalore | Yes | Yes | Yes | Yes | Yes |

उपरोक्त ई-निविदेतील सर्व माहिती तपासली असता, अ.क्रं. ०४, R S P H & Associates यांनी त्यांचेकडे सदरकामी उपलब्ध करावयाच्या तांत्रिक मनुष्यबळाचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही.

**मागणी:** उपरोक्त नमूद केलेप्रमाणे Information System Audit of Applications and Migration Audit of ERP implemented under SaiTech Project साठी पात्र निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडून त्यातील न्युनतम दरधारक निविदाधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, असी नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान:** आर्थिक, तांत्रिक.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** उपरोक्त नमूद केलेप्रमाणे Information System Audit of Applications and Migration Audit of ERP implemented under SaiTech Project साठी पात्र निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडून त्यातील न्युनतम दरधारक निविदाधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाचे System Audit या प्रकल्पातंर्गत अकाऊंट विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ईआरपी कार्यप्रणाली Migration Audit करणेकामी पात्र निविदाधारकांच्या व्यावसायिक निवीदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेस मान्यता देण्यात आली व या उघडणेत आलेल्या व्यावसायिक निविदांमधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, तो पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच या सभेमध्ये आय.टी. विभागाचे तांत्रिक सल्लागार श्री.रतिश तावडे, मुंबई व श्री.विजय नायडू, कोपरगाव यांनाही आमंत्रित करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**०६ आरोग्य विभागाकरीता हॅण्डवॉश (लिक्वीडसोप) खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडणेबाबत.**

आरोग्य विभागातील सफाई कर्मचा-यासाठी ड्रेस चेंजिंग रुममध्ये लॉकर्स, खोबरेलतेल व हॅन्डवॉश खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,५९,६००/- (अक्षरी रु. सहा लाख एकोणसाठ हजार सहाशे) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३४९ नुसार मान्यता मिळालेली होती. त्यापैकी लॉकर्स खरेदीकामी रक्कम रुपये ३,०६,९००/- मात्रचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तसेच पॅराशुट खोबरेलतेल खरेदीकामी रक्कम रुपये ६३,८४०/- मात्रचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. उर्वरीत रक्कम रु. २,८८,८६०/- शिल्लक आहे. हॅन्डवॉशचे खरेदीसाठी रक्कम रु.७२,०००/- ची तरतूद केलेली आहे.

आरोग्य विभागाकरीता आवश्यक हॅन्डवॉश (लिक्वीडसोप) खरेदीकामी दि.१८.०६.२०१६ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी-आरोग्य/१९११/२०१६ दि.१९.०७.२०१६ नुसार तिस-यांदा दि.०४.०८.२०१६ पर्यंत फेर कोटेशन मागणी करण्यात आलेले होते. तसेच संस्थानचे संकेत स्थळावरही

सदरचे कोटेशन मागणी फॉर्म प्रसिध्द करण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन मुदतीअखेर ०४ दरपत्रकांची बंद पाकिटे प्राप्त झालेली आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे–

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | आवक नंबर/दिनांक | पाकिट |
|---|---|---|---|
| १. | मे.बाफना जनरल स्टोअर्स, शिर्डी | ७२९७/२३.०७.२०१६ | बंद पाकिट |
| २. | मे.श्री.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | ७६५६/२८.०७.२०१६ | बंद पाकिट |
| ३. | मे.साई प्रॉडक्टस्, कोपरगाव | ७६५७/२८.०७.२०१६ | बंद पाकिट |
| ४. | मे.युनियन ट्रेडींग, नाशिक | ७७९४/०१.०८.२०१६ | बंद पाकिट |

आरोग्य विभागाकरीता हॅन्डवॉश (लिक्वीडसोप) खरेदीकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नाव | दरपत्रकामधील मुळ दर (प्रती ८०० मिली पाऊच) व्हॅटसह रु. |
|---|---|---|
| १ | मे.बाफना जनरल स्टोअर्स, शिर्डी | **१४३/-** |
| २ | मे.श्री.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | १५६/- |
| ३ | मे.साई प्रॉडक्टस्, कोपरगाव | १६०/- |
| ४ | मे.युनियन ट्रेडींग, नाशिक | १७३/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागाकरीता हॅण्डवॉश (लिक्वीडसोप) खरेदी करणेकामी मे.बाफना जनरल स्टोअर्स, शिर्डी यांचे प्रती ८०० मिली पाऊचसाठी व्हॅटसह रु.१४३/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०७ **संस्थानचे विविध विभागांना झेरॉक्स पेपर रिम खरेदीकामी प्राप्त ई-निविदेचे Commercial Bid उघडणेबाबत.**

संस्थानचे विविध विभागांना झेरॉक्स पेपर रिम खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.११.०७.२०१६ ते दि.२०.०७.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. तांत्रीक निविदा (Technical Bid) स्विकारणेचा कालावधी दि.२१.०७.२०१६ ते दि.२२.०७.२०१६ असा ठेवण्यात आलेला होता. निविदा जाहिरातीमध्ये तांत्रिक निविदा उघडणेची तारीख दि.२३.०७.२०१६ अशी नमुद करण्यात आलेली होती.

तथापि झेरॉक्स पेपर रिम खरेदीसाठी मुदतीअंती दि.२०.०७.२०१६ अखेर सायंकाळी ५ वाजेपर्यंत फक्त एकच ई-निविदा प्राप्त झालेली होती. शासनाचे कार्यालयीन खरेदीसाठीचे कार्यपध्दतीचे नियमावलीमधील नियम क्र.४.४.३.१ मधील तरतुदीनुसार प्रथम एक आठवडयाची म्हणजेच दि.२८.०७.२०१६ पर्यंत मा. प्रशासकीय अधिकारी यांचे पुर्व मान्यतेने ऑनलाईन मुदतवाढ देण्यात आलेली होती. दि. २८.०७.२०१६ रोजी निविदेची ऑनलाईन मुदत संपल्यानंतर सदर खरेदीसाठी किती निविदा प्राप्त झाल्या याबाबत ज्यु.इ.डी.पी.मॅनेजर श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेकडून माहिती घेतली असता, त्यांनी याकामी चार निविदा प्राप्त झाल्याचे सांगितले. सदर मुदतवाढ देताना तांत्रिक निविदा उघडणेची तारीख दिनांक ०१.०८.२०१६ रोजी सकाळी ११.०० वा. दिलेली होती.

सदर प्राप्त चार ई-निविदांचे Technical Bid दिनांक ०१.०८.२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात आलेले आहेत. यामध्ये खालीलप्रमाणे चार निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. मे.क्लासिक स्टेशनर्स कंपनी, मुंबई

२. मे.सुर्या स्टेशनरी अॅण्ड झेरॉक्स, मुंबई

३. मे.अॅस्पायर टेक्नोबीड, पुणे

४. मे.विजय इलेक्ट्रिकल्स, औरंगाबाद/राजेश मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद.

वरील पैकी अ.क्र.१ ते ३ निविदा पात्र ठरल्या आहेत तर अ.क्रं.४ ची निविदा अपात्र ठरली आहे.

झेरॉक्स पेपर रीम खरेदीकामी वरीलप्रमाणे अ.क्र. १ ते ३ या तांत्रीक दृष्ट्या पात्र ठरलेल्या ई-निविदेतील निविदाधारकांचे Commercial Bid आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील एकत्रित दर रु. | |
|---|---|---|---|
| | | १००० रिम (Foolscape) | २५००० रिम (A4 size) |
| १ | मे.क्लासिक स्टेशनर्स कंपनी, मुंबई | २,३५,०००/- | ४,६०,०००/- |
| २ | मे.सुर्या स्टेशनरी अॅण्ड झेरॉक्स, मुंबई | २,५०,०००/- | ४,८७,५००/- |
| ३ | मे.अॅस्पायर टेक्नोबीड, पुणे | **<u>२,१४,७००/-</u>** | **<u>४,५८,७५०/-</u>** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागांच्या झेरॉक्स कामासाठी आवश्यक असलेले फुलस्केप व A4 साईजचे झेरॉक्स पेपर रिम खरेदीकामी मे.अॅस्पायर टेक्नोबीड, पुणे यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्तयामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०८ संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता बिस्कीटे खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त झालेल्या ई-निविदेचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

संस्थानचे २०१६-१७ चे किराणामाल व अनुशंगीक साहित्य खरेदीच्या प्रक्रियेमध्ये चहा पावडर, कॉफी, बिस्किटेचा समावेश होता तथापी चहा पावडरसाठी दोन, कॉफी व बिस्किटासाठी एक निविदाधारकाने प्रतिसाद दिला होता व तोही अपात्र ठरला होता. एकत्रीत निविदा असल्यामुळे सदर आयटमसाठी मुदतवाढ देता आली नाही, त्यामुळे फेर निविदा करण्याचे ठरले होते.

संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता चहा पावडर, कॉफी व बिस्किटे खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२३.०६.२०१६ ते दि.०५.०७.२०१६ या कालावधीत दुस-यांदा फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. तसेच तांत्रीक निविदा व नमुने (Technical Bid) स्विकारणेचा कालावधी दि.०६.०७.२०१६ ते दि.०७.०७.२०१६ असा ठेवण्यात आलेला होता. निविदा जाहिरातीमध्ये तांत्रिक निविदा उघडणेची तारीख दि.०८.०७.२०१६ अशी नमुद करण्यात आलेली होती.

सदर ई निविदेमध्ये चहा पावडर व कॉफीसाठी एक BOQ व् बिस्किटांसाठी एक BOQ असे दोन BOQ करण्यात आले होते. त्यास अनुसरुनमुदती अंती दि.५.०७.२०१६ अखेर सायंकाळी ५ वाजेपर्यंत चहा पावडर व कॉफीसाठी ४ व बिस्किटासाठी २ ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

बिस्कीटासाठी २ ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे, त्यास मा.प्रशासकीय अधिकारी यांचे पूर्व मान्यतेने पुन्हा ७ दिवसांची म्हणजेच दि.१२/७/२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तसेच चहा पावडर व कॉफीसाठी ४ ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे, या ई निविदेबाबतची पुढील कार्यवाही स्वतंत्र प्रस्ताव करुन पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.

किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केलेले Circulatory Agenda द्वारे सादर केलेले प्रस्तावावर दि.१०/६/२०१६ रोजी झालेले निर्णयानुसार १ महिन्यासाठी आवश्यक असणारी बिस्कीटे मागील निविदाधारकाकडून खरेदी करण्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. या खरेदीतील बरीचशी बिस्कीटे खरेदी करण्यात आलेली आहेत.

वरीलप्रमाणे बिस्किटासाठीचे टेंडरसाठी एक आठवडयाची मुदतवाढ म्हणजेच दि.१२.०७.२०१६ पर्यंत देऊनही याकामी दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. मागील अनुभव विचारात घेता बिस्कीटासाठी निविदा भरण्यासाठी जास्त निविदाधारक इच्छुक नसतात.

प्रथम एकत्रित निविदा, दुस-यांदा फेरनिविदा व तिस-यांदा ७ दिवसांची मुदतवाढ दिल्यामुळे याकामी आलेल्या दोन ई-निविदांच्या तांत्रिक निविदा दि.२५.०७.२०१६ रोजी उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये खालील दोन्हीही निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेले आहेत.

१. मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे
२. अग्रवाल एजन्सीज, राहाता.

तरी उपरोक्त प्राप्त दोन ई-निविदांचे Commercial Bid उघडणेकामी सदरचा प्रस्ताव मा.खरेदी समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असलेली बिस्कीटे खरेदीकामी दोनच निविदा पात्र असल्यामुळे सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, याकामी नव्याने ई-निविदांची मागणी करणेत यावी. तसेच पतंजली निर्मित बिस्कीटेही बाजारामध्ये कमी भावात मिळत आहेत, त्यांनाही ई-निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणेबाबत कळविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०९ **पाणी पुरवठा विभागाकरीता आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त Commercial Bid उघडणेबाबत.**

पाणी पुरवठा विभागास संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे गट नं.१८२ पैकीचे क्षेत्रातील विहिर व गट नं.२३५ पैकीचे क्षेत्रातील विहिर ते कनकुरी साठवण तलावापर्यंत टाकावयाच्या पाईपलाईनसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,४४,९६०/- (अक्षरी रु. सहा लाख चौरेचाळीस हजार नऊशे साठ) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १५ नुसार मान्यता मिळालेली आहे.

यातील अ.नं.१ वगळता उर्वरीत रक्कम रु.५,४६,९६०/- (अक्षरी रु. पाच लाख शेहेचाळीस नऊशे साठ) मात्रचे साहित्य खरेदीकामी जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर दि.०१.०६.२०१५ ते दि.१५.०६.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. याकामी मुदतीत दोनच निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्याने शासनाचे कार्यालयीन खरेदीसाठीचे कार्यपध्दतीचे नियमावलीमधील नियम क्र.४.४.३.१ नुसार "तीन किंवा त्यापेक्षा जास्त निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या असल्यास तांत्रिक निविदा उघडता येतील, तीनपेक्षा कमी निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या असल्यास व खरेदी रक्कम रुपये दहा लाखापेक्षा कमी असल्यास, निविदा उघडण्याच्या कालावधीस एका आठवडयाची एकदाच मुदतवाढ देण्याची तरतूद आहे." त्यानुसार दि.२२.०६.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

आता मुदतीअंती ऑनलाईन खालील तीन निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. मे. एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक
२. मे. एक्सल ट्रेडींग कंपनी, मुंबई
३. मे. युनियन ट्रेडींग, नाशिक

सदरच्या ऑनलाईन प्राप्त तांत्रिक निविदा दि०९.०७.२०१६ रोजी खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन तांत्रिक कागदपत्रांची छाननी केली असता तीनही निविदाधारकांच्यानिविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या आहेत.

उपरोक्त नमुद तीन निविदाधारकांच्या ऑनलाईन प्राप्त ई-निविदेतील Commercial Bid आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | तपशील | मे. युनियन ट्रेडींग, नाशिक | मे. एक्सल ट्रेडींग कंपनी, मुंबई | मे. एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील एकत्रित प्रती नग दर रु. | | |
| १ | ४" व्यासाचे पी.व्ही.सी. पाईप, फिनोलेक्स कंपनी (६ के.जी. २० फुट लांबी) ४२५ नग | १२६०/- | १३५०/- | **१२५२/-** |
| २ | पी.व्ही.सी. सोल्युशन ७ लिटर | २४२/- | ३८७/- | **२४०/-** |
| ३ | एअर व्हॉल्ह (सर्व्हिस सॅडल व स्टॅंडसह) १२ नग | १६५२/- | **७५६/-** | १६५०/- |
| ४ | ४" पी.व्ही.सी. बॅंड, फिनोलेक्स कंपनी (६ के.जी.) २६ नग | २५०/- | **२२५/-** | २४०/- |
| ५ | ४" नॉन रिटर्न व्हॉल्ह २ नग | ३०२७/- | ९०००/- | **३०२५/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागाकरीता आवश्यक असलेले, प्रस्तावात नमुद केलेले प्लंबींग साहित्य खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१० **संस्थान वाहनांकरीता नवीन टायर्स खरेदी कामी प्राप्त दरपत्रके उघडुन निर्णय घेणेबाबत.**

दि.२३/०६/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४१२ नुसार, ११ वाहनांकरीता वेगवेगळया साईजचे नवीन ३३ टायर्स (ट्युब+ फ्लॅपसह) अपोलो, सीएट व ब्रिजस्टोन कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून दरपत्रके बोलावुन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,६०,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख साठ हजार) पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार, ११ वाहनांकरीता अपोलो, सीएट, ब्रिजस्टोन व एमआरएफ या कंपनीचे नवीन ३३ टायर्स (ट्र्युब+ फ्लॅपसह) खरेदी करणे कामी परिसरातील ११ पुरवठाधारकाकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यानुसार मुदतीत एकुण ७ पुरवठाधारकांची दरपत्रके प्राप्त झालेली होती. सदरची दरपत्रके उघडुन निर्णय घेणे बाबतचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता.

दि.१५/०७/२०१६ रोजीचे मा.उपसमितीचे सभेपुढे मुदतीत प्राप्त झालेली ७ दरपत्रके उघडणेत येवुन पुरवठारांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन, तुलनात्मक तक्त्यामधील 165:80R14 या साईजचे ५ नग टायर्स हे टुबलेस असून त्यांची एकच कंपनी असल्यामुळे 165:80R14 साईजचे ५ नग टायर खरेदीकामी ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी यांचे प्रती नग रु.३,१५०/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन,त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.

तसेच उर्वरित टायर्स खरेदीकामी एकाच नामांकित टायर्स कंपनीचे वेगवेगळया पुरवठाधारकांकडून दर मागविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस करण्यात आली होती.

यानुसार, अपोलो कंपनीचे टायर खरेदी कामी अधिकृत डिलर/ स्थानिक पुरवठादार यांचेकडून इकडील जा.नं.एसएसएस/ वाहन/ २०८२/२०१६ दि.२८/०७/२०१६ रोजीचे पत्राने दि.०५/०८/२०१६ अखेर २८ टायर खरेदी कामी दरपत्रके मागविण्यात आली होती.

| अ.नं. | टायर पुरवठाधारकांचे नांव |
|---|---|
| ०१ | नरेंद्र टायर्स, कोपरगांव |
| ०२ | चंद्रप्रभा टायर, साकुरी |
| ०३ | ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी |
| ०४ | ओम टायर्स, शिर्डी |

| अ.नं. | टायर पुरवठाधारकांचे नांव |
|---|---|
| ०५ | राम टायर्स, कोपरगांव |
| ०६ | सतिश ॲटो सेंटर, श्रीरामपुर |
| ०७ | सुदर्शन टायर वर्क्स, साकुरी |
| ०८ | माऊली टायर्स, पळसे |

या ०८ पुरवठाधारकांपैकी खालील प्रमाणे अ.नं.०१ ते ०६ पुरवठाधारकांची दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | टायर पुरवठाधारकांचे नांव | आवक क्र. / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | नरेंद्र टायर्स, कोपरगांव | ७८६७-०२/०८/२०१६ |
| ०२ | माऊली टायर्स, पळसे | ७९७८-०३/०८/२०१६ |
| ०३ | ओम टायर्स, शिर्डी | ७९७९-०३/०८/२०१६ |
| ०४ | ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी | ७९७६-०३/०८/२०१६ |
| ०५ | सतिश ॲटो सेंटर, श्रीरामपुर | ७९९७-०४/०८/२०१६ |
| ०६ | राम टायर्स, कोपरगांव | ८१११-०५/०८/२०१६ |

उपरोक्तप्रमाणे नवीन टायर्स खरेदी कामी मुदतीत प्राप्त झालेली ०६ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | टायर पुरवठाधारकांचे नांव | 7:50:16 (१८ नग) | 7:00:16 (२ नग) | 8:25:20 (२ नग) | 1000:20 (६ नग) |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रती नग दर रु. | | | |
| ०१ | नरेंद्र टायर्स, कोपरगांव | **६७८०/-** | **६२१०/-** | ९९९०/- | १३५१०/- |
| ०२ | माऊली टायर्स, पळसे | ६८५०/- | ६४७५/- | **९६६०/-** | **१३१३३/-** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | ओम टायर्स, शिर्डी | ६७८५/- | ६९००/- | ९९००/- | १४३००/- |
| ०४ | ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी | ६८००/- | ६३४०/- | १०१२१/- | १३६५०/- |
| ०५ | सतिश ॲटो सेंटर, श्रीरामपुर | ६८००/- | ६४००/- | १०१००/- | १३६००/- |
| ०६ | राम टायर्स, कोपरगांव | ७०००/- | ६६००/- | १०४००/- | १४०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनांकरीता प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे नवीन टायर्स खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

११ **श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी ५ MBPS Internet Lease Line खरेदीकामी प्राप्त कर्मशियल ई-निवीदा उघडणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ५ MBPS Internet Lease Line खरेदीकामी दि.२७/१०/२०१५ रोजी सभेमध्ये क्र. ३० निर्णय क्र. ४०१ नुसार रक्कम रुपये ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये मात्र) रोजी खर्चास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार निवीदा मागविणेकमी वृत्तपत्रात तसेच www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर Tender ID 2016_SAI_134558_1 ही ई-निवीदा प्रसिध्द करणेत आलेली होती. दि.१८/०४/२०१६ ते दि.३०/०४/२०१६ टेंडर भरणेसाठीव दि.०३/०५/२०१६ पर्यंत मुळ कागदपत्रांच्या प्रती डी.डी.सह संस्थान कार्यालयात जमा करणे रोजी अखेर मुदत देणेत आली होती.

सदर दि.०४/०५/२०१६ रोजी निवीदाधारंकाना ई-निवीदा तांत्रिक लिफाफा उघडण्याची तारिख देण्यात आली होती. तथापि ०१ ऑनलाईन निवीदा प्राप्त झाली होती. तसेच आवक विभागाकडुन ०२ निवीदा प्राप्त झाल्या होत्या. लेखा परिक्षणाच्या दृष्टिने कमीत कमी तीन कंपन्याचे टेक्निकल बीड असणे आवश्यक आहे. त्यामुळे फेर-निवीदा मागविण्यात आलेल्या आहे. त्याकामी ०३ निवीदा प्राप्त झाल्या आहे. दि.०५/०७/२०१६ रोजी प्राप्त टेक्नीकल बीड ई-निवीदा उघडण्यात आल्या त्याचा तपिशल खालील प्रमाणे-

**परिशिष्ट "अ"**

| अ.नं. | निवीदाधारंकाचे नाव | आवक नंबर व दिनांक | लिफाफा संख्या |
|---|---|---|---|
| ०१. | M/s. BHARAT SANCHAR NIGAM LIMITED Ahemdnagar | आ.५९७९/दि.०४/०७/२०१६ | ०१ |
| ०२. | M/s.D.VOIS Communication Pvt.Ltd. Mumbai | आ.१४०८/दि.०५/०७/२०१६ | ०१ |
| ०३. | M/s. Gazon Communication India Ltd Pune | आ.४५ /दि.०५/०७/२०१६ | ०१ |

वरीलप्रमाणे दुस-यांदा निवीदाधारकास दिलेल्या अटि व शर्ती नुसार त्यांचे सर्व कागदपत्रानुसार सर्व निवीदाधारक पात्र झालेले आहे. सोबत पुरावठा धारकांचा टेक्नीकल बाबींचा तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ कर्मर्शियल ऑनलाईन ई-निवीदा आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | M/s. Gazon Communication India Ltd., Pune | **१,८२,०००/-** |
| ०२ | M/s.D.VOIS Communication Pvt.Ltd. Mumbai | २,४७,२५०/- |
| ०३ | M/s. BHARAT SANCHAR NIGAM LIMITED Ahemdnagar | १,९६,७१२/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी ५ MBPS Internet Lease Line खरेदीकामी M/s. Gazon Communication India Ltd., Pune यांचे रु.१,८२,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१२ **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

**(१)** विविध खरेदीबाबत महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार AMC देणेसाठी उत्पादक कंपनीला १% दर देण्यात यावा, अशी तरतूद दिसून येते व संस्थानमधील बऱ्याचशा मशिनरींच्या AMC साठी ५% पर्यंत दर दिला जात आहे. याकरीता संबंधीत कंपन्यांच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी स्थानिक उपसमिती सभेसमोर बोलाविणेत यावे.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ मेकॅनिकल/ विद्युत/ बांधकाम विभागप्रमुख)

---

**(२)** संस्थानमधील विविध खरेदी करणेकामी कंपन्यांना/ त्यांच्या प्रतिनिधींना ई-मेल केला जातो. या ई-मेलला कंपन्या प्रतिसाद देतात का याची माहिती प्रस्तावामध्ये नमूद करणेत यावी.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ मेकॅनिकल/ विद्युत/ बांधकाम विभागप्रमुख)

---

**(३)** संस्थान रुग्णालयांमध्ये विविध औषधे/ सर्जिकल साहित्य पुरविणाऱ्या M/s. Austin Health Care, Pune या कंपनीबद्दल अनेक तक्रारी आहेत असे संबंधीत विभागाने सभेस कळविले, त्यानुसार या कंपनीबाबतच्या तक्रारींच्या पुर्ण कागदपत्रांसह, M/s. Austin Health Care, Pune यांनाही स्थानिक उपसमिती सभेसमोर बोलाविणेत यावे. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(४)** ज्या-ज्या ठिकाणी संस्थानची विक्री काऊंटर्स आहेत, त्या-त्या ठिकाणी साईभक्तांना विनामुल्य नॉनवूल पिशव्या उपलब्ध करुन देता येतील का, याबाबतचा तौलानिक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**(५)** वेगवेगळया साहित्यांची खरेदी करतेवेळेस त्या क्षेत्रातील तज्ञांकडून सदरहू साहित्य व ते खरेदी करणेची आवश्यकता तपासून घेण्यात यावी व त्यानंतरच समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ मेकॅनिकल/ विद्युत/ बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२** **दिनांक ३१.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६३९** दिनांक ३१.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.५९५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहामध्ये साईभक्तांच्या सुविधेकरीता बसविणेत आलेल्या एकुण २५ टाटास्काय कनेक्शनचे पुढील दि.१६/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१७ या कालावधीसाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेनुसार प्रतिमहा प्रति नग रु.२४०/- मात्र याप्रमाणे ११ महिन्यासाठीचे एकत्रित रिचार्ज करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहामध्ये साईभक्तांच्या सुविधेकरीता बसविणेत आलेल्या एकुण २५ टाटास्काय कनेक्शनचे दि.१६/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१७ या कालावधीसाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेनुसार ११ महिन्यासाठीचे एकत्रित रिचार्ज करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**(२) निर्णय क्र.६१८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, जोपर्यंत शिर्डी बसस्थानकाचे काम पुर्ण होऊन, त्यामधील संस्थान निवासस्थान, संस्थानकडे हस्तांतरीत होत नाही, तोपर्यंत शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानात लागणारे साहित्य खरेदी करणेत येऊ नये, असे ठरले.

तसेच सदरहू बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानाचे नामांकरण करणेसाठी स्थानिक विश्वस्तांनी पुढील सभेमध्ये नाव सुचित करावे, अशा सुचना करणेत आल्या.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानांची, संस्थानचे नावावर नोंदणी करण्याचे काम अंतीम टप्प्यात आहे. याकरीता सदरहू ठिकाणी लागणारे साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानाचे नामांकरण करणेसाठी स्थानिक विश्वस्तांनी पुढील सभेमध्ये नाव सुचित करावे, अशा सुचना करणेत आल्या.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.०३** **बांधकाम प्रगती अहवालामधील अंतीम बील अदा करणेच्या ब तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

बांधकाम प्रगती अहवालामधील अंतीम बील अदा करणेच्या ब तक्त्याची प्रत सर्व मा.विश्वस्तांना पुरविणेत आलेली होती.

**निर्णय क्र.६४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम प्रगती अहवालामधील ब तक्त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यामधील द्वारावती भक्तनिवास इमारतीचे आतील भागास रंगकाम करणेकामीचे ठेकेदार श्री.अतुल विठ्ठल चव्हाण, अहमदनगर यांचे काम पुर्ण झालेने, त्यांच्या अंतीम बीलाची रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **दिपावली सुट्टीचे कालावधीत तसेच डिसेंबर-२०१६ मधील नाताळ सुट्टी व नववर्षानिमीत्ताने होणाऱ्या गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट – कलम (१) च्या खंड (ख) अन्वये " रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा– अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

तसेच सदर कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** दिनांक ३० ऑक्टोंबर, २०१६ ते दि.१३ नोव्हेंबर, २०१६ अखेर १५ दिवस दिपावली सणानिमित्त तसेच दि.२५ डिसेंबर, २०१६ ते दि.०२ जानेवारी, २०१७ अखेर ०९ दिवस शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्टया आहेत. या कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने, साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते व्यवस्थेकरीता खालील ठिकाणी एम.एस. पाईपचे स्ट्रक्चर असलेले ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप टाकणे आवश्यक आहे.

**अ) दिपावली मंडप (कालावधी दि.३०/१०/२०१६ ते दि.१३/११/२०१६ अखेर १५ दिवस)-**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिरासमोर सभाकुंड येथे | ६१X ६१ | ३७२१.०० |
| ०२ | उदी काऊंटर समोर | ३० X २०<br>२०X १५ | ६००.००<br>३००.०० |
| ०३ | गुरुस्थान मंदिरासमोर एम.एस. पाईप फ्रेममध्ये ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप टाकणे. | ४५X ३६ | १६२०.०० |
| ०४ | पिंपळवाडी रस्त्यांवरील दर्शन लाईन शेडचे पुर्व व पश्चिम बाजूस | ३०X ७७<br>१५X ४६ | २३१०.००<br>६९०.०० |
| ०५ | पिंपळवाडी रस्त्यावर साई कॉम्प्लेक्स इमारती समोर | २९०X १८ | ५२२०.०० |
| ०६ | मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत( दर्शन रांगेकरीता) | ४८X १२५ | ६०००.०० |
| ०७ | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजू फुटपाथवर | १६०X ७ | ११२०.०० |
| | | एकूण चौ. फुट | २१५८१.०० |

| | |
|---|---|
| **दिपावली मंडपासाठी अंदाजे रु.१.२२ प्र. चौ. फुट प्र.दिवसाप्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च (अ)** | **३,९४,९३२.००** |

**ब) नाताळ मंडपः-**

**१) मंडप व्यवस्था करणे. (कालावधी दि.२५/१२/२०१६ ते दि.०२/०१/२०१७ अखेर ०९ दिवस)-**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| अ | **मंडप व्यवस्था** | | |
| ०१ | गुरुस्थान समोर पश्चिम बाजूस दक्षिण – उत्तर असा | ४५X ३६ | १६२०.०० |
| ०२ | मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत( दर्शन रांगेकरीता) | ४८X१२५ | ६०००.०० |
| ०३ | नगर – मनमाड रोड पश्चिम बाजू फुटपाथ | २७० X ९ | २४३०.०० |
| ०४ | पिंपळवाडी रस्त्यांवरील दर्शन लाईन शेडचे पुर्व व पश्चिम बाजूस | ३०X ७७<br>१५X ४६ | २३१०.००<br>६९०.०० |
| ०५ | पिंपळवाडी रोड उत्तर बाजू फुटपाथ | १६०X७ | ११२०.०० |
| ०६ | चहा कॅन्टीन शेड ते पिंपळवाडी रस्ता फुटपाथ पर्यंत. | ९१X५-६ | ५००.५० |
| ०७ | पिंपळवाडी रोड गेट नं.२ ते महालक्ष्मी मंदिरापर्यंत दर्शन रांगेसाठी | २९०X १८ | ५२२०.०० |
| ०८ | पिंपळवाडी रस्त्यालगत हॉटेल एम टी डी सी ते नविन पिंपळवाडी रस्त्यापर्यंत. | ६०X१५<br>३००X७-६ | ९००.००<br>२२५०.०० |
| ०९ | ५०० रुम येथे निवासव्यवस्थेसाठी | १५०X३० | ४५००.०० |
| १० | साईआश्रम येथे निवासव्यवस्थेसाठी | १०५ X३० | ३१५०.०० |
| ११ | साई धर्मशाळा येथे A व F इमारतीचे मधील स्टेजसमोर निवासव्यवस्थेसाठी | ९०X४० | ३६००.०० |
| | एकूण चौ. फुट | | ३४२९०.५० |
| **अंदाजे रु.१.२२ प्रती चौ.फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च -** | | | **३,७६,५१०.००** |

**२) निवास व्यवस्था मंडपाचे बाजूने कनात व्यवस्था करणे.**

**(कालावधी दि.२५/१२/२०१६ ते दि.०२/०१/२०१७ अखेर ०९ दिवस)**

| अ.नं. | कामाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | ५०० रुम येथील मंडपाचे बाजूने कनात बांधणे. | ३५० र. फुट | ३५० र. फुट |
| ०२ | साईआश्रम मंडपाचे बाजूने कनात बांधणे. | २६० र. फुट | २६० र. फुट |
| ०३ | साई धर्मशाळा येथे A व F इमारतीचे मधील स्टेजसमोरील मंडपाचे बाजूने कनात बांधणे. | २१० र. फुट | २१० र. फुट |
| | | एकूण र. फुट - | ८२० र. फुट |
| **अंदाजे रु.२.४४ प्रती र. फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च -** | | | **१८,००७.००** |

**३) मंडपात मॅटीन व्यवस्था करणे. (कालावधी दि.२५/१२/२०१६ ते दि.०२/०१/२०१७ अखेर ०९ दिवस)**

| अ.नं. | कामाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | ५०० रुम येथील मंडपात मॅटीन टाकणे. | १५०X३० | ४५००.०० |
| ०२ | साईआश्रम मंडपात मंडपात मॅटीन टाकणे. | १०५X३० | ३१५०.०० |
| ०३ | साई धर्मशाळा येथे A व F इमारतीचे मधील स्टेजसमोरील मंडपात मंडपात मॅटीन टाकणे. | ९०X४० | ३६००.०० |
| | | एकूण चौ. फुट | ११२५०.०० |
| **अंदाजे रु.०.१८ प्रती चौ.फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च -** | | | **१८,२२५.००** |

**४) बॅरेकेडींग व्यवस्था करणे. (कालावधी दि.२५/१२/२०१६ ते दि.०२/०१/२०१७ अखेर ०९ दिवस)**

| अ.नं. | कामाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साईप्रसादालयातील भोजन प्रतिक्षालय रेलींगला संरक्षक कठडे बांधणेकामी बांबुची४ फुटी उंचीची बॅरेकेडींग करणे तसेच व साईभक्तांचे दर्शन लाईन करीता बेरेकेडींग करणे. | ११०० र. फुट | ११०० र. फुट |
| **अंदाजे रु.६.११ प्रती र.फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च -** | | | **६०४८९.००** |

**५) स्वागत कमान उभारणे. (कालावधी दि.०१/०१/२०१७ ते दि.०१/०१/२०१७ अखेर ०१ दिवस)**

| अ.नं. | कामाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | साईनगर मैदानाकडे जाणारा रस्त्यावर स्वागत कमान उभारणे (१ दिवस) | २०X १५ फुट | ०१ नग |
| **अंदाजे रु.३०८० प्र. नग प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च -** | | | **३०८०.००** |

**६) स्टेज व्यवस्था करणे. (कालावधी दि.३१/१२/२०१६ ते दि.३१/१२/२०१६ अखेर ०१ दिवस)**

| अ.नं. | कामाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | साईनगर मैदान येथे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी ग्रीनरुमसह स्टेजची उभारणी करणे. ( १ दिवस ) | ३०X २०फुट | ६०० चौ. फुट |
| **अंदाजे रु.६३.८० प्रती चौ.फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च -** | | | **३८,२८०.००** |
| **नाताळ मंडपासाठी अपेक्षित एकूण अंदाजे खर्च – (ब)** | | | **रु.५,१४,५९१.००** |
| **दिपावली व नाताळ कालावधीतील मंडपासाठी अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (अ+ब)** | | | **रु.९,०९,५२३.००** |

**प्रस्ताव:-** मागील वर्षाचे सन २०१५ मधील दिपावली व नाताळ सुट्टीचे कालावधीत होणारे गर्दीचे निमित्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी रक्कम रु.६,९१,२८९/- मात्र खर्च झालेला आहे. सन २०१६ मधील दिपावली व नाताळ सुट्टीचे कालावधीत होणारे गर्दीचे निमित्ताने साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी मागील वर्षीच्या मंजूर दरात १०% वाढ गृहीत धरुन वरीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

वरील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे दिपावली व नाताळ सुट्टीचे कालावधीत होणारे गर्दीचे निमित्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक सुविधा उभारणे ही नित्याची व अत्यावश्यक बाब असल्याने याकामी वरीलप्रमाणे अंदाजे रक्कम रु.९,०९,५२३/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरहू खर्चात तात्पुरत्या निवास व्यवस्थेच्या मंडपाचा समावेश असून सदरहू मंडप व्यवस्था आवश्यकतेनुसार करणेत येईल.

तरी वरीलप्रमाणे दिपावली व नाताळ सुट्टीचे निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.९,०९,५२३/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिपावली सुट्टीचे कालावधीत तसेच डिसेंबर-२०१६ मधील नाताळ सुट्टी व नववर्षानिमीत्ताने होणाऱ्या गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,०९,५२३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच यावेळी अशीही चर्चा करणेत आली की, संस्थानला साईभक्तांच्या सोयीसाठी मंदिर व मंदिर परिसरामध्ये वारंवार मंडप उभारणेची आवश्यकता भासते. याकरिता सध्या बाजारामध्ये उपलब्ध असलेले, फोल्डींगचे मंडप साहित्य खरेदी करणेत यावे व तात्पुरत्या कालावधीसाठी मंडपाची आवश्यकता भासल्यास, त्याचा वापर करण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नूतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम- २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-**

*१)* दि.०७/०२/२०१३ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नूतनीकरण करणेसाठी निर्णय क्र.१११ अन्वये, *"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींचे नूतनीकरण करणेसाठी Granite Stone 3cm thk. sagaralli grey Antique Finish (Flammed and Brushed) व Granite Stone 2cm thk. leather finish याचा वापर करण्यात यावा. याकामी येणा-या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास व वर्तमानपत्रात आणि संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.*

*तसेच, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करणेसाठी परवानगी मिळणेबाबत, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत त्वरीत अर्ज सादर करणेत येऊन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."*

२) दि.३०/०३/२०१३ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.२६५ अन्वये, *"श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरिंग नूतनीकरणाचे कामाकरिता आर्किटेक्ट म्हणून शुभंकर एन्टरप्रायजेस, पुणे यांची नेमणूक करणेत यावी तसेच, सदरहू प्रकल्पासाठी आर्किटेकूट सेवा पुरविणेकामी त्यांना प्रकल्प अंदाजपत्रकाचे २% फी + सर्व्हिस टॅक्स देणेत यावा, असे ठरले"*.

**प्रस्तावनाः –** संस्थानतर्फे श्री साईबाबा मंदिर परिसर पूनर्विकास प्रकल्पाचे बांधकाम यापुर्वी सन १९९९ मध्ये पूर्ण करणेत आले आहे. त्यावेळी मंदिर परिसरात रफ शहाबाद फरशी बसविण्यात आलेली आहे. तसेच त्यामध्ये ब्लॅक कडप्पा व रेड आग्रा स्टोनमध्ये डिझाईन तयार करण्यात आलेली आहे. सदर फ्लोअरींगचे काम पूर्ण होऊन आता पंधरा वर्षापेक्षाही अधिक कालावधी झालेला आहे. काळाचे ओघात फ्लोअरिंग ब-याच ठिकाणी खराब झाली आहे. त्यास तडे गेलेले आहेत. त्यामुळे सदर फ्लोअरिंगचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी सध्याची फ्लोअरींग काढून त्याठिकाणी नविन फ्लोअरींग बसविणे अथवा सध्याची फ्लोअरींग तशीच ठेऊन त्यावर नविन फ्लोअरींग बसविणे यापैकी योग्य तो पर्याय ठरविता येईल. सदर फ्लोअरींगचे क्षेत्रफळ अंदाजे १२०३१ चौ. मीटर इतके आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्व्हेक्षण विभाग (ASI) यांचेकडील खालील अधिका-यांनी दि.२४/०४/२०१५ रोजी शिर्डी येथे भेट देऊन समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी व दिक्षितवाडा या पुरातन वास्तुंची पहाणी केली.

१) श्री.आर. एस. जामवाल, सुप्रींटेंडींग आर्किओलॉजीकल इंजिनिअर, नवी दिल्ली.

२) श्री. मॅनेजर सिंग, सुप्रींटेंडींग आर्किओलॉजीकल केमीस्ट,औरंगाबाद झोन.

३) श्री. पी. जी. देशमुख, सहाय्यक असिस्टंट आर्किओलॉजीकल इंजिनिअर, औरंगाबाद विभाग.

४) श्री. डी.एस. दानवे, कॉन्झरवेशन असिस्टंट, सबसर्कल अजींठा, अजींठा लेणी.

वरीलप्रमाणे पहाणीचा अहवाल ASI यांचेकडून दि०१/०४/२०१५ रोजी प्राप्त झाला आहे. त्यात मंदिर परिसरातील फ्लोअरींगबाबत खालिलप्रमाणे नमूद आहे.

*"It was seen that the stone flooring using Kota / Shahabad /other stone has sunken/ Cracked /damaged at many places. It was also told that surface becomes very hot in the summer causing inconvenience to devotees. The flooring need to be replaced keeping regard to the historic character of Building. An appropriate option maybe fine dressed stone, thin jointed, of minimum 10 cm thickness. This will also take care of not getting hot in the summer"*

यापुर्वी सन १९९८ मध्ये मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्प आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो. नवि दिल्ली यांनी डिझाईन केलेला आहे. तसेच मा. त्रिसदस्य समितीचे दि.०४/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८३ अन्वये नियोजित दर्शन रांग व मंदिर परिसर पूनर्विकास प्रकल्पासाठी त्यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पासाठीचे नकाशे (Architectural drawings) आर्कीटेक्ट यांनी सादर केलेले आहेत. त्यानुसार मंदिर परिसरातील सध्याची दर्शन रांग व्यवस्था असलेल्या इमारती पाडून त्या ठिकाणी पहिल्या मजल्यावर नियोजीत दर्शन रांग व त्याखाली परिसरातील अत्यावश्यक सेवांसाठी कार्यालये दर्शविलेली आहेत.

याबाबत मंदिर सुदृढीकरण/ जतन करणे संदर्भातील ASI यांचेकडील अहवालामध्ये वरीलप्रमाणे फ्लोरींगबाबत नमूद केलेल्या तपशिलाविषयी अधिक सविस्तर माहिती घेऊन, त्यानुसार फ्लोरींगचा प्रकार व स्पेसिफीकेशन्स ठरविणेकामी ASI यांना इकडील जा.नं.५४९७, दि.०४/०१/२०१६ अन्वये पत्र पाठविणेत आले होते. त्यास अनुसरुन ASI चे Shri R.S. Jamwal, Superintending Archaeological Engineer, New Delhi यांनी त्यांचे दि.२२/०१/२०१६ रोजीचे पत्राद्वारे अहमदनगर जिल्ह्यातील विविध ऐतिहासीक वास्तुंचे परिसरात विविध प्रकारचे साधारण १० से.मी. जाडीचे स्टोन लावून फ्लोअरींग केलेली आहे. याबाबत अधिक माहितीसाठी औरंगाबाद विभागाचे ASI कार्यालयाशी संपर्क करावा, असे कळविले आहे.

मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेसमोर दि१७/०८/२०१६ रोजी नियोजीत दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाचे सादरीकरण देण्यात आले. त्यावेळी मा. अध्यक्ष यांनी समाधी मंदिर परिसरातील फ्लोअरींग अति खराब झालेली असल्याने तसेच उन्हाळ्यामध्ये सदर फ्लोअरींग

मोठ्या प्रमाणावर तापते त्यामुळे ती तातडीने बदलणेबाबत सूचना केल्या आहेत. याकरीता आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांना ०८ दिवसात योग्य त्या पर्यायासह अंदाजपत्रक सादर करणेबाबत सूचना केल्या आहेत.

त्यावर आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी दि.२६/०८/२०१६ रोजीचे ई -पत्राव्दारे खालिलप्रमाणे कळविले आहे.

*" With reference to above, we are submitting herewith details regarding above. We have located the vendor who has supplied the cold stone flooring at the Akshardham Temple in New Delhi.*

*The particular stone/ tile is available in a size of 800x800 mm (32"x32") with a thickness of 15mm. Its base is of vitrified material and the topping is of engineered material / stone. Its made in china. The stone remains cold even in the hottest summer sun. Since its an engineered material its soft compared to natural stones and is recommended in the temple only where everyone is moving around without shoes or any footwear made of hard and sharp substance. The material has to be ordered and will take a couple of months to be delivered. Approximate cost is Rs.275/- to Rs.300/- per sqft.*

*We are attaching an estimate of total cost for the external flooring using different materials in different proportions. The estimate is self explanatory.*

*The different flooring patterns to be provided in the renovated complex are required to be carried out after major construction activities have been completed. The dirt, dust and grit floating around during demolition & construction of the main works will definitely harm the paving / flooring in the complex. Therefore, it is not recommended to change the flooring at the present juncture".*

**अ)** आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी दि.२६/०८/२०१६ रोजीचे ई-पत्राव्दारे, समाधी मंदिर परिसरात फ्लोरींगकरीता शहाबाद, ब्लॅक बसाल्ट, मकराना मार्बल, ग्रेनाईट, डिझायनर पॅटर्न मार्बल / ग्रेनाईट फ्लोअर, व्हाईट इंजिनिअर्ड स्टोन, इ. वापरुन परिसरात फ्लोरींग व डिझाईन पॅटर्न करता येईल असे सूचविले आहे. तसेच त्याकरीता येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक खालिलप्रमाणे सादर केले आहे.

क्षेत्रफळः- १२०३१.०० चौ. मी.

| Sr.No. | Item | Qty. | Unit | (Approx. in Rs.) Rate | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Local Stone Shahabad (10%) | 1203 | Sqm. | 555/- | 6,67,721/- |
| 2 | Local Black Basalt Stone 10 cm thk. (NS) (25%) | 3008 | Sqm. | 3,030/- | 91,13,483/- |
| 3 | Marble Makrana white Second Quality (NS) (10%) | 1203 | Sqm. | 3,870/- | 46,55,997/- |
| 4 | Granite (10%) | 1203 | Sqm. | 3,220/- | 38,73,982/- |
| 5 | Designer Pattern Floor with Marble / Granite (NS) (20%) | 2406 | Sqm. | 4,644/- | 1,11,74,393/- |
| 6 | White Coloured Engineered Stone Tiles Flooring (NS) (25%) | 3008 | Sqm. | 5,775/- | 1,73,69,756/- |
| | | | | **Total Rs.:** | **4,68,55,331/-** |
| | | | | **Add. 5% Contingencies:** | **23,42,767/-** |
| | | | | **Total Amount Rs.:** | **4,91,98,098/-** |

**ब)** आर्किटेक्ट श्री काप्रे यांनी वर नमूद केलेप्रमाणे कळविले आहे की, मंदिर परिसरातील नियोजित बांधकाम व जुने बांधकाम तोडतेवेळी धूळ व ग्रीट इ. मुळे परिसरातील फ्लोरींग खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवीन फ्लोरींगचे काम सध्या हाती न घेता ते नियोजित दर्शन रांग प्रकल्पाबरोबरच करण्यात यावे. याबाबत

इकडील विभागाने आर्किटेक्ट यांना नियोजित दर्शन रांग प्रकल्प बांधकामामुळे बाधित न होणारा फ्लोरींगचा भाग पहिल्या टप्प्यात करता येईल काय, याविषयी माहिती देणेबाबत विनंती केली. त्यावर आर्किटेक्ट यांनी सध्या ३१२३ चौ. मी. क्षेत्रामध्ये नवीन फ्लोरींग करता येईल असे कळविले असून त्यासाठी रु.१,६१,४८,८३०/- मात्र इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यामध्ये आर्किटेक्ट यांनी फक्त गेट नं.०४ व गुरूस्थानचे उत्तरेकडील भागामध्येच नवीन फ्लोरींग करण्याचे प्रसूतावित केले होते.

तथापि नवीन दर्शनरांग प्रकल्पांतर्गत मंदिर परिसरातील नियोजित बांधकामे ही दर्शनरांग मुख्यइमारतीचे बांधकाम पूर्ण झालेनंतर दुस-या टप्प्यात हाती घेण्याचे नियोजन आहे. त्यामुळे दरम्यानचे कालावधीचा विचार करता साईभक्तांचे सोयीसाठी नियोजित इमारतीचा भाग वगळून इतर भागात नवीन फ्लोरींग करणेत यावे असे मत आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

क्षेत्रफळ :- ५३५४ चौ.मी.

| Sr.No. | Item | Qty. | Unit | (Approx. in Rs.) Rate | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Granite (20%) | 890 | Sqm. | 3,220/- | 28,65,800/- |
| 2 | Designer Pattern Floor with Marble / Granite (NS) (30%) | 1335 | Sqm. | 4,644/- | 61,99,740/- |
| 3 | White Coloured Engineered Stone Tiles Flooring (NS) (50%) | 2226 | Sqm. | 5,775/- | 1,28,55,150/- |
| 4 | Local Black Basalt Stone 10 cm thk. for Pathways in Lendi Garden. | 903 | Sqm. | 3,030/- | 27,36,090/- |
| | | | | **Total Rs.:** | **2,46,56,780/-** |
| | | | | **Add. 5% Contingencies:** | **12,32,839/-** |
| | | | | **Total Amount Rs.:** | **2,58,89,619/-** |

मंदिर परिसरातील संपूर्ण भागातील फ्लोरींग बदलणेकामी वरील 'अ' मध्ये नमूद केलेप्रमाणे एकूण अंदाजे रु.४,९१,९८,०९८/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. परंतू सध्या मंदिर परिसराचे नूतनीकरण प्रस्तावीत आहे. करीता सदरहू फ्लोरींगचे काम दोन टप्प्यात करता येईल. त्याकरीता वरील 'ब' मध्ये नमूद केलेनुसार सुमारे ५३५४ चौ. मी. भागातील फ्लोरींग नुतनीकरणाचे काम आता त्वरीत हाती घेता येईल. याकामी अंदाजे रु.२,५८,८९,६१९/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. यासाठी आर्किटेक्ट यांनी ब्लॅक बसाल्ट, ग्रेनाईट, डिझाईनर पॅटर्न मार्बल/ ग्रेनाईटमध्ये व व्हाईट कलर्ड इंजिनिअर्ड स्टोन टाईल्स यांचे संयोजनाचे स्वरूपात फ्लोरींग करण्याचे सूचविले आहे. ASI यांनी यापुर्वी स्थानिक ब्लॅक बसाल्ट मध्ये फ्लोरींग करणेबाबत शिफारस केलेली आहे. इकडील विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या वर नमुद अंदाजपत्रकात लेंडीबागेतील पाथवे करीता ब्लॅक बसाल्ट फ्लोरींग प्रस्तावित करण्यात येत आहे.

**प्रस्ताव:-** तरी वरील 'ब' मध्ये नमूद केलेप्रमाणे पहील्या टप्प्यामध्ये भागशः ५३५४ चौ. मी. भागामध्ये फ्लोरींगचे कामास व त्यासाठी येणारे रु.२.५९ कोटी खर्चास तसेच सदर कामासाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ६४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील ५३५४ चौ. मी. जागेमधील फ्लोरींगचे नुतनीकरण करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु अशीही चर्चा करणेत आली की, समाधी मंदिराच्या वास्तुपेक्षा फ्लोरींग उठावदार व आकर्षक नसावे, याकरीता फ्लोरींगचा रंग फिका ठेवण्यात यावा तसेच कमी नक्षीकाम असावे, त्यासाठी मंदिर परिसरामध्ये करावयाच्या फ्लोरींगसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागाराचा अभिप्राय घेण्यात यावा व नमुनादाखल ४X४ स्के.फुट जागेत वेगवेगळया प्रकारचे/ नक्षीचे फ्लोअरींग करणेत येऊन, त्याची चाचणी घेण्यात यावी. त्यानंतर जो नमुना पसंत पडेल त्यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्या, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **भारताचे पंतप्रधान सन्मा. श्री.नरेंद्र मोदी साहेब भारत सरकार यांचेशी दिल्ली येथे झालेल्या भेटीत त्यांनी श्री साईबाबा संस्थान संबंधाने केलेल्या मौलिक सूचनांबाबत.**

**प्रस्ताव-** मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे, माजी संसद सदस्य, (लोकसभा) तथा सदस्य, मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी सन्मा. श्री. नरेंद्र मोदी साहेब, पंतप्रधान, भारत सरकार, यांचेशी दिल्ली येथे भेट घेतली असता, मा. पंतप्रधान यांचेशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी बाबत दिलेल्या मौलिक सूचना इकडील विभागास दि.२६/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेल्या असुन त्यापैकी बांधकाम विभागाशी संबंधीत सूचना खालीलप्रमाणे आहे.

पुट्टपर्थी येथे सत्यसाईबाबा यांनी ज्या पध्दतीने परिसरात विकास कामे केली त्याच धर्तीवर श्री साईबाबा संस्थानने शिर्डी व आसपासच्या परिसराचा विकास करावा असे सूचित केले आहे.

श्री साईचे महानिर्वाणास दिनांक १८ ऑक्टोबर, २०१८ विजयादशमी रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानतर्फे दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) या कालावधीत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये लाखो साईभक्त श्री साईबाबांचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील. त्या अनुषंगाने शिर्डी व परिसरामध्ये सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने दिर्घकालीन गरजा विचारात घेऊन सर्व संबंधीत विभागांचा एकत्रित कृती आराखडा तयार करून त्यानुसार कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र/राज्य शासन यांचेमार्फत आवश्यक निधी/ अनुदान उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांनी दि.२२/१०/२०१३ व दि.२५/०२/२०१४ चे शासन निर्णयांन्वये मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली कृती आरखडा समिती गठीत केली आहे.

दि.११/१२/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. मुख्यमंत्री महोदय श्री. देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ बैठक कक्ष, विधानभवन, नागपूर येथे आढावा बैठक पार पडली होती. सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कृती आराखडयामध्ये उचित बदल करून प्रारूप कृती आराखडा अंतिम करणेकामी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उपसमितीचे मान्यतेने कृति आराखडा अंतिम करण्यात येवून, मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या कृती आराखडा समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले आहे.

याबाबतचा प्रारुप कृती आराखडा मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा उपसमितीचे दि.२६/०५/२०१६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या सभेपुढे सादर करणेत आला होता. सदरहु सभेतील निर्णयानुसार कृती आराखडा सुधारीत करणेत येत आहे. यामध्ये शिर्डी परिसरातील विकास प्रकल्पांचा समावेश करणेत आलेला आहे.

पुट्टपर्थी येथे सत्यसाईबाबा यांचे ट्रस्टचे माध्यमातून परिसरात जी विकास कामे केलेली आहेत त्यांची पहाणी व अभ्यास करुन त्या धर्तीवर संस्थानतर्फे विकास कामे हाती घेणेबाबत प्रस्ताव तयार करता येईल. तरी त्यासाठी मा.व्यवस्थापन समिती सदस्य व संबंधीत अधिकारी यांचा पुट्टपर्थी येथे अभ्यास दौरा आयोजित करणेसाठी निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.६४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन्मा. श्री.नरेंद्र मोदी साहेब, पंतप्रधान, भारत सरकार यांच्या मौलिक सुचनांनुसारसत्यसाईबाबा ट्रस्टचे माध्यमातून पुट्टपर्थी परिसरात जशी विकास कामे केलेली आहेत त्या धर्तीवर संस्थानतर्फे विकास कामे हाती घेणेस मान्यता देण्यात आली. त्यासाठी पुट्टपर्थी येथे पाहणी करणेसाठी विश्वस्तांनी स्वखर्चाने जावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत भूसंपादनासाठी वाढीव रक्कम देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

*"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल:-*

*(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."*

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:**

१. नि. क्र. २६३ दि. २४/०४/२००६

२. नि. क्र. ६७८ दि. १९/०८/२००६

३. नि. क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१०

**मा. शासन निर्णय :** १. क्र. सासंवि-२००६/८७६(१३१)/का.सोळा दि.१९/०९/२००८

२. क्र. सासंवि-२००६/८७६(१३१)/का.सोळा दि.०४/०९/२०१४

**प्रस्तावना:** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरून विषयाकिंत कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णयानुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्ते संस्थान निधीतुन विकसित करणेचे कामासाठी (भूसंपादन व विकसन) येणारे रु.८८ कोटी मात्रचे खर्चास दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली आहे.

सदर प्रकल्पातील पाच रस्ते विकसित करणेचे उपलब्ध भागातील काम महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळ, पुणे यांचेमार्फत जुन २०१२ अखेर करणेत आले आहे. तसेच सदर योजनेतील एकूण ७.४९ कि.मी. लांबीचे सहा रस्ते संस्थान निधीतुन विकसित करणेचे रु.३३,८३,२६,१९९/- मात्र रकमेचे काम ठेकेदार रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांना इकडील दि.०६/०८/२०१० रोजीचे कार्यादेशान्वये देणेत आले आहे. सदरहु कामाची १५ महिने मुदत दि.०६/११/२०११ अखेर होती. नगरपंचायतीने उपलब्ध करून दिलेल्या भागातील ४.७९ कि. मी. भागातील काम पुर्णत्वावर आहे. तथापि शिर्डी नगरपंचायतीकडून भूसंपादन कार्यवाही पूर्ण न झाल्याने अद्यापही सुमारे १.८० कि.मी. वळण रस्त्याचे काम सुरु करता आलेले नाही.

ठेकेदार यांना जुन २०१४ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. या प्रकल्पातील वळणरस्ता क्र.५ (शिव नाला रस्ता ते आरक्षण क्र.३१ पोहच) या १८ मीटर रुंदीच्या व १८०० मीटर लांबीच्या वळण रस्त्याचे कामास लगतचे मालमत्ता धारक यांनी हरकत घेतल्यामुळे माहे जुन, २०१४ ते माहे एप्रिल, २०१५ या कालावधीत ठेकेदार यांना सदरचे काम पूर्ण करता आले नाही कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत रहदारीचे नियोजनासाठी या रस्त्यांची आवश्यकता असलेने, नगरपंचायतीने उपलब्ध करुन दिलेल्या ९०० मीटर अंतरातील काम पूर्ण असून, उर्वरीत डांबरीकरण कामांसाठी ठेकेदार यांनी दि.३०/०५/२०१५ रोजीचे पत्रान्वये त्यांचे निविदेतील दरावर २०% दरवाढ व निविदेनुसार देय Price variation बिलाची मागणी केली आहे. त्यामुळे ठेकेदार यांनी ऑगस्ट २०१५ पासून पुढील काम बंद ठेवलेले आहे

महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळ शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचेदरम्यान दि.१६/१०/२००६ रोजी झालेल्या त्रिपक्षीय करारातील Article –III - 1. मध्ये The Sansthan shall make provision in the budjet and bear the total xpenditure of the project. असे नमूद केलेले आहे. त्यानुसार सदरहु प्रकल्पावर आज अखेर खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

**(अ) <u>प्रथम प्राधान्य गटातील एकुण ०९ रस्ते भूसंपादनासाठी अदा केलेली रक्कम.</u>**

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम अदा केल्याची दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर | एकूण ०९ रस्त्यांसाठी अंदाजित मोबदला रकमेच्या २/३ रक्कम व ३% आस्थापना खर्चाची रक्कम | २८ मार्च, २००७ | १८,२३,६०,८२०/- |
| | | मूळ प्रस्तावातील रस्ता क्र.०६ व ०७ चे भूसंपादनाचे अंतिम निवाड्यापोटी आदा केलेली रक्कम. | ०५ मे, २०१० | ०१,६६,८७,७६१/- |

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम अदा केल्याची दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर | मूळ प्रस्तावातील रस्ता क्र.०३, ०५, ०८ व ०९ चे भूसंपादनाचे अंतिम निवाड्यापोटी आदा केलेली रक्कम. | ०७ जून,२०१० | ०५,५१,६५,८५९/- |
| | | शिर्डी मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.३१ च्या कोप-यापासून | १८ एप्रिल, २०११ | ०९,६०,६४,६३९/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ते स.नं.०९ मधिल नियोजित १८ मीटर रुंदीच्या रस्त्यापर्यंत १८ मीटर रुंदीचा रस्ता विकसीत करणेकामी. | | |
| **एकुण रुपये (अ) ..** | | | | **३५,०२,७९,०७९/-** |

**(ब) <u>महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांना पाच रस्ते विकसीत करणेसाठी अदा केलेली रक्कम.</u>**

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम अदा केल्याची दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे | पूर्व प्राथमिक कामकाजासाठी | २९ ऑक्टोबर, २००६ | ५०,००,०००/- |
| | | प्रथम प्राधान्य गटातील ०५ रस्त्यांचे काम सुरु करणेसाठी आगाऊ रक्कम | २८ जानेवारी, २०१० | ३,००,००,०००/- |
| | | प्रथम प्राधान्य गटातील ०५ रस्त्यांचे काम सुरु असतांना कामाची देयके देणेसाठी. | १६ ऑगस्ट, २०११ | ४,००,००,०००/- |
| | | प्रथम प्राधान्य गटातील ०५ रस्त्यांचे काम सुरु असतांना कामाची देयके देणेसाठी. (चौथा टप्पा) | २६ एप्रिल, २०१२ | १,८०,००,०००/- |
| **एकुण रक्कम रुपये (ब).** | | | | **९,३०,००,०००/-** |

**(क) <u>शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अदा केलेली रक्कम.</u>**

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम अदा केल्याची दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | संयुक्त मोजणी शुल्क, सर्व्हेअर यांचे मानधन इत्यादीसाठी | १५ मार्च, २००७ | ४,७३,७१६/- |
| | | जलवाहिन्या, विद्युत वाहिन्या इत्यादी स्थलांतरीत करणेसाठी. | २८ जानेवारी, २०१० | ३६,२९,००८/- |
| **एकुण रक्कम रुपये (क).** | | | | **४१,०२,७२४/-** |

**(ड) <u>प्रथम प्राधान्य गटातील ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसीत करणेसाठी अदा केलेली रक्कम.</u>**

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम अदा केल्याची दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवी मुंबई | प्रथम प्राधान्य गटातील ०६ रस्ते विकसीत करणे कामापोटी रनिंग बिल क्र.१० पर्यंत अदा केलेली रक्कम. | जून, २०१६ अखेर | १९,६८,३४,३०६/- |
| | | सदर कामाचे भावफरक बिल क्र.०९ पर्यंत अदा केलेली रक्कम | जून, २०१६ अखेर | ४,३५,८१,४०७/- |
| ०२. | मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे | सदर कामासाठीची सल्लागार फी. | जून,२०१६ अखेर | १,२९,८६,९८४/- |
| **एकुण रक्कम रुपये (ड).** | | | | **२५,३४,०२,९६६/-** |
| **आज अखेर सदरहू प्रकल्पासाठी झालेला खर्च रुपये (अ+ब+क+ड)..** | | | | **७०,०७,८४,४९९/-** |

उपरोक्तप्रमाणे शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातंर्गत सुरु असलेले ११ रस्त्यांचे कामासाठी वरीलप्रमाणे आजपावेतो एकुण रक्कम रु.७०,०७,८४,४९९/- मात्र खर्च झालेला आहे. सदरहु प्रकल्पातील एकूण नऊ रस्त्यांचे भूसंपादनासाठी उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना एकुण रु.३५,०२,७९,०७९/- मात्र निधी उपलब्ध करुन देणेत आलेला असून, सदरचे नऊ रस्त्यांपैकी रस्ता क्र.०९ अ या रस्त्याची भूसंपादन प्रक्रीया पूर्ण झालेली नसल्या ने, सदर रस्ता कामासाठी उपलब्ध झालेला नाही.

**प्रस्ताव:** आता, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.२७/०४/२०१६ पत्रान्वये मंजुर विकास योजनेतील हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील निमगाव शिव ते जुना पिंपळवाडी रोड रस्ता या रस्त्याची भूसंपादन कार्यवाही उपविभागिय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत पुर्ण करण्यात आली असुन त्याबाबत निवाडा एलक्यु/ एसआर/०३/२००७ दि.०४/११/२०१० अन्वये झालेला आहे. त्या अनुषंगाने भूसंपादन कायदा १८९४ च्या कलम १८ नुसार मे. कोर्टाकडुन निकाल झालेल्या दाव्यांमधे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करून घेण्यासाठी उपविभागिय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना पत्र दिलेले आहे.

याबाबत उपविभागिय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दि.२९/०४/२०१६ रोजीचे पत्रान्वये, प्रस्तुत प्रकरणी रक्कम रु.८,१२,९८,१८०/- मात्र भरणेबाबत कळविले आहे. त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **रक्कम रु.** |
|---|---|---|
| ०१. | निवाड्याप्रमाणे देय मोबदला | ४,९८,११,३४१/- |
| ०२. | ३% आस्थापना खर्च | १४,९४,३४०/- |
| ०३. | भूसंदर्भानुसार वाढीव मोबदला व त्यावरील कलम २८ व कलम ३४ नुसार दि.३०/०६/२०१६ पर्यंत हिशोबीत केलेली रक्कम | ६,३७,५८,६७५/- |
| | **एकुण रक्कम** | **११,५०,६४,३५६/-** |
| ०४. | या भूसंपादन प्रकरणात यापुर्वी एकुण जमा करणेत आलेली रक्कम | ३,३७,६६,१७६/- |
| | **जमा करावयाची एकुण रक्कम (अ. नं.०१ ते ०३-०४)=** | **८,१२,९८,१८०/-** |

दि.३०/०६/२०१६ पुर्वी वरीलप्रमाणे जमा करावयाची एकुण रक्कम रु.८,१२,९८,१८०/- जमा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम दि.३०/०६/२०१६ पुर्वी जमा करण्यात आली नाहीतर न्यायालयाचे आदेशाप्रमाणे वाढीव मोबदला रक्कम रु.२,१९,०४,१६२/- या रकमेवर १५% प्रमाणे व्याजात वाढ होत राहील. तरी वरीलप्रमाणे हिशोबीत केलेली जमा करावयाची एकुण रक्कम सत्वर या कार्यालयाकडे जमा करणेबाबत कार्यवाही करावी असे नमूद केले आहे.

तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी दि०९/०५/२०१५ रोजीचे पत्रान्वये " मंजूर शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.३१च्या पश्चिम कोप-यापासून ते स.न.९ पर्यंत १८ मी. रुंद रस्त्यासाठी संपादित क्षेत्राचे मुल्यांकन नविन भूसंपादन कायदा सन २०१३ चे कलम २४ व २६ ते ३० आणि शासन परिपत्रक दि.२६/०५/२०१५ यातील तरतुदीनुसार केले आहे. प्रस्तुत प्रकरणात अधिसुचना प्रसिद्धीनुसार मुल्यांकन दि.२३/०२/२०१२ धरून संपादित होणारे स.नं., त्यांचे क्षेत्र, रेडीरेकनर दर, जमिनीचे मुल्यांकन, फळझाडे, रायवळझाडे, बांधकाम इत्यादिचे मुल्यांकन उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे दि.०२/०५/२०१६ रोजीचे पत्रात नमुद केले आहे. त्यानुसार एकूण संभाव्य देय मोबदला रक्कम रु.३७,७८,४८,७३९/-, आस्थापना खर्च रु. १,१३,३५,४६२/- अशी एकूण रक्कम रु.३८,९१,८४,२०१/- होत असुन यापुर्वी रु.९,६०,६४,६३९/- जमा केली असुन उर्वरीत रक्कम रु.२९,३१,१९,५६२/- उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडे जमा करणेबाबत कळविले आहे. "

उपरोक्त तपशील विचारात घेता सदरहु प्रकल्पाचे खर्चाबाबत सुधारीत तपशील खालीप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१. | सदर प्रकल्पासाठी आजपावेतो झालेला खर्च | ७०,०७,८४,४९९/- |
| ०२. | उर्वरीत रस्ता क्र.९ अ साठी अपेक्षित भूसंपादन खर्च(रु.३८,९१,८४,२०१.०० – रु.९,६०,६४,६३९/- = **२९,३१,१९,५६२/-**) | २९,३१,१९,५६२/- |
| ०३. | उपविभागिय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दि.२९/०४/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेली रस्ता क्र.८ साठी मा. कोर्टाकडुन निकाल झालेल्या दाव्यांमधे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम (रु. ११,५०,६४,३५६.००-३,३७,६६,१७६/- = **८,१२,९८,१८०/- +** रु.२,१९,०४,१६२/- या रकमेवर १५% प्रमाणे होणारी व्याजाची रक्कम.) | ८,१२,९८,१८०/- |
| ०४. | रस्ता क्र.०९ अ विकसन खर्च | ७,१७,७३,३६०/- |
| ०५. | रस्ता क्र.०५ उर्वरीत ९०० मी. काम पूर्ण करणेसाठी विकसन खर्च | ३,५०,००,०००/- |
| ०६. | सदर प्रकल्पातील एच. टी. व एल. टी. तसेच ट्रान्सफार्मर शिफ्टींग करणे इ. कामांसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना निधी उपलब्ध करुन देणे. (रु.९१,८६,५५२/- वजा यापूर्वी अदा केलेले रु.३६,२९,००८/- = **५५,५७,५४४/-**) | ५५,५७,५४४/- |
| | **एकुण अपेक्षीत खर्च रुपये..** | **११८,७५,३३,१४५/-** |
| | **वजा दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन मान्यतेनुसार मंजूर झालेली रक्कम** | **८८,००,००,०००/-** |
| | **सदर प्रकल्पाचे कामासाठी वाढीव खर्चाची रक्कम** | **३०,७५,३३,१४५/-** |

वरील प्रमाणे प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसीत करणेसाठी एकुण अंदाजे रु.११८,७५,३३,१४५/- मात्र खर्च येणार आहे. सदर प्रकल्पासाठी मा. शासनाने यापूर्वी रु.८८ कोटी खर्चास मान्यता मिळालेली असल्याने, सदरहू रस्त्यांचे वाढीव भूसंपादन खर्चाचा मुळ रकमेत समावेश नसलेने, प्रकल्पाचे किमतीमध्ये एकुण रु.३०,७५,३३,१४५/- मात्र इतक्या रकमेची वाढ होत आहे.

तरी वरील प्रमाणे वाढीव रक्कम रु.३०,७५,३३,१४५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व याकामी संस्थान अधिनियम २००४ मधिल कलम २१ (२) पोटकलम (१) आणी (१क) मधिल तरतुदीनुसार याकामी शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना भूसंपादनासाठी रु.३०,७५,३३,१४५/- (+ प्रस्तावानुसार देय व्याजासह) मात्र वाढीव रक्कम देणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली.**

**प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रस्ता क्र.५ विकसीत करणेसाठी भू-संपादन प्रक्रिया पुर्ण झालेली आहे, परंतु सदरहू कामाच्या खर्चाची रक्कम वाढलेली असल्याने संबंधीत ठेकेदार चालू डीएस.आर. प्रमाणे रस्त्याचे काम पुर्ण करतात का, याची विचारणा करण्यात यावी. तसेच ठेकेदाराने चालू डी.एस.आर. प्रमाणे काम करण्यास असमर्थतता दर्शविल्यास रस्ता क्र.५ सह शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेमधील ज्या रस्त्यांच्या भू-संपादनाची कार्यवाही पुर्ण झालेली आहे, असे सर्व रस्ते विकसीत करणेसाठी फेर ई-निविदा मागविण्यात याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८** **साईनिवास अतिथीगृह इमारतींचे प्लंबीग मेन्टेनंसची कामे करणेसाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| 01 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 1 | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| 02 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 2 (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| 03 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 6 | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| 04 | 21 | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | 1 (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

**प्रस्तावना:-** श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता संस्थानमार्फत निवासस्थान इमारतींची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतींमधील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देणेत येत आहेत.

साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील जा.नं./एसएसएस/वशी-सा.प्र.नि/945/2015, दि.01/06/2016 चे पत्रान्वये आगामी नाशिक कुंभमेळा-2015 करीता शिर्डीत श्री साईचे दशर्नासाठी होणारी संभाव्य गर्दी तसेच संस्थानचे साईनिवास अतिथिगृहात नेहमी मान्यवरांची निवासाची व्यवस्था करण्यात येत असल्याने सदर इमारतीमधील पाणी गळती थांबविणेसाठी पाणी पुरवठा विभागाचे संबंधीत कामे करुन घेणेबाबत कळविण्यात आलेले होते. पाणी पुरवठा विभागाकडुन साईनिवास अतिथीगृह इमारतीची पाहणी केली असता, सदर इमारतीचे ब-याच खोल्यांमधील बेसीन, कमोड संडास भांडे, शिट कव्हर, नळ खराब झालेचे आढळुन आलेले होते. सदरचे खराब झालेले साहित्य बदलविणे गरजेचे असल्याने यासाठी आवश्यक साहित्य ई-निविदा मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.6,13,200/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.23/07/2015 रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. याबाबत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला होता.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, कुंभमेळयाचे कालावधीसाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेची प्रक्रिया चालू असून प्रस्तावित साहित्यापैकी जे साहित्य कुंभमेळयाच्या साहित्यामध्ये उपलब्ध असेल ते साहित्य वगळून इतर प्लंबींग साहित्य खरेदीकामी फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

**प्रस्ताव:-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईनिवास अतिथीगृहाचे प्लंबींग मेन्टेनंस करणेसाठी जे साहित्य आवश्यक होते त्या साहित्याचा समावेश कुंभमेळयाचे कालावधीत करण्यात आलेल्या साहित्यामध्ये नसलेने सदरचे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

साईप्रसाद निवासस्थान विभाग जा.नं.एसएसएस/वशी-साप्रनि/1753/2016, दि.05/08/2016 अन्वये प्रस्ताव इकडील विभागास प्राप्त झालेला आहे. त्यानुसार संस्थानच्या नविन विश्वस्त मंडळाची नेमणूक करणेत आलेली आहे. त्यामुळे मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष साहेब व विश्वस्त वेळोवेळी साईनिवास अतिथीगृहात निवासाकरीता थांबतील. याकरीता तेथील सर्व सुट्स व्यवस्थीत असणे गरजेचे असल्याने सदरहू इमारतीमधील मेन्टेनंसची कामे तातडीने करणेबाबत कळविलेले आहे.

याकरीता खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | साहित्य तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | लॉग बॉडी कॉक (नं.5037 N) | जग्वार | 78 | नग | 1300.00 | 101400.00 |
| 2 | बेसीन पिलर कॉक. (नं.CQT-231698) | जग्वार | 28 | नग | 3700.00 | 103600.00 |
| 3 | सी.पी.ॲगल कॉक (नं.CQT-23053) | जग्वार | 78 | नग | 1100.00 | 85800.00 |
| 4 | वॉल हॅगींग कमोड संडास भांडे (सफेद)(नं.0298) | पॅरिवेअर | 28 | नग | 4200.00 | 117600.00 |
| 5 | ग्रेनाईट व्हाईट राऊंड बेसीन (नं.0448) | पॅरिवेअर | 28 | नग | 2800.00 | 78400.00 |
| 6 | फ्लश व्हॉल (नं.FLV 1095) | जग्वार | 28 | नग | 4500.00 | 126000.00 |
| 7 | हॅन्ड जेट स्प्रे | जग्वार | 50 | नग | 1350.00 | 67500.00 |
| 8 | 1/2" गेट व्हॉल | लिडर | 50 | नग | 600.00 | 30000.00 |
| 9 | 1" गेट व्हॉल | लिडर | 25 | नग | 1080.00 | 27000.00 |
| | | | | | **अंदाजे एकुण रक्कम-** | **7,37,300.00** |

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम 2004 नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा .व्यवस्थापन समितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे काम पाणी पुरवठा विभागांतर्गत करता येईल असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे नमुद साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु.7,37,300/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.7,37,300/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह इमारतींचे प्लंबीग मेन्टेनंसची कामे करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक मटेरियल विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,३७,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **नविन क्वॉयर फोम मॅट्रेस, मॅट्रेस प्रोटेक्टर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) २१ - १ चा (ग) – भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२) २१ चा (२) पोटकलम (ख) भक्तांना राहण्यासाठी व वापरण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**प्रस्तावीक–** साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग सन– १९९४ पासुन साईभक्तांचे सेवेत रुजु आहे. इमारतीमध्ये एकूण ५४४ खोल्या/ दुकान गाळे/ हॉल आहेत, पैकी ४८४ खोल्या साईभक्तांचे वापरात आहेत. सदर खोल्यांमध्ये एकूण १७२७ लोखंडी कॉट असुन प्रत्येक कॉटवर क्वॉयर फोम मॅट्रेस टाकलेल्या आहेत याकामी आवश्यक क्वॉयर फोम मॅट्रेस एकूण २००० नग (१७२७ नग कॉटवर टाकलेल्या आहेत व २७३ नग तुटफुटीसाठी ठेवणे आवश्यक) उपरोक्त संदर्भ क्र.१ चे निर्णयानुसार खरेदी करण्यात आलेल्या आहेत. सुमोर ५ वर्षापासून सदर मॅट्रेस साईभक्तांचे सतत वापरात आहेत, त्यामुळे ब-याच मॅट्रेस खराब झालेल्या आहेत. या फायबर फोम मॅट्रेस खरेदीकामी प्रति मॅट्रेस रु.२८७५/- प्रमाणे एकूण ५७,५०,०००.०० (अक्षरी रुपये सत्तावन्न लाख पन्नास हजार मात्र) इतका खर्च आलेला आहे.

दि.०६/०८/२००५ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेमधील मंजुर ठरावानुसार गादी, चादर, बेडशिट वापराचा कालावधी जास्तीतजास्त ३ वर्षाचा धरण्यात यावा व दर ३ वर्षांनी गादी, चादर, बेडशिट बदलण्यात यावे असे ठरले आहे. इकडील विभागाकडील खोल्यांचे दर तुलनेने सर्वात कमी असल्याने साईभक्तांची गर्दी असते.खोल्या ९० ते ९५ टक्के भरलेल्या असतात. त्यामुळे भक्तोपयोगी वस्तु सततच्या वापराने लवकर निकामी होतात.श्रीं चा महाशताब्दी सोहळा नजिक आलेला आहे.त्यामुळे नविन मॅट्रेसची आवश्यकता आहे.

**विभागाची मागणी–** इकडील विभागामधील खोल्यांसाठी २००० नग नविन क्वॉयर फोम मॅट्रेस फक्त ब्रॅन्डेड कंपनीच्याच खरेदी कराव्यात असे नम्र मत आहे. सदर क्वॉयर फोम मॅट्रेस साठी २००० नग वॉटरप्रुफ मॅट्रेस प्राटेक्टर (चारही बाजुने बंद) खरेदी केल्यास, मॅट्रेस वापराचा कालावधी निश्चितच वाढणार आहे.

**छाननी करुन अनुमान–** महाराष्ट्र शासनाने पारीत केलेला अधिनियम व मा.व्यवस्थापन मंडळाचे संमत ठरावानुसार जुन्या मॅट्रेसचा वापर कालावधी संपल्याने नविन क्वॉयर फोम मॅट्रेस व वॉटरप्रुफ मॅट्रेस प्राटेक्टर खरेदी करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–** आवश्यक २००० नग क्वॉयर फोम मॅट्रेस व २००० नग वॉटरप्रुफ मॅट्रेस प्राटेक्टर खालील स्पेशिफिकेशन (Specification) प्रमाणे खरेदी करावे लागणार आहे.

**Technical Specification of Mattress**

**Nos – 1750 Size – 1829 mm x 915 mm (72 ” x 36 ”) & Waterproof Mattress Protector**

| Sr.no | Description | Specification |
|---|---|---|
| 1 | Mattresses – 4 ” Thk | Quilted having foam – 12 mm thk, 18 gm/dm 3 |
| 2 | Thickness - Mattresses | 4 inch |
| 3 | Dry Rubberized Content (DRC) | 20 to 25 % |
| 4 | Latex Type | Centrifuged |
| 5 | RC pad Density (RC Pad Thickness- 75 mm) | 100 gm/dm 3 |
| 6 | Bonded Foam Thickness | 20 to 22 mm |
| 7 | Nature of Tapestry | Cotton |
| 8 | Tapestry | 120 to 140 GSM |
| 9 | Fabric | Anti Microbial Treatment |
| 10 | Mattress Protector | Waterproof (4 Side) |

**खालील मापाचे क्वॉयर फोम मॅट्रेस व क्वॉयर फोम मॅट्रेस प्रोटेक्टर खरेदी करावे लागतील.**

| अ.नं | तपशिल | नग |
|---|---|---|
| १ | ६' X ३' मापाच्या क्वॉयर फोम मॅट्रेस **(४ इंच जाडी)** ब्रॅन्डेड कंपनी – सेंच्युरी, कर्लान, स्लीपवेल, डनलॉप, गोदरेज. | २००० |
| २ | ६' X ३' मापाच्या क्वॉयर फोम मॅट्रेस प्रोटेक्टर (चार बाजु) ब्रॅन्डेड कंपनी – सेंच्युरी, कर्लान, स्लीपवेल, डनलॉप, गोदरेज. | २००० |

आपणास आवश्यक २००० नग क्वॉयर फोम मॅट्रेस व २००० नग वॉटरप्रुफ मॅट्रेस प्रोटेक्टर खरेदीकामी येणा-या अपेक्षीत खर्चाची तरतुद सन २०१६/२०१७ चे सुधारीत अंदाजपत्रकात करता येईल. खर्च साईभक्तांसाठी प्रदान करण्यात येणा-या सोयी सुविधांसाठी असल्याने महाराष्ट्र शासनाची मंजुरी आवश्यक नाही.

**तरी -**

अ) नमुदप्रमाणे २००० नग क्वॉयर फोम मॅट्रेस व २००० नग वॉटरप्रुफ मॅट्रेस प्रोटेक्टर खरेदीकामी येणा-या खर्चास तथा

ब) खरेदी, खरेदी विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई – टेंडर पध्दतीने करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी नामांकित कंपन्यांच्या २००० नग क्वॉयर फोम मॅट्रेस व २००० नग वॉटरप्रुफ मॅट्रेस प्रोटेक्टर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.१०** **ग्रुपमोबाईल (CUG) प्लॅन व Technical Feasibilities अनुसरुन आयडीया व एअरटेल या कंपन्यांच्या प्रतिनिधींशी PLAN BENEFIT व सेवेबाबत तसेच संस्थान अधिकारी/ कर्मचारी यांना सदर कामी देण्यात येणा-या मोबाईल बीलातील सवलतीबाबत चर्चा करुन अंतिम निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-(१) अन्वये समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

**१)** दि.२१/०६/२००९ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्रं.३०निर्णय क्रं.५७९.

**२)** दि.०५/०६/२०१४ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्रं.७१ निर्णय क्रं.३५९.

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजाकरीता संस्थान अंतर्गत व बाहेरील दुरध्वनी संपर्कासाठी BSNL च्या ग्रुप मोबाईल सेवेऐवजी Idea कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा सुरु करणेसाठी दि.२१.०६.२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे विषय नं.३०, निर्णय क्र.५७९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार आयडीया कंपनीकडुन ग्रुपमोबाईल सेवेअंतर्गत सुरवातीस ४६ मोबाईल सीमकार्ड खरेदी करण्यात आलेले होते. त्यामध्ये आयडीया कंपनीने सुरवातीस रु.१७५/- चा प्लॅन दिलेला होता. तदनंतर आयडीया कंपनीने ग्रुपमोबाईल सेवेमध्ये वेळोवेळी सुधारीत केलेले प्लॅन संस्थानकडे सादर केलेले असुन, त्यानुसार प्लॅन मध्ये वेळोवेळी बदल करण्यात आलेले आहेत.

सध्या संस्थान अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता आयडीया कंपनीचा रु.९९/- चा CUG ग्रुपमोबाईल प्लॅन कार्यरत असुन, कंपनीकडुन नविन सिरीजचे एकुण १०० नविन मोबाईल सीमकार्ड ७७२००७७२०० ते ७७२००७७२९९ या क्रमांकाचे खरेदी केलेले आहे. सदरचे एकुण १०० सीमकार्ड हे संस्थान आस्थापनेवरील मंजूर पदाकरीता मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मान्यतेने संबधित अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजाचे वापरासाठी देण्यात आलेले आहेत. सदरकामी घेण्यात आलेल्या एकुण १०० सीमकार्डचे दरमहा बील अंदाजे रु.२५ ते २६ हजार मात्र येत आहे.

आयडीया ग्रुप मोबाईल सेवेच्या तक्रारीबाबत आयडीया कंपनीस दि.२८.०५.२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले असुनही आयडीया कंपनीकडुन तक्रारीचे निवारण न झाल्याने त्यांना पुनश्च: दि.१२.०७.२०१६ रोजीचे पत्रान्वये नमुद तक्रारीबाबत कळविणेत येऊन त्यांनी १५ दिवसांचे आत कार्यवाही न

केल्यास त्यांचे बरोबर केलेला करार रद्द करणेत येईल, असे कळविण्यात आलेले होते. तथापी, यापुर्वी Idea कंपनीने संस्थानमध्ये ज्या ठिकाणी Network Coverage कमी आहे त्या ठिकाणी उदा. श्री साईबाबा हॉस्पीटलचे मा.वैद्यकीय संचालक यांचे कक्षामध्ये व ICCU विभागाचे आतील बाजूस Network Booster तत्कालीन मा.वैद्यकीय संचालक श्री बोबडे यांनी दिलेल्या तोंडी सुचनेनुसार दि.११.०७.२००९ रोजी कंपनीमार्फत बसविणेत आले आहे. तसेच सदरचे ठिकाणी Network Coverage हे व्यवस्थीत असून हॉस्पीटलचे मा.वैद्यकीय संचालक व ICCU विभागाचे कक्षाची रचना बंदीस्त स्वरुपाची असल्याने त्याठिकाणी Network Coverage करीता Network Booster बसविणेत आल्याचे त्यांनी दि.२३.०८.२०१६ रोजीचे ई-मेलद्वारे कंपनीने कळविले आहे.

सदर ठिकाणी Network Booster करीता विद्युत पुरवठा हा हॉस्पीटल विभागातून घेण्यात आला आहे. तसेच Idea कंपनीस त्याच धर्तीवर संस्थानचे परीसरामध्ये ज्याठिकाणी Network Coverage कमी प्रमाणात आहे त्याठिकाणी कंपनीने Network Booster बसविणेस तयारी दर्शविली असून, याकामी त्यांनी प्रत्यक्ष सर्व्हे केला असता, नविन भक्तनिवासस्थान जवळील साईप्रसाद हाऊसींग तसेच साई धर्मशाळेजवळील निमगाव हाऊसींग परीसरात Network Indoor Coverage कमी प्रमाणात असून त्यांनी तेथे Idea Network Booster उपलब्ध केले असून सदर ठिकाणी संस्थानने विद्युत पुरवठा उपलब्ध करुन दिल्यास तसेच Idea कंपनीचे पॉलीसी प्रमाणे करारनामा करुन दिल्यास Booster कार्यान्वीत करता येईल तसेच आवश्यकतेनुसार संस्थानचे इतर परीसरामध्ये देखील त्याच धर्तीवर आवश्यकतेनुसार Idea Network Booster बसविता येईल.

परंतु, उपरोक्त नमुद विषयांकीत प्रकरणी Idea अथवा Airtel यापैकी एका अधिकृत कंपनीची सेवा यापुढे सुरू ठेवणे बाबतचा निर्णय निश्चीत झालेनंतर संबंधीत कंपनीकडून संस्थान परीसरात Network Booster बसविणे बाबतचा करारनामा तसेच विद्युत पुरवठा उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करणे योग्य राहील.

तसेच संस्थान परिसरामध्ये Network Jammer कार्यान्वीत असल्यास त्याचा Signal Strength वर परीणाम होऊ शकतो, असे त्यांनी दि.२४.०८.२०१६ रोजीचे ई-मेलद्वारे कळविले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०२.२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.४८ व निर्णय क्र.१२३ अन्वये संस्थान मंदिर परीसरामध्ये मोबाईल जॅमर यंत्रणा कार्यान्वीत करणेकामीचे प्रस्तावास मान्यता मिळालेली असून, त्यानुसार कार्यवाही प्रस्तावीत असल्याचे समजते. संस्थान मंदिर परीसरामध्ये मोबाईल जॅमर यंत्रणा कार्यान्वीत झाल्यास त्याचा संस्थान अधिकारी/कर्मचारी यांचे मोबाईलचे Signal Strength वर परीणाम होऊन Network Coverage Block होऊ शकते.

तसेच दि.०५.०८.२०१६ रोजीचे आयडीया कंपनीचे प्राप्त ई-मेलवर प्रस्ताव सादर करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी सो यांनी निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार आयडीया कंपनीची संस्थानमध्ये कार्यरत असलेली ग्रुपमोबाईल सेवा व्यवस्थित मिळत नसल्याने आयडीया कंपनी व्यतिरीक्त ग्रुपमोबाईल सेवा देणा-या इतर टेलीकॉम कंपन्या उदा.बीएसएनएल, एअरटेल, वोडाफोन, रिलायन्स, युनिनॉर, एअरसेल इत्यादी कार्यरत आहेत. त्यांना संस्थानमध्ये सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या आयडीया कंपनीच्या ग्रुपमोबाईल CUG प्लॅन बाबतची माहीती दि.०३.०८.२०१६ रोजीचे मेलव्दारे कळवुन, श्री साईबाबा संस्थान अधिकारी/कर्मचा-यांकरीता सवलतीच्या दरात अद्यावत CUG ग्रुपमोबाईल प्लॅन तयार करुन व सबधित कंपनीचे तांत्रिक बाबीबाबत सविस्तर माहीती मेलव्दारे संस्थानला कळविणेसाठी तसेच सदर माहीती प्राप्त झालेनंतर संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडु यांचेकडुन सर्व तांत्रिक बाबींची पडताळणी करुन त्यांचे अभिप्रायासह सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेकामी दि.२७.०७.२०१६ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार टेलीकॉम क्षेत्रात कार्यरत असलेल्या उदा.बीएसएनएल, एअरटेल, वोडाफोन, रिलायन्स, युनिनॉर, एअरसेल इ. कंपन्यांना सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या आयडीया कंपनीच्या ग्रुपमोबाईल CUG प्लॅन बाबतची माहीती दि.०३.०८.२०१६ रोजीचे ई-मेलव्दारे कळविण्यात आलेली असुन, वेळोवेळी संबंधीत कंपनीबरोबर पाठपुरावा करुन त्यापैकी फक्त बीएसएनएल, एअरटेल, वोडाफोन, टाटा, आयडीया या कंपन्याकडुन त्यांचे ग्रुपमोबाईल सेवेबाबतचे CUG 99 प्लॅन तसेच वोडाफोन व्यतिरीक्त इतर टेलिकॉम कंपन्यांची तांत्रिक बाबींची माहीती ई-मेलद्वारे अनुक्रमे दि.०८.०८.२०१६, दि.१२.०८.२०१६, दि.१०.०८.२०१६, दि.०४.०८.२०१६, दि.१२.०८.२०१६ रोजी प्राप्त झालेली असुन त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे-

| **Plan Details** | **Idea Current CUG 99** | BSNL (CUG) | Vodafone (CUG) | **Airtel (CUG 99)** | **Idea (CUG 99)** | Tata (CUG) | Reliance (CUG) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Activation Fee Company | Nil | Nil | -- | **Free** | **Nil** | Nil | --- |
| Activation Fee Employee 1st Connection | Free | Free | -- | **Free** | **Nil** | Free | --- |
| Activation Fee Employee 2nd / 3rd Connection | Rs.200 each | Rs.200 each | -- | **Free** | **Nil** | Rs.200 each | --- |
| Plan Enrollment Fee (PEF) | Nil | Nil | -- | **Nil** | **Nil** | Nil | --- |
| Monthly Rental (Rs.) | 99 | 99 | 125 | **99** | **99** | 99 | ---- |
| Clip Charges | 0 | 0 | -- | **0** | **0** | 0 | --- |
| **PLAN BENEFIT** | | | | | | | |
| Free Benefits (Within Home Network) | 350 Local Min. 200 SMS | 350 Local Min. 200 SMS | 350 Local Min. 100 SMS | 400 Local Min. 200 SMS | **400 Local Min. 250 SMS** | 350 Local Min. 200 SMS | --- |
| **LOCAL CALLS** | | | | | | | |
| Within Group | Free | Free | Free | **Free** | **Free** | Free | --- |
| Company To Company | 0.30 ps. | 0.30 ps. | 0.30 ps. | **0.30 ps.** | **0.30 ps.** | 0.30 ps. | --- |
| Company To Other Mobile | 0.30 ps. | 0.30 ps. | 0.40 ps. | 0.40 ps. | **0.30 ps.** | 0.30 ps. | --- |
| Company To Fixed Line (Landline) | 0.50 ps. | 0.50 ps. | 0.50 ps. | **0.50 ps.** | **0.50 ps.** | 0.50 ps. | --- |
| **STD CALLS** | | | | | | | |
| All STD Calls | 0.50 ps. | 0.50 ps. | 0.50 ps. | **0.50 ps.** | **0.50 ps.** | 0.50 ps. | --- |
| **ROAMING CALLS** | | | | | | | |
| Incoming | Free for Mumbai within Group | Free for Mumbai within Group | **--** | **Free** | **Free for Mumbai within Group** | Free for Mumbai within Group it will be Chargeable | ---- |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| Outgoing Local | Rs.1 | Rs.1 | -- | **0.80 ps.** | Rs.1 | Rs.1 | --- |
| Outgoing STD | Rs.1.50 | Rs.1.50 | -- | **0.80 ps.** | Rs.1.50 | Rs.1.50 | --- |
| **SMS** | | | | | | | |
| Local | 0.30 ps. | 0.30 ps. | -- | **0.20 ps.** | 0.30 ps. | 0.30 ps. | --- |
| National | 0.30 ps. | 0.30 ps. | **--** | **0.30 ps.** | **0.30 ps.** | 0.30 ps. | --- |
| International | Rs.5 | Rs.5 | **--** | **Rs.5** | **Rs.5** | Rs.5 | --- |

उपरोक्त ग्रुपमोबाईल CUG प्लॅनच्या दरांचे अवलोकन करता, BSNL विभागाने सद्यस्थितीत चालू असलेल्या आयडीया ग्रुपमोबाईल CUG प्लॅनप्रमाणेच BSNL चा ग्रुप मोबाईल CUG प्लॅन देता येईल, असे कळविले आहे. आयडीया कंपनीने PLAN BENEFIT मध्ये 400 Local Min. व 250 SMS देऊ केलेले आहे. तसेच एअरटेल कंपनीने PLAN BENEFIT मध्ये 400 Local Min. व 200 SMS देऊ केलेले असुन Roaming Calls मध्ये एअरटेल यांनी कमी दर देऊ केले असून Free SMS व्यतिरीक्त एअरटेल यांनी लोकल SMS ला कमी दर देऊ केले आहे.

**Technical Feasibilities Details**

| Sr. No. | Parameter | BSNL | Vodafone | Airtel | Idea | Tata | Reliance |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | No. of BTS (Base Transceiver Station) in Shirdi in details like as 2G, 3G and 4G | 2G-9<br>3G-6 | --- | 2G-5<br>3G-5<br>4G-4 | 2G-8<br>**3G-8**<br>**4G-8** | 2G-5<br>3G-5 | --- |
| 02 | Download/ upload frequency | 890 Mhz - 960 Mhz | --- | 5.90/3.22 Mbps | **Upload :**<br>2G (895.2-1719)<br>**3G-8 (1969-1974)**<br>**4G-8 (1710.2-1715)**<br>**Download:**<br>2G (940.2-1814)<br>**3G - 8 (2159-2164)**<br>**4G - 8 (1805.2-1810)** | Upload :<br>2G (1760.6-1764.8)<br>3G- (1959-1964)<br>Download<br>2G (1855.6-1859.8)<br>3G- (2149-2154) | --- |
| 03 | Coverage area | 100 % | --- | 2G/3G/4G | Good outdoor coverage in Shirdi town | Temple Area,<br>ST Stand Area<br>Nagar Panchayat Area<br>Bhakta Niwas,<br>Laxmi Nagar,<br>Prasadalay<br>PWD Rest House Area<br>Hedgewar Nagar Area | --- |
| 04 | Uptime | 99.8 % | --- | 80 % | **99.85 %** | 2G:99.99<br>3G:99.99 | --- |
| 05 | Signal strength (Outdoor/Indoor) | -65db to -80db (OD)<br>-65db to -95db (ID) | --- | Indoor - 70-85 %<br>Outdoor - 50.70 % | 2G- 900 MHZ<br>3G- 2100 MHZ<br>4G- 1800MHZ | Being Checked | --- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 06 | Voice quality | 97 % | --- | 2G-0-5 % 3G-0-0.9% | **98.95 %** | 2G:99.26 3G:99.85 | --- |
| 07 | Call setup success rate (CSSR) | 99 % | --- | 99.95 % | **99.40 %** | 2G:99.94 3G:99.58 | |
| 08 | % blocked calls | 1 % | --- | 0 % | Can refer equivalent KPI TCH Congestion | 2G:0 3G:0 | |
| 09 | Call drop rate | 0.5 % | --- | 0.97 % | **0.39 %** | 2G:0.12 3G:0.51 | |
| 10 | Hands off success rate | 100 % | --- | 98.55 % | 98.51 % | 2G:99.88 3G:99.97 | |
| 11 | Total Number of Subscribers (Prepaid + Post-paid) in Shirdi. | 10,000 Approx. | --- | Prepaid 6000 Postpaid 1200 Total 7200 | **25,000** | 2399 (Prepaid)+82 (Post Paid) =2481 | |
| 12 | Authorised Service Centre in Shirdi. | 02423-255902 | --- | Shirdi | Shirdi | NA | |
| 13 | VLR % (Visitors Location Registration) in Shirdi. | MSC Pune | --- | 50-60 MNP Market Share 23% | **90 %** | 0.22 % | |
| 14 | SDCCH (Standalone dedicated control channel) Congestion. | 0 % | --- | NA | - | 2G:0 3G:0 | |
| 15 | TCH (Traffic Channel) Congestion. Etc., | 0 % | --- | NA | - | 2G:0 3G:0 | |

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मोबाईल कंपन्यांचे PLAN BENEFIT व Technical Feasibilities **Parameter** बाबतची प्राप्त माहिती संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडु यांनी समक्ष तपासली असता, त्यांनी उपरोक्त ग्रुपमोबाईल CUG प्लॅन हा संस्थान कर्मचारी/अधिकारी यांना उपयुक्ततेच्या दृष्टीकोनातून PLAN BENEFIT व Technical Feasibilities Parameter चा सारासार विचार करता, त्यांनी दि.१२.०८.२०१६ रोजीचे ई-मेल अन्वये खालीलप्रमाणे आपला तांत्रिक अभिप्राय नमुद केला आहे

I have gone through the documents & reached the following conclusion.

**1)** Of all the Mobile service providers Idea & Airtel have the highest number of base stations in Shirdi.Therefore only they will be able to give voice clarity &avoid call drops.

**2)** Both the above companies have good coverage area in &around Shirdi &SSST Premises.

**3)** Technical Parameters of both companies are similar & comparable.

**4)** Rates offered by Airtel are the lowest for both the local and roaming while Idea has similar rates for local but its rate are more than Airtel in roaming plan.
**IDEA has a minor benefit of more local SMS than Airtel.**

**5)** **Idea has around 4 times more local subscribers than Airtel Locally.**

Hence both Airtel & Idea is Beneficial for Shri Saibaba Sansthan considering the Technical as well as commercial benefits.

Also we should check our premises, where mobile jammers have been installed previously in our premises. This may be affecting the signal strength of the mobile network.

तरी, उपरोक्त नमुद तांत्रीक सल्लागार यांचे अभिप्रायानुसार आयडीया व एअरटेल या दोन्ही कंपन्या संस्थान अधिकारी/ कर्मचा-यांकरीता ग्रुपमोबाईल CUG 99 प्लॅन ची सेवा आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे.

तसेच श्रींचे महाशताब्दी महोत्सवाचे दृष्टीने आवश्यक त्या वेळेस ग्रुपमोबाईल सीमकार्डची संख्या वाढवायची झाल्यास संबधित/नियुक्त केलेल्या कंपनीकडुन त्याच ग्रुपमोबाईल CUG प्लॅननुसार आवश्यकतेप्रमाणे सीमकार्ड घेणेस व त्याप्रमाणे संबधित/नियुक्त केलेल्या कंपनीस बील अदा करता येईल, त्यास आपली मान्यता असावी.

संस्थान अधिकारी/ कर्मचारी यांना ग्रुपमोबाईल बीलामध्ये एकुण देऊ केलेल्या सवलतीच्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. सद्यस्थितीत संस्थान अधिकारी/ कर्मचारी यांना ग्रुपमोबाईल करीता आयडीया कंपनीचा रु.९९/- चा ग्रुपमोबाईल CUG प्लॅन कार्यरत असुन खालीलप्रमाणे बीलाबाबतचे सवलतीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे. खालील सवलतीच्या व्यतिरिक्त जादा होणारे बील संबधित अधिकारी/ कर्मचारी यांचे मासीक पगारातून वसुली करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष साहेब | सर्व बील सवलत |
| २) मा.कार्यकारी अधिकारी साहेब | सर्व बील सवलत |
| ३) मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब | सर्व बील सवलत |
| ४) मा.प्रशासकिय अधिकारी | रु.७००/- पर्यंत सवलत (१००+२००+४००) |
| ५) डॉक्टर्स व विभागप्रमुख | रु.३००/- पर्यंत सवलत (१००+२००) |
| ६) पर्यवेक्षक | रु.२५०/- पर्यंत सवलत (१००+१५०) |
| ७) तांत्रिक सहाय्यक, वरिष्ठ लिपीक | रु.२००/- पर्यंत सवलत (१००+१००) |
| ८) वाहन चालक व सुरक्षा पर्यवेक्षक | रु.१५०/- पर्यंत सवलत (१००+५०) |

**मागणी:-** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे तांत्रीक सल्लागार यांचे अभिप्रायानुसार आयडीया व एअरटेल या दोन्ही कंपन्या संस्थान अधिकारी/ कर्मचा-यांकरीता ग्रुपमोबाईल( CUG 99 प्लॅन) ची सेवा आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे.

आयडीया व एअरटेल यापैकी एका कंपनीची ग्रुपमोबाईल (CUG 99 प्लॅन) सेवा घेणेकामी दोन्हीही कंपन्यांच्या प्रतिनिधीना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावुन त्यांचेशी त्यांनी देऊ केलेल्या PLAN BENEFIT बाबत समक्ष चर्चा करुन, त्यातील जी कंपनी ग्रुपमोबाईल (CUG 99 प्लॅन) प्लॅनमध्ये जास्तीत जास्त सवलत व अद्यावत सेवा तत्परतेने उपलब्ध करुन देईल, तसेच सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या नंबरला MNP (Mobile Number Portability) ची सुविधा उपलब्ध करुन देईल, त्या कंपनीची ग्रुपमोबाईल (CUG 99 प्लॅन) सेवा घेणेकामी निर्णयार्थ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश,तांत्रिक,व कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय:-** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे तांत्रीक सल्लागार यांचे अभिप्रायानुसार आयडीया व एअरटेल या दोन्ही कंपन्या संस्थान अधिकारी/ कर्मचा-यांकरीता ग्रुपमोबाईल CUG 99 प्लॅन ची सेवा आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे.

आयडीया व एअरटेल यापैकी एका कंपनीची ग्रुपमोबाईल (CUG 99 प्लॅन) सेवा घेणेकामी दोन्हीही कंपन्यांच्या प्रतिनिधीना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावुन त्यांचेशी त्यांनी देऊ केलेल्या PLAN BENEFIT बाबत समक्ष चर्चा करुन, त्यातील जी कंपनी ग्रुपमोबाईल (CUG 99 प्लॅन) प्लॅनमध्ये जास्तीत जास्त सवलत व अद्यावत सेवा तत्परतेने उपलब्ध करुन देईल, तसेच सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या नंबरला MNP (Mobile Number Portability) ची सुविधा उपलब्ध करुन देईल, त्या कंपनीची ग्रुपमोबाईल (CUG 99 प्लॅन) सेवा घेणेकामी निर्णयार्थ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अधिकारी/ कर्मचाऱ्यांकरीता सध्या आयडीया कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा चालू असल्यामुळे यापुढेही आयडीया कंपनीचीच सेवा चालू ठेवण्यात यावी. परंतु ग्रुपमोबाईल सेवेच्या सवलतीमधून समिती अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची नावे वगळणेत यावी. तसेच ग्रुपमोबाईल प्लॅनमध्ये जास्तीत जास्त सवलत व तत्परतेने अद्ययावत सेवा उपलब्ध करुन देणेबाबत आयडीया कंपनीला सुचीत करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- ध्वनीक्षेपण विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **जुनी वाहने जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम- २००४ मधील तरतुदः-** १७ (२) (झ) मध्ये सर्व साधारपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

**प्रस्ताविकः-** सध्या वाहन विभागाकडे खालील प्रमाणे वाहने वापरात आहेत.

| अ.नं. | तपशिल | सध्याची एकुण वाहने |
|---|---|---|
| 01 | कार्यालयीन वाहने | 12 |
| 02 | रुग्णवाहीका वाहने | 13 |
| 03 | मालवाहतुक | 20 |
| 04 | ट्रेलर व टॅंकर | 06 |
| 05 | स्कुल बसेस | 13 |
| 06 | प्रवासी बसेस | 11 |
| 07 | अग्निशामक वाहने | 02 |
| 08 | टुव्हिलर | 09 |
| 09 | इतर वाहने (कॅश व्हॅन, क्रेन, टॉयलेट व्हॅन, जेट व सक्शन मशिन) | 06 |
| 10 | बॅटरी कार | 04 |
| 11 | मोबाईल टॉयलेट (ट्रॉली) | 10 |
| | **एकुण** | **106** |

उपरोक्त वाहनांपैकी खालील प्रमाणे कार्यालयीन-०६, रुग्णवाहीका-०५, मालवाहतुक-०२, प्रवासीबस-०४, स्कुलबस-०१ व दुचाकी-०५ अशी एकुण २४ वाहने बरीच जुनी झालेली असल्यामुळे व त्यांचा वापर अधिक झालेने त्यांचे देखभाल दुरुस्ती वर मोठया प्रमाणात खर्च होत आहे. तसेच बॉडीचा पत्रा गंज पकडुन वाहने खराब होत असल्याने सदर वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक आहे.

विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांचे पत्र क्र.सासंवि-२००५/३८७/(११७)-का-सोळा, दि.२९/०६/२००६ रोजीचे पत्रान्वये, संस्थानकडील जुनी वाहने निर्लेखित करणेसाठी शासनाच्या खलील अटीचे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

१) शासनाच्या नियमांचे पालन करण्याच्या अटीस अधिन राहून ०५ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक जुनी असलेली किंवा एक लाख किलोमीटरपेक्षा जास्त धाव झालेल्या वाहनांच्या लिलाव विक्रीस शासन मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर लिलाव विक्री संस्थानच्या विहीत कार्यपध्दतीनुसार व्हावी.

३) लिलाव विक्रीनंतर जमा झालेली रक्कम संस्थानच्या निधीत जमा करण्यात यावी.

४) उपरोक्त नियमात न बसणा-या वाहनांच्या लिलाव विक्रीबाबत सबळ कारण देऊन प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा.

५) उपरोक्त वाहनांच्या विक्रीनंतर संस्थानचा नवीन वाहन खरेदीचा मानस असल्यास त्याबाबतच परिपूर्ण प्रस्ताव शासन मान्यतेसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यात यावा.

शासनाच्या उपरोक्त अटीचे पालन करुन संस्थानचे जाहीर लिलावाच्या विहीत कार्यपध्दतीनुसार, यापुर्वी दि.१७/०९/२००६ रोजी ०८ वाहने, दि.०५/०६/२००७ रोजी १४ वाहने, दि.२४/०५/२००८ रोजी ०६ वाहने, दि.१९/०३/२००९ रोजी ०५ वाहने तसेच दि.१२/०१/२०१२ रोजी १० वाहने अशी एकुण ४३ जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करण्यात आलेली आहे.

**जाहीर लिलावाने विक्री करावयाचे वाहनांचा तपशिल खालील प्रमाणे:-**

| अ.नं | संगणक कोड नं. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | वाहनची रजि. दिनांक | वाहनाची खरेदी किंमत (रु.) | जुलै-२०१६ अखेर वर्ष-महिने | झालेले प्रवास (कि.मी.) (दि.०१/०८/२०१६ रोजी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **कार्यालयीन वाहने-०६** | | | | |
| 01 | VEH-6073 | MH-17-V-9977 | टोयोटा इनोव्हा | 22/12/2008 | 11,07,842.00 | 07-07 | 2,11,236 |
| 02 | VEH-6057 | MH-17-Y-3636 | महिंद्रा लोगान (मुंबई कार्यालय) | 28/11/2007 | 3,05,242.00 | 08-08 | 53,608 |
| | TAP-810 | Pioneer CD Player P-3990 MP with Sound Box-02 No. | | 11/12/2007 | 6,500.00 | | |
| 03 | VEH-6074 | MH-17-V-9988 | टोयोटा इनोव्हा | 22/12/2008 | 11,07,633.00 | 07-07 | 2,68,396 |
| | ELEQ-803 | DVD Pioneer 3190 UB with Screen | | 09/02/2010 | 10,999.00 | | |
| 04 | VEH-6075 | MH-17-V-8483 | महिंद्रा झायलो | 20/01/2009 | 6,22,922.00 | 07-06 | 2,09,694 |
| | ELEQ-804 | CD Pioneer 3190 UB with speaker | | 10/06/2009 | 10,800.00 | | |
| 05 | VEH-6089 | MH-17-AJ-1691 | स्विफ्ट डिजायर | 07/08/2011 | 6,91,393.00 | 04-11 | 1,06,580 |
| 06 | VEH-6051 | MH-17-V-1701 | टाटा सुमो | 15/12/2006 | 6,02,192.00 | 09-07 | 2,32,302 |
| | MCH-8005 | कारटेप TKR फिलीप्स कं., स्पिकरबॉक्स व FM सह | | 13/09/2001 | 2050.00 | | |
| | | | **रुग्णवाहीका वाहने-०५** | | | | |
| 07 | VEH-6092 | MH-17-AG-2418 | टाटा विंगर रुग्णवाहीका | 11/04/2011 | 5,58,978.00 | 05-03 | 1,84,625 |
| 08 | VEH-6088 | MH-17-AG-2420 | टाटा-407 शववाहीका | 11/04/2011 | 10,50,625.00 | 05-03 | 4,11,543 |
| 09 | VEH-6045 | MH-17-T-7101 | टाटा-407 शववाहीका | 08/09/2006 | 6,97,417.00 | 09-10 | 2,97,338 |
| | ELEQ-802 | पायोनर MP3 CD with Sound system | | 27/07/2007 | 6,075.00 | | |
| 10 | VEH-6093 | MH-17-AG-2419 | टाटा विंगर रुग्णवाहीका | 26/04/2011 | 5,58,978.00 | 05-03 | 2,23,778 |
| 11 | VEH-6083 | MH-17-AG-2031 | तवेरा रुग्णवाहीका | 01/02/2011 | 5,72,750.00 | 05-06 | 3,39,454 |
| | | | **मालवाहतुक-०३** | | | | |
| 12 | VEH-6033, VEH-6036 | MH-17-K-9909 | महिंद्रा कॅम्पर बॉडीसह | 09/03/2005 | 3,95,664.31 | 11-04 | 1,11,430 |
| 13 | VEH-6039 | MH-17-T-6801 | टाटा-४०७ | 03/07/2006 | 6,32,300.00 | 10-02 | 1,58,104 |
| 14 | VEH-6032, VEH-6037 | MH-17-K-9910 | महिंद्रा मॅक्स बॉडीसह | 09/03/2005 | 2,92,536.44 | 11-04 | 1,48,180 |
| | | | **प्रवासी बसेस-०४** | | | | |
| 15 | VEH-6055 | MH-17-T-8504 | प्रवासी बस | 13/04/2007 | 15,42,000.00 | 09-03 | 1,32,664 |
| 16 | VEH-6055 | MH-17-T-8505 | प्रवासी बस | 13/04/2007 | 15,42,000.00 | 09-03 | 1,68,598 |
| 17 | VEH-6041 | MH-17-T-7109 | प्रवासी बस | 08/09/2006 | 15,52,751.00 | 09-10 | 3,99,389 |
| 18 | VEH-6041 | MH-17-T-7110 | प्रवासी बस | 08/09/2006 | 15,52,751.00 | 09-10 | 3,41,882 |
| | | | **स्कुलबसेस-०१** | | | | |
| 19 | VEH-6024 | MH-17-C-8851 | स्कुलबस | 22/02/2002 | 9,30,600.00 | 15-05 | 2,68,828 |
| | | | **टुव्हिलर -०५** | | | | |
| 20 | VEH-6049 | MH-17-W-8541 | हिरो होंडा सुपर स्प्लेंडर | 16/12/2006 | 42,481.00 | 10-07 | 38,580 |
| 21 | VEH-6011 | MH-17-H-3282 | हिरों होंडा स्प्लेंडर | 20/08/1999 | 46,000.00 | 16-11 | 1,11,384 |
| 22 | VEH-6013 | MH-17-Z-8201 | TVS Flame | 09/09/2008 | 45,611.25 | 07-10 | 38,580 |
| 23 | VEH-6087 | बॅटरी बाईक स्कुटी | वालेकर ई-मोटर्स | 09/12/2010 | 27,563.00 | 05-10 | --- |
| 24 | VEH-1101 | MH-17-Q-5601 | TVS Santro | 13/03/2004 | 37,500.00 | 12-04 | 51,295 |

वरील प्रमाणे अ.नं.०१ ते २४ वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेपुर्वी अधिनियम-२००४ चे कलम १७ (४) अन्वये शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

उपरोक्त जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री केलेनंतर शिल्लक राहणारी वाहने खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | सध्याची एकुण वाहने | लिलावातील वाहने | लिलावानंतर शिल्लक वाहने |
|---|---|---|---|---|
| 01 | कार्यालयीन | 12 | 06 | 06 |
| 02 | रुग्णवाहीका वाहने | 13 | 05 | 08 |
| 03 | मालवाहतुक | 20 | 03 | 17 |
| 04 | ट्रेलर व टॅकर | 06 | -- | 06 |
| 05 | स्कुल बसेस | 13 | 01 | 12 |
| | प्रवासी बसेस | 11 | 04 | 07 |
| 06 | अग्निशामक वाहने | 02 | -- | 02 |
| 07 | टुव्हिलर | 09 | 05 | 04 |
| 08 | इतर वाहने (कॅश व्हॅन, क्रेन, टॉयलेट व्हॅन, जेट व सक्शन मशिन) | 06 | -- | 06 |
| 09 | बॅटरी कार | 04 | -- | 04 |
| 10 | मोबाईल टॉयलेट (ट्रॉली) | 10 | -- | 10 |
| | **एकुण** | **106** | **24** | **82** |

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेपुर्वी सदर वाहनांची उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचेकडून मुल्यांकन काढुन सदर वाहने जाहीर लिलावाने विक्री करणे बाबत मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल. शासनाची मान्यता मिळालेनंतर सदर वाहनांचा जाहीर लिलावद्वारे विक्री करता येईल. सदर वाहनांचे लिलावास मान्यता मिळाले नंतर लिलावापुर्वी आवश्यकतेनुसार नवीन वाहने खरेदीचा प्रस्ताव अलाहीदा सादर करण्यात येत आहे.

**मागणीः-** तरी उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०१ ते २४ वाहने संस्थानच्या विहीत कार्यपध्दतीनुसार जाहीर लिलावाने विक्री करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.१२** **नवनिर्मित आंध्र प्रदेशच्या राजधानीत साईबाबा संस्थानचे केंद्र उभारणेबाबत श्री.के.डी.प्रसाद, मॅनेजिंग ट्रस्टी, श्री शिर्डी चॅरिटेबल ट्रस्ट,तेनाली, आंध्र प्रदेश यांचा प्रस्ताव.**

**प्रस्ताव–** नवनिर्मित आंध्र प्रदेशच्या राजधानीत साईबाबा संस्थानचे केंद्र उभारणेबाबत.

**प्रस्तावना-** श्री.के.डी.प्रसाद,मॅनेजिंग ट्रस्टी,श्री शिर्डी चॅरिटेबल ट्रस्ट,तेनाली,आंध्र प्रदेश यांनी नवनिर्मित आंध्र प्रदेशची राजधानी अमरावती या ठिकाणी श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार होणेचे दृष्टीकोनातून संस्थानचे सेंटर उभारणेकामीची विनंती विषयांकित पत्रात नमूद केलेली आहे. त्यात त्यांनी "अमरावती हे विजयवाडा व गुंटूर पासून जवळ आहे. आंध्र प्रदेशमध्ये साईभक्तांची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे आंध्र प्रदेशमध्ये वेगवेगळया ठिकाणी दिवसागणिक छोटे-मोठे साईबाबा मंदिर बांधणेत येत आहेत. त्याऐवजी सदर भागात संस्थानतर्फे एकच मोठे मंदिर बांधल्यास तेथील जे गोरगरीब भक्त शिर्डीस साईबाबांच्या दर्शनासाठी येवू शकत नाही अशा भक्तांची दर्शनाची सोय त्या ठिकाणी होईल. सदर ठिकाणी सेंटर उभारणेसाठी किमान ४ ते ५ एकर क्षेत्र जमीनीची आवश्यकता आहे. सदर जमीन आंध्र प्रदेश सरकारकडून किफायतशीर दरात उपलब्ध करता येईल. त्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करुन संस्थानला पूर्णपणे आमच्या ट्रस्टमार्फत सहकार्य करु. भविष्यात सदर जागेत संस्थानमार्फत गोरगरीबांसाठी शैक्षणिक संस्था सुरु करता येईल व त्यात Impart human values & Sai Philosophy Centre तरुणांसाठी सुरु करता येतील" वगैरेबाबतचा मजकूर नमूद केलेला आहे.

उपरोक्त बाबींचे अवलोकन केले असता अर्जदार यांनी आंध्र प्रदेशची राजधानी अमरावती येथे संस्थानने ४ ते ५ एकर क्षेत्र खरेदी करुन घेवून त्या ठिकाणी मोठे प्रमाणात श्री साईबाबा मंदिर उभारावे व सदर भागात विकास करावा असेबाबतची इच्छा प्रकट केलेली असलेचे दिसून येते.

**विभागाचा अभिप्राय-** शिर्डी व्यतिरिक्त अन्यत्र संस्थानमार्फत साईबाबांचे मंदिर बांधणेची व विकास करणेबाबतची कोणतीही तरतूद अथवा कोणताही निर्णय यापूर्वी झालेला असल्याचे दिसून येत नाही.

सदरची बाब ही धोरणात्मक असलेने उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी व्यतिरिक्त अन्यत्र संस्थानमार्फत साईबाबांचे मंदिर उभारता येणार नाही, मात्र आंध्रप्रदेश राज्यामध्ये साईभक्तांची संख्या मोठया प्रमाणात असल्यामुळे तेथे संस्थानचे अधिकृत माहिती केंद्र उभारता येईल, याकरिता आंध्र प्रदेश राज्याच्या राजधानीमध्ये मध्यवर्ती ठिकाणी संस्थानचे माहिती केंद्र उभारणेसाठी देणगीदाखल जागा मिळणेसाठी प्रसिध्दी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेसंबंधातदावा दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(२)(झ) प्रमाणे सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करणेच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील,असे नमूद आहे.

**प्रस्ताव–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेसंबंधात दावा दाखल करणे व तद्नषंगाने होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना-** मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे साईउद्यान इमारतीत शिर्डी पोस्ट ऑफीसकरीता खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे करारनामा करणेत येवून जागा वापरास दिलेली आहे.

| अ.नं. | मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेचा दिनांक व ठराव | करारनामा केलेचा कालावधी |
|---|---|---|
| १ | दि.१३/१२/२००३ निर्णय क्रं.५९० | दि.१८/१२/२००३ ते दि.१७/११/२००४ |
| २ | दि.२७/१२/२००४ निर्णय क्रं.१६६ | दि.१८/११/२००४ ते दि.१७/१०/२००५ |
| ३ | दि.१४/१२/२००५ निर्णय क्रं.७७० | दि.१८/१०/२००५ ते दि.१७/१०/२०१० |
| ४ | दि.२६/०३/२०११ निर्णय क्रं.२३९ | दि.१८/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११ |
| ५ | दि.२४/०९/२०११ निर्णय क्रं.७३४ | दि.१७/१०/२०११ ते दि.१६/१०/२०१२ |
| ६ | दि.२६/०२/२०१३ निर्णय क्रं.१७९,मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं.९४२२/२०१३ मधील दि.१३/०८/२०१३ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१२ ते दि.१६/१०/२०१३ |
| ७ | दि.०५/०६/२०१४ निर्णय क्रं.४३२, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं. १०४२९/२०१४ मधील दि.२२/१२/२०१४ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१३ ते दि.१६/१०/२०१४ |

अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांना इकडील जा.नं.एसएसएसमालमत्ता/२४०३/२०१५ दि.३०/०७/२०१५ अन्वये शिर्डी पोस्ट ऑफीसकरीता वापरासाठी दिलेल्या जागेची मुदत दि.१६/१०/२०१४ रोजी संपुष्टात आलेली असल्याने पुढील कालावधीसाठी जागा वापरासाठी पाहीजे असल्यास रु.१२३८५/- दरमहा व मीटर रिडीगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५ व दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६ या कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव तातडीने इकडील कार्यालयास सादर करणेबाबत कळविणेत आलेले आहे व तद्नंतर त्यांचेशी वेळोवेळी पत्रव्यवहाराद्वारे व दूरध्वनीद्वारे संपर्क करणेत आलेला आहे. तथापि त्यांचेकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने संस्थान पॅनलवरील वकीलामार्फत कायदेशीर कार्यवाही करणेकामी संस्थानचे विधी विभागास कळविणेत आले.

तद्नुषंगाने विधी विभागाने पुढील कार्यवाही चालू केली व त्यांनी त्यांचेकडील जा.नं.एसएसएस/ वशी-विधी/१०७९/२०१६ दि.२२/०६/२०१६ अन्वये "श्रीरामपूर पोस्ट ऑफीस यांनी त्यांना सदर नोटीस प्राप्त झालेनंतर त्यांचेकडील पत्र क्रं.डी.४७/बीएलडीजी/शिर्डी/एफआरएसी/ करस्पॉ/१६ दि.११/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये उत्तर दिले आहे. सदर पत्राबाबत विधी विभागाने ॲड.श्री.आर.एस.जपे यांचेकडून मार्गदर्शन मिळणेकामी संपर्क साधला असता ॲड.श्री.आर.एस.जपे यांनी दि.१५/०६/२०१६ रोजी सूचित केले की, अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांना नोटीस दिलेनंतरही त्यांनी संस्थानचे मालकीची वापरास दिलेल्या जागेचा करारनामा करत नसेल किंवा भाडेवाढबाबत निर्णय घेत नसेल तर त्यांचेविरुध्द पुढील कारवाई करणे असलेस कळविणेबाबत सूचित केलेले आहे" असेबाबत विधी विभागाने इकडेस कळविलेले आहे.

पोस्ट ऑफीसला उक्त जागा दि.१७/१०/२०१२ ते दि.१६/१०/२०१३ व दि.१७/१०/२०१३ ते दि.१६/१०/२०१४ पर्यंत असे एकूण २४ महिनेपर्यंत दरमहा रु.७,०००/- प्रमाणे आकारण्यात आलेले असून त्याची एकूण रक्कम १,६८,०००/- इतकी होत असून त्यापैकी त्यांनी रु.१,६४,५१६/- इतकीरक्कम संस्थानचे लेखाशाखेकडे जमा केलेली असलेचे दि.२७/०६/२०१६ रोजी लेखाशाखेकडे समक्ष चौकशी केली असता त्यांनी कळविले आहे. उर्वरित रक्कम रु.३,४८४/- त्यांचेकडून दि.१७/१०/२०१४ अखेर येणे बाकी आहे. तद्नंतरचा पोस्ट ऑफीसने करारनामा केलेला नाही अथवा भाडे रक्कमही अदा केलेली नाही.

पोस्ट ऑफीसने FRAC प्रमाणे सूचविलेले भाडे दरमहा रु.१२,३८५/- इतके देण्याचे निश्चित केल्यास दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५ पर्यंत १२ महिने व दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६ असे १२ महिने म्हणजेच एकूण २४ महिन्याची रक्कम रु.२,९७,२४०/- व त्यापूर्वीची राहीलेली रक्कम रु.३,४८४/- अशी एकूण रक्कम रु.३,००,७२४/- इतकी पोस्ट ऑफीसकडून येणे बाकी होईल.

तथापि FRAC प्रमाणे सूचविलेले भाडे देण्याचे अधिकार त्यांचे स्थानिक कार्यालयास नाहीत म्हणून त्यासाठी सदर भाडेवाढीचे प्रकरण त्यांचे वरिष्ठ कार्यालय,पुणे विभाग यांचेकडेस मंजूरीकामी पाठविले असलेबाबत त्यांनी दि.११/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. मात्र तद्नंतर करारनामा करुन देणेबाबत अथवा भाडयाची रक्कम अदा करणेबाबत त्यांनी काहीएक कार्यवाही केलेली नाही.

अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांनी त्यांना वापरास दिलेल्या संस्थान मालकीच्या जागेच्या करारनाम्याची मुदत दि.१६/१०/२०१४ रोजी संपुष्टात येवून देखील व त्याबाबत त्यांना नोटीस देवून देखील त्यांनी अद्यापपोवेतो करारनामा केलेला नाही व भाडेवाढीबाबत देखील निर्णय घेतलेला नाही. अशा परिस्थितीत पोस्ट ऑफीस विरुध्द कायदेशीररित्या दावा दाखल करणे आवश्यक असल्याने इकडील जा.नं.एसएसएस/ मालमत्ता/ ११८६/२०१६ दि.०२/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये संस्थानचे विधी विभागास पोस्ट ऑफीसविरुध्द कायदेशीर दावा दाखल करणेची कार्यवाही करणेबाबत व तत्पूर्वी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करणेकामी व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यात यावी, असे कळविणेत आलेले आहे.

तथापि संस्थानचे विधी विभागाने त्यांचेकडील जा.नं.एसएसएस/वशी-विधी/१३१०/२०१६ दि.०७/०७/२०१६ अन्वये मा.कोर्टात कोणत्याही प्रकारचा दावा दाखल करावयाचा असल्यास त्याबाबत विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करुन दावा दाखल करणेकामी व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता घेण्यात यावी व विधी विभागास, ठराव प्राप्त झाल्यानंतर दावा दाखल करणेबाबत कळविणेत यावे, असेबाबत इकडेस कळविले आहे.

**विभागाचा अभिप्राय–** श्री साईबाबा संस्थान मालकीच्या साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेबाबत पोस्ट ऑफीसविरुध्द कायदेशीररित्या दावा दाखल करणे आवश्यक आहे.

त्यासाठी सदरचा दावा दाखल करणेकामी व तद्नुषंगाने येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान मालकीच्या साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफिसचे वापरात असलेल्या जागेबाबत पोस्ट ऑफीसविरुध्द कायदेशीररित्या दावा दाखल करणेऐवजी सदरहू प्रकरण सामंजस्याने मिटविण्यात यावे, असे समितीचे मत झाले. याकरीता पोस्ट ऑफिसच्या जबाबदार अधिकाऱ्यांना स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१४** **साईआश्रम येथील लगेज ट्रॉली दुरुस्ती करीता व्हिल व ब्रॅकेट खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.** 14 (भाग 4) मध्ये 14 (2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्ताविक–** साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे आलेल्या साईभक्तांना लगेच रुम ते वाहनापर्यत ने-आण करणेकरीता 120 ट्रॉलीजचा वापर करणेत येतो. दैनंदिन वापरामुळे ब-याच ट्रॉलील नादुरुस्त झालेल्या आहेत. त्यापैकी जाळी तुटलेल्या व इतर दुरुस्ती करता येतील अशा ट्रॉलीज मेकॅनिकल विभागामार्फत दुरुस्त करुन दिलेल्या आहेत. परंतु आजमितीस 80 नग ट्रॉलील व्हिल व ब्रॅकेट खराब झालेने ते तातडीने बदलने आवश्यक आहे. ट्रॉली दुरुस्ती करीता एकुण 320 नग व्हिल व 160 नग मोव्हेबल ब्रॅकेट ची आवश्यकता आहे. सदरचे व्हिल व ब्रॅकेट इकडील विभागाकडे शिल्लक नसलेने ते विहीत पद्धतीने खरेदी करावे लागणार आहे.

**मागणी -** उपरोक्त व्हिल व ब्रॅकेट खरेदी कामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | नग | अंदाजे दर रु. | एकुण किमंत रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | रबरी व्हिल 4 इंच | 320 | 110/- | 35,200/- |
| 2. | मोव्हेबर रबरी व्हिल ब्रॅकेट 4 इंच | 160 | 200/- | 32,000/- |
| | | | **एकुण** | **67,200/-** |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे व्हिल व ब्रॅकेट खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु. 67,200/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** श्री साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे साईभक्तांना लगेज ने- आण करणेकरीता लगेज ट्रॉलीज चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. जेणेकरुन साईभक्तंना लगेज ने- आण करतांना कमी त्रास होईल. तसेच ब-याच ट्रॉलीज ना दुरुस्त असलेमुळे साईभक्तांना लगेज ने आण करणोकमी ट्रॉली उपलब्ध होत नाही. त्यामुळे साईभक्तांना चांगली सेवा देणेकरीता सर्व लगेज ट्रॉलीज सुस्थितीत राहणेकरीता उपरोक्त प्रमाणे मुव्हेबल ब्रॅकेट व व्हिल खरेदी करणे आवश्यक आहे. मेकॅनिकल विभागाचे सन 2016-17 चे अंदाजपत्रकात मशिनरी दुरुस्ती व देखभाल कामी रक्कम रु. 1,43,00,000/- तरतुद करणेत आलेली असून आज रोजी रक्कम रु. 91,60,955/- मात्र शिल्लक आहे. या रक्कमेतुन सदरचे खरेदी करता येईल. सदरच्या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साईआश्रममधील लगेज ट्रालीज दुरुस्ती करणेकामी लागणारे ४ इंच रबरी व्हिल व मुव्हेबल ब्रॅकेट खरेदीकामी पुरवठादार यांचेकडून दरपत्रक मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.६७,२००/- मात्रचे खर्चास मान्यतेकरीता प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईआश्रम येथील लगेज ट्रॉली दुरुस्तीकरीता ४ इंच रबरी व्हिल व्हिल व मुव्हेबल ब्रॅकेट विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६७,२०० मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५** **आटा चाळणी यंत्र खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.** 14 (भाग 4) मध्ये 14 (2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्ताविक–** श्री साईप्रसादालयात दररोज अंदाजे सरसरी 40 हजार साईभक्त प्रसाद भोजन घेतात. तसेच दररोज सरासरी 10 हजार अन्न पाकिटे तयार करुन विक्री करण्यात येते. चपाती व पुरीकरीता लागणारा आटा तयार करणेसाठी सन 2008 मध्ये ऑन ऑन लाईन चक्की युनिटवर तीन गिरणी कार्यान्वित आहेत. गिरणीमधून तयार झालेला आटा चाळणी करणेसाठी गिरणी पुढे चाळणी यंत्र बसविण्यात आलेले आहे.

चाळणी यंत्राला व्हायब्रेशन जास्त प्रमाणात असल्याने त्यांचे मेकॅनिझम वारंवार खराब होतात. चाळणी यंत्राची फ्रेम, इसेट्रीक रोलर, शॉफ्ट, मोटार ई. दैनंदिन वापरामुळे बेंन्ड, आऊट झालेले आहे. त्यामुळे वारंवार दुरुस्ती करुनही चाळणी यंत्र पुर्ण क्षमतेने काम करत नाही. त्यामुळे नविन स्टेनलस स्टील व्हायब्रेटर चाळणी यंत्र खरेदी करणे आवश्यक आहे. सध्याच्या गिरणीच्या क्षमतेनुसार तासी 300 किलो आटा चाळणी करणे आवश्यक असलेले नविन तीन नग आटा चाळणी यंत्र खरेदी करावे लागणार आहे.

**मागणी-** आटा चाळणी यंत्र खरेदीकरणे कामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | नग | अंदाजे दर रु. | एकुण किमंत रु. |
|---|---|---|---|---|
| **1.** | Power – 1 HP/3 Phs<br>Capacity – 300 kg/hr.<br>Dimension – 36” with M.S. Structure, contact parts are stainless steel (Jali also Stainless Steel)<br>1 Hp/3Phase starter and Switch | 3 | 82,000/- | 2,46,000/- |
| | | | **एकुण** | 2,46,000/- |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे पिठाची चाळणी खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु. 2,46,000/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** श्री साईप्रसादालयात साईभक्तांना देणेत येणा-या प्रसाद भोजनातील चपाती/ पुरीचा आटा चांगल्या प्रतीचा मिळणेसाठी नविन तीन आटा चाळणी मशिन खरेदी करणे आवश्यक आहे. मेकॅनिकल विभागाचे सन 2016-17 चे अंदाजपत्रकात नविन मशिनरी खरेदी कामी रक्कम रु. 4,00,00,000/- तरतुद करणेत आलेली असून आज रोजी रक्कम रु. 3,98,42,709/- शिल्लक आहे. या रक्कमेतुन सदरचे यंत्र खरेदी करता येईल. सदरच्या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साईप्रसादालयातील गिरणीचा आटा चाळणी करणेकामी नविन तीन चाळणी यंत्र विहीत पद्ध्तीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. 2,46,000/- मात्रचे खर्चास मान्यतेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.६५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील गिरणीचा आटा चाळणी करणेकामी नविन ०३ नग चाळणी यंत्र विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **मेडिकल बील मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(१)श्री गणेश रत्नाकर कोराटे** (हुद्दा – कनिष्ठ अभियंता,विभाग - बांधकाम विभाग)

गणेश रत्नाकर कोराटे यांच्या पत्नी सौ.गितांजली कोराटे ह्या गरोदरपणात संस्थानचे श्री साईनाथ रूग्णालयाचे डॉ शितल अग्रवाल (बगाडिया) स्त्रीरोग तज्ञ यांचेकडे उपचार चालु होते. नवव्या महिन्याच्या सुरवातीस दि. १७/०८/२०१५ रोजी पत्नीला चेकअपसाठी नले असता त्यांनी कलर डॉपलर तपासणी करण्यास सांगितले. सदर तपासणी करुन त्याचदिवशी रिपोर्ट बघुन त्यांनी बाळाचे वजन अत्यंत कमी असुन मेंदुस रक्तपुरवठा कमी प्रमाणात होत आहे तसेच गर्भाशयातील पाणी देखिल कमी होत आहे त्यामुळे बाळाला तातडीने जगविण्यासाठी चांगले उपचार गरजेचे असल्याने त्यांना संस्थानचे साईनाथ रुग्णालयाचे जावक क्र.SSS/SSBH/Store/182/2015 दि. १९/०८/२०१५ चे रेफर लेटर नुसार Higher center with NICU care Inview of IVGK अशा सुविधा असणा-या दवाखान्यात जाण्यास सुचना केल्या. त्यानुसार त्यांनी संस्थानच्या मान्य यादितील प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी येथे जाण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी रुग्णास तेथे ॲडमिट करुन घेतले,तसेच तेथील उपचारासाठी डॉक्टर नसल्याने व उपचारास विलंब होत असल्याने त्यांनी रुग्णास दुस-या ठिकाणी हलविण्यास सांगितले. असे त्यांनी दिलेल्या अर्जात म्हटलेले आहे.

श्री गणेश रत्नाकर कोराटे यांनी रुग्णास लगेचच औरंगाबाद येथील आदित्य मॅटर्निटी आणि नर्सिंग होम आदित्य निओनेटल केअर युनिट औरंगाबाद या ठिकाणी रुग्णास आंतररुग्ण म्हणुन दाखल करुन घेतले तसेच सदरील हॉस्पिटलमध्ये रुग्णास व त्यांच्या बाळास एकाच वेळेस उपचार घेता आले.

तरी वरील परिस्थितीचा विचार करता सदरील उपचार साईनाथ रुग्णालयात होत नसल्याने तसेच रुग्णास संस्थानच्या मान्य यादीत रेफर केले असता परंतु उपचारास विलंब होत असल्याने व रूगणास तातडीचे उपचाराची गरज असल्याने तसेच बाळाचे वजन कमी व मेंदुस रक्तपुरवठा कमी होत असल्याने(Infertility conception with early changes of Uteroplacental insufficiency with EBW of 1.8 kg baby) उपचार घेणे गरजेचे होते.

श्री. गणेश रत्नाकर कोराटे यांनी वैद्यकीय बिलाच्या खर्चापोटी रु. १,१६,४५५/- (अक्षरी रु. एक लाख सोळा हजार चारशे पंचावन्न मात्र) इतकी रक्कम सादर केलेली आहे. सदर आजाराचे स्वरुप बघता तसेच संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये नियम क्र.१३ नुसार आकस्मित निकडीच्या प्रसंगी व पत्र क्र. २ च्या एकूण आजारामधील अ.न. १४ अन्वये स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसुतीशास्त्र यांचेशी संबंधित आकस्मिक आजार (Gynacological & Obstetric Emergency) नुसार एक विशेष बाब म्हणुन श्री.गणेश रत्नाकर कोराटे यांनी सादर केलेल्या वैद्यकिय बिलाचा परतावा मिळणेकामी रु. १,१६,४५५/- (अक्षरी रु. एक लाख सोळा हजार चारशे पंचावन्न मात्र) पैकी खाट भाडे वजा जाता रक्कम रु. ७७,८७१/- (सत्याहत्तर हजार आठशे एकाहत्तर मात्र) इतके द्यावे असे मत आहे.

**(२) श्री. मधुकर दामु गाडेकर(विभाग– प्रसादालय, हुद्दा –शिपाई )**

श्री. मधुकर दामु गाडेकर हे दि.२९/१२/२०१५ रोजी दुपारी ३ ते ११ अशी रात्री ड्युटी संपल्यानंतर घरी जात असताना निमगांव-निघोज गावाजवळ गाडीवरुन मोटार सायकल घसरुन ॲक्सिडेंट झाल्याने त्यांना संस्थानच्या साईबाबा हॉस्पिटलमध्ये ताबडतोब दाखल केले. तसेच Casulity मध्ये दाखल करण्यात आले व MRI –Xray सदरचे रिपोर्ट बघून Casulity मधील रात्रीची डयुटी असलेल्या डॉक्टर देवरेंनी त्यांना पुढील

उपचारासाठी प्रवरा ग्रामीण रुग्णालय लोणी येथे पाठविण्यात आले. तसेच त्यांना लगेचच प्रवरा ग्रामीण रुग्णालयात मध्ये दाखल करण्यात आले व तेथील तपासण्या व उपचार करून त्यांना दि. ३१/१२/२०१५ रोजी डिसचार्ज देण्यात आला तसेच तेथील उपचारानंतर दि.०१/०१/२०१६ पहाटे त्यांना अस्वस्थ व त्रास झाल्याने घरच्यांनी त्यांना नाशिक येथील शताब्दी हॉस्पिटलमध्ये तातडीने उपचारासाठी ॲडमिट करण्यात आले. तसेच दि.०१/०१/२०१६ ते १२/०१/२०१६ दरम्यान आंतररूग्ण म्हणून उपचार घेतले.

श्री मधुकर दामु गाडेकर यांनी वैद्यकिय बिलाच्या परताव्यासाठी रक्कम ९६,३५३.०० बिले सादर केलेली आहे,तरी वरील बाबींचा विचार करुन रुग्णास साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचार होऊ न शकल्याने तसेच संस्थानच्या मान्य यादीत पाठवून उपचार घेऊन आणि पुन्हा त्रास सुरू झाल्याने व रात्रीची वेळ असल्याने रुग्णास पुन्हा खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतलेले आहे.

श्री.मधुकर दामु गाडेकर यांनी वैद्यकिय बिलाच्या परताव्या कामी रक्कम रु. ९६,3५३/- (अक्षरी रु. शहाण्णव हजार सहाशे त्रेपन्न मात्र) बिले सादर केलेली आहे. तसेच सदर परिस्थितीचा विचार करून संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये नियम क्र.१३ नुसार पत्र क्र.२ निकडीच्या प्रसंगी औषधोपचार घेण्यास मान्यता देण्यात आलेले एकूण २३ आजारापैकी अ. न. ५ अपघात (Accident) आघात संलक्षण (Shock Syndrome) हदयाशी आणि रक्तवाहिनीशी संबंधित (Cardiological & Vasculer) नुसार तसेच एक विशेष बाब म्हणून श्री मधुकर दामु गाडेकर यांना रक्कम रु. ९६३५३.०० (अक्षरी रु. शहाण्णव हजार तीनशे त्रेपन्न) पैकी खाट भाडे वजा जाता ८०% रक्कम रु. ६३,८९०.०० इतके द्यावे.

**(३) श्री. मनोज बबन साबळे, (विभाग – श्री साईनाथ रुग्णालय - परिचारक)**

श्री. मनोज बबन साबळे यांच्या पत्नी सौ. सुरेखा मनोज साबळे या प्रसुतीसाठी श्री साईनाथ रुग्णालयातील डॉ. शितल अग्रवाल यांचेकडे आंतर रुग्णम्हणून दाखल करुन घेतले. प्रसूतीनंतर बाळाला झटके आले म्हणून साईनाथ रूग्णालयामधील डॉक्टरांशी बोलून त्यांनी बाळाला संस्थानच्या मान्य यादीतील प्रवरा मेडीकल ट्रस्ट लोणी येथे हलविण्यास सांगितले, तसेच रेफर लेटर घेऊन त्यांनी प्रवरा मेडीकल ट्रस्ट लोणी येथे आंतररुग्ण म्हणून दाखल करुन घेतले. तसेच उपचार चालू असताना बाळास संसर्गजन्य होऊन कृत्रिम श्वास चालू असताना बाळास संसर्गजन्य झाला असता तसेच एक महिन्याच्या आतील बाळाला डॉ. शिशूतज्ञ यांना दाखविण्याची गरज आहे असे निदर्शनास आले असता त्यांनी पुढील उपचारासाठी नाशिक येथील डॉ. संजय आहेर यांचे Adesh Neo care & intensive care unit येथे नेण्यात आले असता बाळास जंतुसंसर्ग झाला असून तसेच बाळाच्या अवयवास सूज आलेली असता त्यांनी बाळावर दि. २१/०२/२०१६ ते ०४/०२/२०१६ आंतररूग्ण म्हणून Intensive care unit मध्ये उपचार घेतले.

श्री. मनोज साबळे यांनी वैद्यकीय बीलांचा परतावा मिळणेकामी रक्कम रू. १,६७,५१३/- (अक्षरी रू. एक लाख सदूसष्ट हजार पाचशे तेरा मात्र) इतक्या रकमेचे वैद्यकीय बील सादर केलेले आहे. सदर आजाराचे स्वरूप पाहता व परिस्थितीतीनुसार एक विशेष बाब म्हणून रक्कम रु. १,६७,५१३/- (अक्षरी रू. एक लाख सदुसष्ट हजार पाचशे तेरा मात्र ) पैकी खाट भाडे वजा जाता ८०% रक्कम रू. १,२५,११४/-(अक्षरी रू. एक लाख पंचवीस हजार एकशे चौदा मात्र) द्यावे, असे मत आहे.

संस्थानच्या रुग्णालयात पाठविले होते परंतु तेथे उपचार होवु न शकल्यामुळे निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जावुन उपचार घेतले.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकुण मागणी | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गणेश रत्नाकर कोराटे, विभाग – बांधकाम विभाग हुद्दा –कनिष्ठ अभियंता, | पत्नी व मुलां | Infertility conception with early changes of Uteroplacental insufficiency with EBW of 1.8 kg baby | डॉ.बगाडीया | प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी व आदित्य मॅटर्निटी ॲण्ड नर्सिंग होम, औरंगाबाद | १,१६,४५५/- | ७७,८७१/- |
| २ | मधुकर दामु गाडेकर विभाग – प्रसादालय हुद्दा – शिपाई | स्वतः | Accident | डॉ.देवरे | प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी व शताब्दी हॉस्पिटल, नाशिक | ९६,३५३/- | ६३,८९०/- |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकुण मागणी | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | मनोज बबन साबळे<br>विभाग – साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा – परिचारीक | मुलाकरीता | Congenital Heart Disease | डॉ.रचना साबळे | प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी व आदेश न्यु केअर ॲण्ड इंटेनसिव्ह केअर युनिट, नाशिक | १,६७,५१३/- | १,२५,११४/- |
| | | | | | **एकूण** | **३,८०,३२१/-** | **२,६६,८७५/-** |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** संस्थान नियमावली प्रमाणे छानननी केली असून संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये उपचाराकरीता पाठविले होते. परंतु, तेथे उपचारास विलंब होत असल्याने पुन्हा खाजगी रूग्णालयात निकडीच्या प्रसंगी उपचार घेतले तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करून उपचार घेतलेले खात्री करून घेतली/पडताळणी केली सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची पूर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय असलेली रक्कम अदा करावे असे मत आहे.

**निर्णय क्र.६५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली आहे. यामुळे उपरोक्त तक्त्यामधील त्यांना देय असलेली रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन २०१६-१७) या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब-ब्लड बॅंक केमीकल्स, क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एम.आर.आय. फिल्म्स, डेंटल मटेरीयल, मलम, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब व कार्डीयाक ओ.टी. मटेरीयल, न्युरो ओ.टी. मटेरीयल, आय लेन्सेस इत्यादी खरेदीकामी दि.०५/०१/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये वॉर्ड/ विभाग प्रमुख यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव/ शिल्लक असलेला साठा यांचा विचार करता मागणी केलेली नाही तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नविन औषधे, साहित्य इत्यादींचा देखील समावेश करण्यात आलेला आहे अशा प्रकारे सर्व औषधांची मागणी कमी जास्त करुन व नविन औषधांचा यादीत समावेश करुन अंतिम तक्ता तयार करण्यात आला आहे. तो सोबत पाने १ ते १३८ सादर केला आहे, त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | सन २०१६-१७ करीता मागणीप्रमाणे अंदाजे खर्च रु. |
|---|---|---|
| १ | गोळ्या (Tablet) | 24892374.86 |
| २ | इंजेक्शन व आय.व्ही.फ्ल्युड्स | 62732844.86 |
| ३ | लिक्वीड ओरल्स | 3850201.43 |
| ४ | मलम | 1092663.97 |
| ५ | आय, इअर व नोझल ड्राप्स | 2581282.65 |
| ६ | डेंटल मटेरीयल | 578495.19 |
| ७ | क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एमआरआय फिल्म्स व इतर साहित्य | 29953251.15 |
| ८ | श्री साईनाथ रुग्णालय – लॅब केमीकल्स | 4824083.13 |
| ९ | श्री साईबाबा हॉस्पिटल – लॅब केमीकल्स | 34058575.97 |
| १० | ब्लड बॅंक केमीकल्स | 10412290.84 |
| ११ | Miscellaneous (इतर किरकाळ साहित्य) | 10460793.01 |
| १२ | ओ.टी. आणि इतर सर्जिकल मटेरीयल | 66287224.05 |

| | | |
|---|---|---|
| १३ | कॅथलॅब, कार्डीयाक ओ.टी. व परफ्युजनीस्ट मटेरीयल व सर्जिकल साहित्य | 79678396.25 |
| १४ | डायलेसीस युनीट | 1104779.64 |
| १५ | न्युरो ऑपरेशन थिएटर विभाग सर्जिकल साहित्य | 1913501.74 |
| १६ | आयुर्वेदीक औषधे | 4098675.19 |
| १७ | होमिओपॅथीक औषधे | 74786.25 |
| १८ | कॅटगट अॅन्ड सुचर्स मटेरीयल (श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व ओ.टी.) | 45505962.72 |
| १९ | On Consignment Basis Items (Stent / Valve / Balloon / Pacemaker / Devices / Ortho & Neuro Surgery Items etc.) | 100000000.00 |
| | **एकुण रक्कम रु.-** | **48,41,00,182.90** |
| | **पुर्णांकित एकुण रक्कम रु.-** | **48,41,00,183.00** |

सदरची मागणी तयार करताना पुढील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत-

०१) दोन्ही रुग्णालयात वाढ झालेली रुग्णांची संख्या, शस्त्रक्रियांची संख्याइत्यादीचा तपशिल पुढीलप्रमाणे-

श्री साईनाथ रुग्णालयातील अंतरुग्ण व बाहयरुग्णांची संख्या-

| अ. नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 - 2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) | सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.15) | सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अंतरुग्ण संख्या | 9365 | 11573 | 11639 | 11900 | 15220 | 14075 | 12279 | 8628 |
| ०२ | बाहयरुग्ण संख्या | 240890 | 223844 | 261321 | 260414 | 303668 | 298226 | 297184 | 213134 |

श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, जनरल ऑपरेशन थिएटर, न्युरो ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी.स्कॅन, एमआरआय,२-डी इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ ९ वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्या शस्त्रक्रियांचा / तपासण्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 -2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) | सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.15) | सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॅथलॅब प्रोसीज्यर | 4616 | 4922 | 5482 | 7332 | 9254 | 9805 | 5915 | 4577 |
| ०२ | हृदय शस्त्रक्रिया | 721 | 1023 | 1216 | 1491 | 1579 | 1700 | 1716 | 1665 |
| ०३ | ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया | 289 | 542 | 699 | श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतर | | | | |
| ०४ | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | 710 | 728 | 763 | 817 | 925 | 1030 | 936 | 548 |
| ०५ | जनरल शस्त्रक्रिया | 817 | 1535 | 1664 | 2249 | 2221 | 1984 | 1565 | 1036 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | न्युरो शस्त्रक्रिया | 253 | 489 | 571 | 611 | 586 | 337 | 383 | 565 |
| ०७ | युरोलॉजी शस्त्रक्रिया | 328 | 397 | 440 | 548 | 570 | 615 | 643 | 556 |
| ०८ | सि.टी.स्कॅन | 8091 | 8024 | 9995 | 9656 | 9546 | 8780 | 7827 | 7851 |
| ०९ | एम.आर.आय. | 7943 | 8777 | 10060 | 15596 | 13050 | 13317 | 13244 | 12084 |
| १० | 2 - डि इको | 6402 | 6785 | 8793 | 11960 | 14113 | 16591 | 15692 | 14971 |
| ११ | डायलेसीस | 1777 | 1850 | 1960 | 2078 | 2516 | 2337 | 2611 | 2162 |
| १२ | अंतर्रुग्ण संख्या | 11147 | 12689 | 13489 | 15533 | 17266 | 17226 | 12792 | 11033 |
| १३ | बाहयरुग्ण संख्या | 66543 | 73068 | 102478 | 130105 | 147147 | 153034 | 146526 | 127668 |
| | एकुण संख्या | 109890 | 120986 | 150213 | 189153 | 207940 | 226756 | 209850 | 184716 |
| | दर गतवर्षीचे तुलनेत टक्केवारी नुसार दिसणारी वाढ | 20% | 10% | 24% | 26% | 10% | 10% | 9% | 8% |

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात येत असल्यामुळे रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होऊ शकते.

०२) दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीतील झालेला खप, सध्या औषध भांडारात असलेला औषध साठा, त्याचा होणारा खप तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढू शकते.

०३) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, टॅबलेट, ऑईन्टमेन्ट, सर्जिकल साहित्य इत्यादीची एकत्रित मागणी केलेली आहे.

०४) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबित यांचेसाठी विशिष्ट रक्कमेपर्यंत उपलब्ध असलेली औषधे व सुविधा देणेबाबत निर्णय झालेला आहे व त्याचीअंमलबजावणी देखील चालु झालेली आहे. त्यामुळे रुग्णांसाठी लागणाया औषधांमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे.

०५) महाराष्ट्र शासनाने दि.१६/११/२०१३ पासुन सुरु केलेल्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत दोन्ही रुग्णालयात होणा-या शस्त्रक्रिया कराव्या लागतात व त्यामध्ये रुग्णांना दाखल आहे तोपर्यंत व डिसचार्ज दिल्यानंतर पुढील १० दिवसांची औषधे मोफत दयावयाची आहे. त्यामुळे देखील औषधांचे मागणीत खुपच वाढ झालेली आहे. त्यासाठी देखील अंदाजे रुग्णांची संख्या विचारात धरुन अंदाजे औषधे मागणी केलेली आहे. सदर मागणी प्रत्यक्ष आलेल्या रुग्णानुसार कमी जास्त होऊ शकते.

०६) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, मायक्रोबायोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी इत्यादी विभागासाठी लागणारे केमीकल्स यांचा गतवर्षाचा झालेला खप, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत रुग्णांच्या तपासण्या इत्यादी व श्री साईबाबा रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या यांचा विचार करुन मागणी सुचविलेली आहे.

०७) दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबीरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, महामार्गावरील अपघात इत्यादीमुळे वाढणारी गर्दी व राजीव गांधी योजने अंतर्गत दाखल होणारे वाढत्या रुग्णांची संख्या (उदा.किडनी स्टोन शिबीरे, उत्सव, कार्डीयाक वर्कशॉप, आध्यात्मिक शिबीरे, पालखी सोहळा इत्यादी).

०८) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून १३ ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणा-या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जिकल साहित्य इत्यादीचा विचार करण्यात आलेला आहे. श्री साईनाथ रुग्णालयात दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ अखेर ५६२६ तर श्री साईबाबा रुग्णालयात दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१५ या कालावधीत ८९४७ इतक्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.

०९) विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर इत्यादी महागडी साहित्य हि On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावित केलेले आहे. ती आपण रुग्णांना वापरल्यानंतर पुरवठा धारकांचे बील अदा करत असतो. त्यासाठी दरमहा गतवर्षाचा अनुभव विचारात घेऊन अंदाजे रक्कमेची तरतुद केलेली आहे.

सोबतच्या तक्त्यात औषधांची रक्कम धरतांना गतवर्षातील मंजुर दराने संस्थानने जी औषधे खरेदी केलेले आहे त्या दरावर २० टक्के वाढ करुन केवळ हिशोबासाठी अंदाजे दर धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात

निविदेमध्ये प्राप्त होणारे दर हे हयापेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे. दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ (१२ महिने) या महिन्यांच्या कालावधीमध्ये औषधे खरेदीवर एकुण **रु.१८,४५,२७,६८६/-** इतका खर्च झालेला आहे.

**औषधे त्वरीत उपलब्ध होणेचे दृष्टीने दर वर्षीप्रमाणे खालील कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी असे नम्र मत आहे-**

०१) औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी वर्तमान पत्रात ई-निविदेची जाहिरात देण्यात येऊन ई-निविदेव्दारे खरेदी करण्यात यावी.

०२) ई-निविदांची संपुर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन सदर समितीने वेळोवेळी केलेली कार्यवाही मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे अंतिम मान्यतेसाठी ठेवता येईल.

०३) औषधे खरेदी करताना विक्रेत्याऐवजी शक्य तेथे नामांकित थेट उत्पादक कंपन्यांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांचेकडून औषधे घेण्यात यावीत. तसेच नामांकित कंपन्याचे दर स्विकारण्यात यावेत.

०४) ई-निविदा मागवितांना उत्पादक कंपन्यांची अट तशीच ठेवून सर्व उत्पादक कंपन्यांचे अधिकृत वितरक यांचेकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच थेट उत्पादक कंपन्यांना ई-मेल व्दारे जाहिरातीबाबत अवगत करणेत येऊन निविदा भरणेबाबत कळविण्यात यावे.

०५) प्रत्येक औषधांसाठी प्राप्त निविदाधारकांनी दिलेल्या कंपन्याचे दर तुलनात्मक दरांसाठी विचारात घेण्यात यावेत व त्यातील नामांकित कंपन्याचे व गतवर्षाचा संबंधित विभागाचा वापरताना आलेला अनुभव, अडचणी, मालाचा दर्जा, पुरवठा वेळेवर न करणा-या कंपन्या व अधिकृत विक्रेते यांना शक्यतो टाळून दर स्विकारण्यात यावेत.

०६) ज्या औषधांसाठी/ साहित्यासाठी उत्पादक कंपन्याचे दर येणार नाहीत, त्यासाठी अधिकृत विक्रेत्यांकडून प्राप्त झालेल्या कंपन्यापैकी नामांकित कंपन्याचे दर स्विकारण्यात यावेत.

०७) सर्व प्राप्त ई-निविदा हया मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडून घेण्यात येऊन तांत्रिक बाबींची छाननी करुन तद्नंतर पात्र निविदाधारकांच्या Commercial निविदा Online उघडून खरेदीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

०८) मागणी केलेल्या औषधांच्या साठयापैकी काही औषधांची अतिरीक्त मागणी करावयाची आवश्यकता भासल्यास ती वार्षिक दर करारानुसार वार्षिक दर करार मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात रु.२५,०००/- पर्यंत मा.व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करावी.

०९) रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा.कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवता येईल.

१०) सदर खरेदीमध्ये औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामीची स्वतंत्र ई-निविदा तर On Consignment Basis वरील Stent/ Valve/ Balloon/ Pacemaker/ Devices इत्यादी आयटमची स्वतंत्र ई-निविदा करावी लागेल.

**विभागाचा अभिप्राय -** सोबतच्या तक्त्यातील Annual Tender Req. 2016-17 या कॉलममध्ये केलेल्या मागणी नुसार औषधे, केमीकल्स, किरकोळ साहित्य, ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जिकल साहित्य इत्यादी खरेदीकामी अंदाजे एकुण रक्कम रु.४८,४१,००,१८३/- इतका खर्च अपेक्षित आहे. गतवर्षाचा अनुभव विचारात घेता प्रत्यक्षात एक वर्षात झालेला खर्च त्यापेक्षा कमी किंवा जास्त होऊ शकतो.

सन २०१३-१४ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये सदरचे खरेदीकामी प्राप्त होणा-या निविदांवर अंतीम निर्णय घेणेकरीता सरकारी सहा.वकील श्री.पी.पी.मोरे, जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक यांची समिती गठीत करुन सदर समितीने औषधे खरेदीची प्रक्रिया पुर्ण करावी असे आदेश पारीत केले होते, त्यानुसार सन २०१३-१४ या वर्षाकरीता लागणारी औषधे खरेदी करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०१५-१६ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि१३/०३/२०१५ रोजीचे आदेशान्वये निविदाधारकांकडून निविदा मागवितांना प्रत्येक आयटमची MRP मागवून त्यानंतर खरेदीची कार्यवाही करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणा-या औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामी ई-निविदांची संपुर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन औषधे खरेदी केली गेली तर खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येईल जेणेकरुन संस्थानला त्याचा फायदा होईल असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे औषधे खरेदीकामी येणा-या अंदाजे रु.48,41,00,183.00 (अक्षरी रु. अठ्ठेचाळीस कोटी एकेचाळीस लाख एकशे त्र्याऐंशी मात्र) चे खर्चास, तसेच सदरचे खरेदीकामी ई-निविदांची संपुर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन औषधे खरेदीस व औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. १ ते १० चे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१६-१७ या वर्षाकरीता खरेदी करावयाची औषधे व सर्जिकल साहित्यांच्या यादीसह, सदरहू विषय रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा व उपसमितीच्या अभिप्रायासह प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१८** **श्री साईनाथ रुग्णालयातील ENT व Ophthalmic Operation Theatre मध्ये Epoxy Flooring चे काम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद –** १७ (२) ण

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** नवीन प्रस्ताव

**प्रास्ताविक–** श्री साईनाथ हॉस्पिटलमधील ENT व Ophthalmic Operation Theatre विभागामध्ये सन २०१० मध्ये Epoxy Flooring चे काम केलेले आहे. व सदर Epoxy Flooring हे सध्या खराब झालेले आहे. शस्त्रक्रिया विभागात रुग्णाचे Operation चालू असतांनी Operation Theatre विभागामध्ये रक्ताचे डाग जमिनीवर पडतात व ते रक्त सुकल्यानंतर फरशीवरील डाग लवकर निघत नाही, त्यामुळे जंतू संसर्ग होऊ शकतो. Epoxy Flooring केल्यामुळे डाग लवकर निघतात व जंतू संसर्ग होत नाही. त्यामुळे ENT व Ophthalmic Operation Theatre विभागाने दि.०६/०७/२०१६ (औषध भांडार प्राप्त दि.१३/०७/२०१६) चे मागणी पत्रकान्वये Epoxy Flooring चे काम करुन मिळावे असे कळविलेले होते, परंतू त्यांनी मागणी पत्रकामध्ये सदर Epoxy Flooring चे मोजमाप दिलेले नव्हते. त्यामुळे सदर मोजमापे देणे बाबत ENT व Ophthalmic Operation Theatre विभागाला कळविण्यात आले होते. परंतू त्यांचेकडून मापे न मिळाल्यामुळे सदर मोजमाप हे बायोमेडीकल विभागाकडून घेण्यात आलेले आहे.

**मागणी–** ENT व Ophthalmic Operation Theatre विभाग यांचे दि.०६/०७/२०१६ (औषध भांडार प्राप्त दि.१३/०७/२०१६) चे मागणी पत्रकान्वये

सदर Epoxy Flooring चे काम करणेकामी अंदाजे खर्चासाठी M/s. HK Healthcare System, Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे दि.२१/०७/२०१६ रोजीचे ई मेल पत्रान्वये दर कळविलेले आहे, त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No. | Name of Items | Area | Rate Per in Rs. Per sq.f Incl. of Taxes | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | ENT & Ophthalmic Operation Theatre Thick ness – 2mm | 907 Sq.f. | 123.75 | 112241.00 |
| | | **Total Amt. in Rs.-** | | 112241.00 |

सदरचे Epoxy Flooring चे काम करणेकामी अंदाजे रक्कम रु. १,१२,२४१/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईनाथ हॉस्पिटलमधील ENT व Ophthalmic Operation Theatre विभागामध्ये सन २०१० मध्ये Epoxy Flooring चे काम केलेले आहे व सदर Epoxy Flooring हे सध्या खराब झालेले आहे. शस्त्रक्रिया विभागात रुग्णाचे Operation चालू असतांनी Operation Theatre विभागामध्ये रक्ताचे डाग जमिनीवर पडतात व ते रक्त सुकल्यानंतर फरशीवरील डाग लवकर निघत

नाही, त्यामुळे जंतू संसर्ग होऊ शकतो Epoxy Flooring केल्यामुळे डाग लवकर निघतात व जंतू संसर्ग होत नाही. त्यामुळे सदर Epoxy Flooring चे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करता येईल.

तरी सदर Epoxy Flooring चे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १,१२,२४१/- (अक्षरी रु.– एक लाख बारा हजार दोनशे एक्केचाळीस मात्र) इतक्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील ENT व Ophthalmic Operation Theatre विभागामधील Epoxy Flooring चे काम करुन घेणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,१२,२४१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१९** **साईभक्तांना मार्गदर्शनाकारीता संस्थानचे संकेतस्थळwww.sai.org.in ही वेबसाईट अद्यावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**०१) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९/१०/२०१४ रोजीचे सभे तील निर्णय क्र.९०९. ०२) मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १६०

**प्रास्ताविक:** श्री साईबाबा संस्थानची www.shrisaibabasansthan.org ही अधिकृत वेबसाईट माहे १९९९ पासून कार्यान्वीत करण्यात आली आहे. वेबसाईटमध्ये वेळोवळी बदल करुन ती सध्या इंग्रजी, मराठी व हिंदी अशा मुख्य तीन भाषेमधून प्रसारित करण्यात येत आहे. संस्थान प्रकाशीत सर्व भाषेतील पुस्तकांचे डिजीटलायझेशन करुन ते वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात आले आहेत. संस्थानचे प्रकाशीत होणारे सर्व साईलीला अंक वेबसाईटवर अपलोड केले जातात. त्याचप्रमाणे संस्थानचे माहे-जून, सन १९२३ पासूनचे साईलीला अंक वेबसाईटवर अपलोड केली आहे. संस्थानच्या विविध उपक्रमांची अद्यावत माहिती वेबसाईटवर देण्यात येते. श्रींचे मुळ छायाचित्रांसहीत विविध प्रासंगीक छायाचित्रे प्रसारित करण्यात येत आहेत. तसेच संस्थानचे विविध विभागांच्या निविदा, सांख्याकी माहितीही वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

तरी, संस्थानची विकसीत केलेली वेबसाईट ही साधारणत: १८ वर्ष पुर्वी विकसीत केलेली आहे. तसेच साईटेक प्रकल्पाअंतर्गत साईभक्तांना सेवा पुरविणेकामी (रुम बुकींग,दर्शन/आरती व देणगी) इत्यादी सेवा स्वतंत्र देण्यासाठी www.online.sai.org.in ही वेबसाईट जुलै, २०११ पासुन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**अ]** सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेले www.sai.org.in हे संकेतस्थळ नविन टेक्नॉलॉजी वापरुन नुतनिकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे साईभक्तांना अधिकाधिक सुविधा पुरविणे सोईचे होईल. त्यामध्ये प्रामुख्याने

• RTI - सर्व विभागांची रचना व कार्यपध्दती, कर्मचारी इत्यादी सहीत संपुर्ण माहिती.

• Resolution - मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय विभागवार व विषयानुसार उपलब्ध करणे. व शोधण्याची व्यवस्था करणे.

• E-library- यामध्ये सर्व पुस्तकांची सॉफटकॉपी उपलब्ध करता येईल. व download करण्याची व्यवस्था व इतर.

• E-recruitment - कर्मचारी भरतीसाठी प्रक्रिया ऑनलाईन करता येईल.

• Feedback form - भक्तांचे सुचना व अभिप्राय घेता येईल.

• Multilingual - भक्तांना इंग्लीश, मराठी व हिंदी या भाषेमध्ये पुनश्च मांडणीकरुन सुटसुटीत पध्दतीने माहिती उपलब्ध करुन देणे.

**ब]** सध्या Android Basicd Mobile धारकांची प्रंचड स्वरुपात वाढ झालेली आहे (मोबाईल ॲप्लीकेशन) जास्त वापरात आहे. या अनुषंगाने संस्थानचेही मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करता येईल यामुळे अधिक-अधिक साईभक्तांपर्यंत संस्थान व संस्थानमधील उपक्रमांची माहिती पोहचवता येईल.

**Mobile Apps नुतनिकरणाची संकल्पना थोडक्यात खालीलप्रमाणे**

• Splash screen
• Registration & User login
• Home
• Darshan /Aarti Booking Info
• Accommodation Booking Info
• Donation Info

• Calender of Sansthan arrange Festival, Event, Activity
• Festivals- info of sansthan function like Ramnavami, Dassara, Gurupoornima.
• Calender for upcoming festival personal birthday reminder
• How to reach with GPS trcking
• Temple Complex
• Localisation - finding location like hospital, medical, helpdesk, busstand, railway station etc.
• Audio Section - श्रींचे मंदिराची माहिती थोडक्यात ऑडीओ क्लीप मध्ये उपलब्ध करता येईल.
• Photo Gallary-
• Settings
• Help

**- In Short functionality -**

1. Splash Screen- Saibaba Sansthan Main Screen (Saibaba Sansthan Logo ) will be displayed to end user for Few Seconds
2. Registration- User will be requested to enter Name, Mobile Number, Email ID, Photo (By Uploading or By Mobile Camera), Gender, Date of Birth, Identification details and Address. App will display Term and condition to use on submission. OTP an Email verification or already user get login.
3. Home Screen- This will be display various options like darshan booking, info aarti booking, info accommodation booking, info settings.
4. How to reach - This page will display direction details with Google Map view
5. Temple Complex - This page will list out various complex options and each option will show a detailed view listing the photos, description, timings, directions
6. Festivals- This will be a dynamic screen list of the Festival details as updated
7. Settings- This feature will involve options like User Profile, Share via facebook, twitter, whatsapp, Instagram, only and will include Rate App and Terms
8. Localisation: This app will be localised across 3 languages English, Hindi and Marathi.
9. Social Media Integrations like, Twitter, LinkedIn, Instagram etc.

यaप्रमाणे मोबाईल ॲप्स उपलब्ध असेल सदरचे सॉफटवेअर ऑफलाईन व ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध करुन देता येईल.

संस्थानकडे सध्या सदर प्रकल्पासाठी DPR बनविणे, RFP, Technical evaluation, Security and system implementation साठी सल्लागाराची आवश्यकता आहे याकामी सल्लागार नेमण्यासाठी खालीलप्रमाणे दोन पर्याय उपलब्ध होतील.

**पर्याय क्रं. ०१-** श्री.रतीष तावडे यांनी विनामुल्य सेवा देणेसाठी संस्थानच्या दि.०१/११/२०१४ ते दि.२१/११/२०१४ रोजीच्या जाहिरातीप्रमाणे प्रस्ताव सादर केला होता. परंतु, शासनाचे नियमानुसार कोणत्याही व्यक्तीची सल्लागार म्हणुन नेमणुक करतांनी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार जा. नं. १८७९/ २०१६ दि. १६/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये शासनास कळविलेले आहे. तसेच श्री विजय नायडु यांना तांत्रिक सल्लागार म्हणुन दि. ०१/०४/२०१४ ते दि. ३१/०३/२०१९ या कालावधीसाठी नेमण्यात आलेले आहे. तरी वेबसाईट व मोबाईल ॲप्ससाठी या दोघांचा एक तांत्रिक सल्लागार पॅनल तयार करुन सदरचा प्रकल्प त्यांचे मार्गदर्शनाखाली राबविता येईल.

**पर्याय क्रं. ०२ -**आयटी विभागामार्फत सदर प्रकल्पासाठी ई-निविदा राबवुन नामांकित कन्सल्टन्सी कंपनीचे प्रस्ताव मागवावे लागणार आहे. तद्नंतर त्यांची नेमणुक करुन त्यांचेमार्फत DPR, RFP Tender प्रक्रिया राबवता येईल यामुळे सहजिकच नुतनिकृत वेबसाईट व Mobile apps साई भक्तांसाठी उपलब्ध करणेस उशिर होऊ शकतो.

**मागणी:** प्रास्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे वेबसाईट नुतनिकरण व मोबाईल ॲप्लीकेशन हे विकसीत करणे व ०५ वर्षाच्या दुरुस्ती देखभालीसह एकत्रीत अंदाजे रक्कम रु. ४५,००,०००/- + टॅक्स मात्र अपेक्षीत आहे. व सल्लागार नेमणेसाठी पर्याय क्रं. ०१ किंवा पर्याय क्रं. ०२ नुसार सल्लागार नेमता यईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे वेबसाईट नुतनिकरण व मोबाईल ॲप्लीकेशन हे विकसीत करुन पुढील ०५ वर्षाच्या दुरुस्ती देखभालीसाठी येणाऱ्या एकत्रीत खर्चास मान्यता त्याकामी ई-निविदा मागविणेस व सल्लागार नेमणेसाठी पर्याय क्रं. ०१ किंवा पर्याय क्रं. ०२ नुसार सल्लागार नेमणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.६५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानच्या www.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळाचे अद्ययावतीकरण तसेच मोबाईल ॲप विकसित करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येऊन, नामांकित कन्सल्टन्सी कंपनीचे प्रस्ताव मागविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **साईटेक प्रकल्पांतर्गत करावयाचे कॉग्नीझंट टक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत.**

**प्रस्ताव-** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या कार्यप्रणाली (Q-Management– II व Integration with HMS) वगळता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संबधीत विभागांमध्ये कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत.

करारनाम्यानुसार प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली संस्थानने स्वीकारलेनंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना त्यांचे दरमहा पेमेंट संस्थानने करणे गरजेचे आहे. साईटेक प्रकल्पातील पहिली कार्यप्रणाली ०१ ऑगष्ट २०११ रोजी स्वीकारण्यात आलेली आहे, सबब कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना करारनाम्यानुसार ऑगष्ट २०११ पासून पेमेंट अदा करण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च २०१४ ते ऑगष्ट २०१५ पर्यंतचे पेमेंट त्यांना अदा करणेकामी संस्थानचे विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायलयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करण्यात आलेले होते. सदर सिव्हिल ॲप्लीकेशनवर मा.उच्च न्यायलयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि. २३/०३/२०१६ रोजीच्या मंजुर टिपणीअन्वये मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना माहे मार्च-२०१४ ते ऑगष्ट-२०१५ चे बीलातून २०% टक्के रक्कम राखीव ठेवून उर्वरीत रक्कम अदा करण्यात आलेली आहे. कॉगनीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे सप्टेंबर-२०१५ ते मे-२०१६ पर्यंतचे मासीक बीले इकडील विभागास प्राप्त झालेली आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Month | Invoice No & In. Date | Description | Net Amount |
|---|---|---|---|
| September 2015 | IN214-0000006683 | Service rendered for the month of Sept. 2015 | 21,55,714.92 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | 17/10/2015 | **Total Amount** | **28,09,382.08** |
| October 2015 | IN214-0000006973 | Service rendered for the month of Oct. 2015 | 21,55,714.92 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | 26/05/2014 | **Total Amount** | **28,09,382.08** |
| November 2015 | IN214-0000007448 | Service rendered for the month of Nov. 2015 | 21,65,169.81 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | 06/09/2014 | **Total Amount** | **28,18,836.97** |
| December 2015 | IN214-0000009827 | Service rendered for the month of Dec. 2015 | 21,65,169.81 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | 29/07/2014 | **Total Amount** | **28,18,836.97** |
| January 2016 | IN214-0000009828 | Service rendered for the month of Jan. 2016 | 21,65,169.81 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |

| Month | Invoice No & In. Date | Description | Net Amount |
|---|---|---|---|
| | 29/08/2014 | **Total Amount** | **28,18,836.97** |
| February 2016 | IN214-0000009829 | Service rendered for the month of Feb. 2016 | 21,65,169.81 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | 12/09/2014 | **Total Amount** | **28,18,836.97** |
| March 2016 | IN214-0000009830 | Service rendered for the month of March 2016 | 21,65,169.81 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | 27/10/2014 | **Total Amount** | **28,18,836.97** |
| April 2016 | IN214-0000009831 | Service rendered for the month of April 2016 | 21,65,169.81 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | 08/11/2014 | **Total Amount** | **28,18,836.97** |
| May 2016 | IN214-0000009832 | Service rendered for the month of May 2016 | 21,65,169.81 |
| | IN214-0000000861 | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | 20/12/2014 | **Total Amount** | **28,18,836.97** |
| | | **Grand Total** | **2,53,50,622.95** |

सद्यस्थितीत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना त्यांचे माहे मार्च-२०१४ ते ऑगष्ट-२०१५ च्या बीलातील २०% रककम रुपये १,००,२६,९४१.७७/- व माहे सप्टेंबर-२०१५ ते मे-२०१६ या कालावधीच्या बीलांची रक्कम रुपये २,५३,५०,६२२.९५/- अशी एकुण रककम रुपये ३,५३,७७,५६४.७२ त्यांना देय आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संस्थानचे विविध विभागामध्ये कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **कार्यप्रणाली** | **सद्यस्थिती** |
|---|---|---|
| १ | अकाऊंट | अकाऊंट विभागात चालणाऱ्या सर्व व्यवहारांची नोंद सध्या कार्यप्रणालीमध्ये घेण्यात येत आहे. कार्यप्रणाली वापरत असतांना संबधीतांना येणाऱ्या अडचणी तथा आवश्यक सुधारणाबाबतची कार्यवाही कंपनीमार्फत करण्यात येत आहेत.<br>संस्थानचे वैधानीक लेखापरिक्षकांनी नोंदविलेल्या अभिप्रायानुसार व मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये ईआरपी कार्यप्रणालीचे Migration Audit करणेसाठीची प्रक्रिया इकडील विभागाने सुरु केलेली आहे. |
| २ | प्रसादालय | चालू आहे. |
| ३ | खरेदी | चालू आहे. |
| ४ | भांडार | चालू आहे. |
| ५ | रुम रिझर्वेशन | चालू आहे. |
| ६ | दर्शन पास -1 | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशनुसार फिंगरप्रिंटची सुविधा व ऑनलाईन सर्व्हिसेसमार्फत बुक न झालेला आरती पासचा कोटा कार्यप्रणालीत ट्रांसफर होण्याची सुविधा सदरचे कार्यप्रणालीमध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यान्वीत करुन दिलेली आहे. तसेच, दर्शन पासचा राहीलेल्या कोट्यातून भक्तनिवासस्थानमध्ये रुम घेतलेल्या साईभक्तांना पासेस देण्याची सुविधा कार्यप्रणालीत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. |
| ७ | चेक / डीडी | चालू आहे. |
| ८ | देणगी कार्यालय | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार श्रींना अर्पण करावयाच्या वस्त्राबाबतची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनीकार्यप्रणालीमध्ये कार्यान्वीत करुन दिलेली आहे. |
| ९ | पगारबील | चालू आहे. |
| १० | कामगार | चालू आहे. |
| ११ | लाडू प्रसाद | चालू आहे. |
| १२ | मनी ऑर्डर | चालू आहे. |
| १३ | टेलिफोन बीलींग | चालू आहे. |

| अ.क्र. | कार्यप्रणाली | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १४ | कँटीन | चालू आहे. |
| १५ | इन्फॉर्मेशन फॉर सिनीअर ऑफीसर्स | चालू आहे. |
| १६ | इनवर्ड / आऊटवर्ड | चालू आहे. |
| १७ | भक्तमंडळ सभासद | चालू आहे. |
| १८ | प्रकाशने | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार सदरच्या कार्यप्रणालीमध्ये कॉग्नीझंट यांचेमार्फत बारकोड प्रिंट करण्याची ची सुविधा समाविष्ट करण्यात आलेली आहे. |
| १९ | साईलीला | चालू आहे. |
| २० | विद्युत विभाग | चालू आहे. |
| २१ | किऑस्क | चालू आहे. |
| २२ | विधी विभाग | चालू आहे. |
| २३ | सभा कामकाज | चालू आहे. |
| २४ | वाहन विभाग | चालू आहे. |
| २५ | पाणी पुरवठा | चालू आहे. |
| २६ | कापड कोठी / विक्री | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार श्रींना अर्पण करावयाच्या वस्त्राबाबतीची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यप्रणालीमध्ये कार्यान्वीत करून दिलेली आहे. |
| २७ | बांधकाम | चालू आहे. |
| २८ | गेस्ट ईन्फॉर्मेशन | चालू आहे. |
| २९ | वैद्यकिय अनुदान | चालू आहे. |
| ३० | एमआयएस | कार्यान्वीत झालेल्या काही कार्यप्रणालींच्या रिपोर्ट कार्यप्रणालीमध्ये विकसीत करण्यात आलेले आहेत. उर्वरीत आवश्यक रिपोर्टस् बाबतची कार्यवाही चालू आहे. |
| ३१ | संरक्षण विभाग | चालू आहे. |
| ३२ | शैक्षणिक संकुल | चालू आहे. |
| ३३ | उत्सव | चालू आहे. |
| ३४ | इंटीग्रेशन वुईथ एचएमएस | एचएमएस हि कार्यप्रणाली संस्थान (रुग्णलये) मार्फत नव्याने कार्यान्वीत केल्यानंतर, सदरची कार्यवाही करणे प्रस्तावीत होते. परंतु रुग्णालये विभागामार्फत नविन कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यास विलंब होत असल्याने, साईबाबा रुग्णलयात सध्या कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणालीतील उपलब्ध माहिती साईटेक पकल्पातील एमआयएस या कार्यप्रणालीत वापरणेची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. |
| ३५ | ओल्ड डेटा मायग्रेशन | पुर्ण झालेले आहे. |
| ३६ | Proxy & Email integration/setup | पुर्ण झालेले आहे. |
| ३७ | रेकॉर्ड | चालू आहे. |
| ३८ | दर्शन पास-2 | कार्यप्रणालीचे प्रात्यक्षीक कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे उपस्थितीत संबधीत विभागांना दाखविलेले आहे<br>कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यासाठीची आवश्यक कार्यवाही संस्थानमार्फत पुर्ण केलेनंतर सदरची कार्यप्रणाली कार्यान्वीत करणे अपेक्षीत आहे. |
| ३९ | ऑनलाईन सर्व्हिसेस | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार सदर कार्यप्रणालीमध्ये वेळोवेळी साईभक्तांसाठी वेगवेगळी माहिती प्रकाशीत करण्याची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यान्वीत केलेली आहे |
| ४० | माहिती सुविधा केंद्र | साईटेक प्रकल्पाअंतर्गत मुंबई, बैंगलोर, चेन्नई व सिकंदराबाद येथे साईभक्तांसाठी देणगी, दर्शन/ आरती, रुम रिझर्वेशन, पुस्तक विक्री, साईलीला व भक्त मंडळ सभासद ह्या कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. |

प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल-२०१७ मध्ये संपुष्टात येणार आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय

क्रं. ३२९ नुसार, साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे अध्यादेशातील अधिकृत कंन्सल्टंसी एजन्सीकडुनकरुन घेण्याचे प्रस्तावीत आहे.

संबधीत कंपनीचे प्रतिनीधींनी शिर्डी येथील बैठकीत साईटेक प्रकल्पाची व्याप्ती व उपलब्ध कालावधी लक्षात घेता, निविदा प्रक्रिया राबवुन नविन कपंनीची नेमणुक करणे व अनुषंगिक बाबी वेळेत पुर्ण होणेबाबत साशंकता असल्याने, प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून प्रकल्पाची दुरुस्ती व देखभालीचे काम सुरु ठेवावे, असे मत प्रकट केलेले आहे.

आजपावेतो मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च२०१४ ते ऑगष्ट २०१५ चे बीलाच्या रकमेतील २०% रककम रुपये १,००,२६,९४१.७७/- व माहे सप्टेंबर-२०१५ ते मे-२०१६ या कालावधीच्या बीलांची रक्कम रुपये २,५३,५०,६२२.९५/- अशी एकुण रककम रुपये ३,५३,७७,५६४.७२ त्यांना अदा करणे बाकी आहे. मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना करारनाम्यानुसार एप्रिल - २०१७ पर्यंत त्यांचे मासीक बीले अदा करावयाची आहेत.

संस्थानने नेमलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांनी त्यांचे अहवालामध्ये साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या ERP या कार्यप्रणालीचा वापर अधिक प्रभावीपणे होणेच्या दृष्टीने कार्यप्रणालीचे Migration Audit करणे आवश्यक असल्याचे सुचित केले होते. त्यास अनुसरुन आयटी विभागामार्फत सदरची कार्यवाही सुरु करण्यात आलेली असून, ई-निविदा अंतिम टप्प्यात आहे. तरी, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना माहे सप्टेंबर-२०१५ ते मे-२०१६ चे मासीक बीलांची २०% रक्कम ऑडीट रिपोर्ट आलेनंतर अदा करता येतील, असे नम्र मत आहे.

**मागणी:** उपरोक्तप्रमाणे मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना त्यांचे मासिक बीलाची मागील राखीव ठेवलेली रक्कम रुपये १,००,२६,९४१.७७ तसेच माहे सप्टेंबर-२०१५ ते मे-२०१६ चे मासीक बीलांची येणारी रक्कम रुपये २,५३,५०,६२२.९५/- अशी एकुण रक्कम रुपये ३,५३,७७,५६४.७२ रअदा करणेसाठी व पुढील बीले प्रस्तावीत Migration Audit रिपोर्ट आलेनंतर त्याचे अहवालानुसार अदा करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस आपली मान्यता असावी, हि विंनती.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना त्यांचे मासिक बीलाची मागील राखीव ठेवलेली रक्कम रुपये १,००,२६,९४१.७७ तसेच माहे सप्टेंबर-२०१५ ते मे-२०१६ चे मासीक बीलांची येणारी रक्कम रुपये २,५३,५०,६२२.९५/- अशी एकुण रक्कम रुपये ३,५३,७७,५६४.७२ अदा करणेसाठी व पुढील बीले प्रस्तावीत Migration Audit रिपोर्ट आलेनंतर त्याचे अहवालानुसार अदा करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.६५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॉग्नीझंट टंक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे सप्टेंबर-२०१५ ते मे-२०१६ अखेरच्या बीलाच्या रकमेपैकी तुर्तास ८०% रक्कम त्यांना अदा करणेत यावी. तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे Migration Audit रिपोर्ट आलेनंतर त्याच्या अहवालानुसार उर्वरित बील अदा करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :**

१ मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/०२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८५.
२ मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २९८.
३ मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९/१२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०३३.
४ मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५६०.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असलेने, रुग्णालय इमारत कमी पडत आहे. यासाठी सदर रुग्णालयांचे आवश्यक सुविधांमध्ये व बेडच्या

संख्येमध्ये वाढ करणेसाठी सर्व्हे नं. १४८ पैकी मध्ये असलेले श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील मोकळ्या जागेत रुग्णालयाच्या गरजा विचारात घेऊन, आर्किटेक्ट यांचे सल्ल्याने सर्वसमावेशक नविन इमारतीचे बांधकाम करणे योग्य होईल असा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ५६० अन्वये, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली असून, आर्किटेक्ट नेमणूकीबाबत पुढील कार्यवाही करणेत येत आहे. नवीन इमारतीचे बांधकामासाठी काही अवधी लागणार आहे.

श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.१२/०९/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये कळविले आहे की, दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे आयत्यावेळचे विषयामध्ये निर्णय क्र.६३७ अन्वये, श्री साईनाथ रुग्णालयाचे शेजारी असलेली प्रसादालयाची कॅन्टीन बंद करण्यात येऊन, तेथे साईनाथ रुग्णालयाचे विस्तारीकरण करण्यात यावे असे ठरले. उपकार्यकारी अधिकारी यांनी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) व उप अभियंता यांचे समवेत पाहणी केली.

वैद्यकिय संचालक यांनी, कॅन्टीन इमारतीचे तळमजल्यावर वैद्यकिय संचालक, उप वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, प्र.अधिक्षक, जनसंपर्क अधिकारी, सभागृह, खरेदी विभाग, अनुदान विभाग, एच. आर. विभाग व पहिल्या मजल्यावर ई.डी.पी. विभाग, वित्त विभाग, बायोमेडीकल विभाग, आउटसोर्सींग कंत्राटदार कार्यालय, अभिलेख कक्ष इ. प्रशासकिय कार्यालये करणेबाबत सूचीत केले. तसेच दोन्ही रुग्णालयांचे प्रशासकिय कार्यालये एकाच ठिकाणी येणार असल्यामुळे कामकाजाच्या दृष्टीने सोयीचे होणार आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत आराखडा तयार करणेत आला आहे.

**प्रस्ताव:** तरी श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे बेडचे संख्येत वाढ करणेकामी कॅन्टीन इमारतीमध्ये दोन्ही रुग्णालयाचे प्रशासकिय कार्यालये स्थलांतरीत करणेकामी अॅल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन्स तयार करणे, आतिल भागास रंगकाम करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी येणारे अंदाजे रु.१६,४१,६५०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा तसेच बेडचे संख्येत वाढ करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी सर्व्हे नं. १४८ पैकी मधील जागेत नविन इमारतीचे बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/०२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८५.
२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २९८.
३. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९/१२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०३३.
४. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५६०.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असलेने, रुग्णालय इमारत कमी पडत आहे. यासाठी सदर रुग्णालयांचे आवश्यक सुविधांमध्ये व बेडच्या संख्येमध्ये वाढ करणेसाठी सर्व्हे नं. १४८ पैकी मध्ये असलेले श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील मोकळ्या जागेत रुग्णालयाच्या गरजा विचारात घेऊन, आर्किटेक्ट यांचे सल्ल्याने सर्वसमावेशक नविन इमारतीचे बांधकाम करणे योग्य होईल असा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला

होता. त्यावर निर्णय क्र. ५६० अन्वये, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

**प्रस्ताव:** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी सर्व्हे नं.१४८ मधील श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील मोकळया जागेत नविन इमारतीचे बांधकाम करणेसाठी आर्किटेक्टची नेमणूक करुन त्यांचेकडून सविस्तर आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेता येईल.

याकामी यापूर्वी हॉस्पीटल इमारतीचे नुतनिकरण कामासाठी असलेले आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणे अथवा नव्याने आर्कीटेक्ट यांची नेमणूक आवश्यक आहे. तरी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांमध्ये रुग्णांकरीता आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी सर्व्हे नं. १४८ पैकी मधील जागेत नविन इमारतीचे बांधकाम करणे प्रस्तावित असून, त्यासाठी नामांकित आर्किटेक्टची नेमणूक करणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

--------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **साईनिवास अतिथीगृह येथे मा. अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्था करणेकामी फर्निचर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम – २१ (१) मधील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना-** श्री साईबाबा संस्थानचे साईनिवास अतिथीगृह इमारतीमध्ये एकुण २४ वातानुकुलीत सुटस् आहेत. या इमारतीचे पहिल्या मजल्यावर सभागृह असून येथे वेळोवेळी मा. व्यवस्थापन समितीच्या सभा व इतर शासकीय सभेचे आयोजन केले जाते. मा. व्यवस्थापन समिती सभेकरीता तसेच कामासंदर्भात मा. अध्यक्ष महोदय, मा. उपाध्यक्ष व मा. विश्वस्त वेळोवेळी संस्थानचे साईनिवास अतिथी गृह येथे उपस्थित असतात. साईनिवास अतिथीगृहातील सुट नं. ० या सुट लगत असलेल्या बैठक रुममध्ये मा. अध्यक्ष महोदय यांचे भेटीसाठी येणा-या मान्यवरांना व संस्थान कामकाजा संदर्भातील महत्वाच्या फाईल्स पाहणीकरीता कार्यालयाची व्यवस्था करावयाची आहे. दि.०५/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान यांनी मा. अध्यक्ष सो ा. यांचे सुट शजारी असलेल्या रुममध्ये बैठक व्यवसूथा करणेकामी कळविले आहे.

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष महोदय यांचे सुट शेजारील रुममध्ये बैठक व्यवस्था करणेकामी खालील तपशिलाप्रमाणे फर्निचरची आवश्यकता असुन सदरहु फर्निचर खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Revolving Chair | 01 | Nos | 20,000/- | 20,000/- |
| 2. | Excutive TableSize- 6’x3’ | 01 | Nos | 35,000/- | 35,000/- |
| 3. | Waiting Chair | 11 | Nos | 3,000/- | 33,000/- |
| | | | | **Total Amount** | **88,000/-** |

तरी वरीलप्रमाणे फर्निचर खरेदीकरीता येणारे रक्कम रु.८८,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह येथील मा.अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्था करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फर्निचर खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

--------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२१/०६/२०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत संस्थानचे दोन्ही रूग्णालयासाठी वैद्यकीय अधिकारी व इतर पदांवर कर्मचारी भरणेबाबत निर्णय क्र ४६० झाला होता सदरहु निर्णयात ही पदे भरणेसाठी मा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी असे ठरले होते. सदरहु निर्णयानुसार मा उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेत आले होते त्यावर मा उच्च न्यायालयाने दि. १३/०८/२०१३ चे आदेशान्वये रिक्त पदे भरणेसाठी मंजुरी दिली होती. मा उच्च न्यायालयाचे आदेशानुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन अर्ज मागविणेत आले. आलेल्या अर्जातील पात्र उमेदवारांच्या मुलाखती दि. ०१/०२/२०१४ रोजी घेणेत आल्या होत्या तथापि दि. १२/०४/२०१४ च्या मा त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र २७१ अन्वये घेतलेल्या मुलाखती रद्द करणेत याव्यात व परत जाहिरात देऊन मुलाखती घेणेत याव्यात असे ठरले. त्यानुसार पुन्हा २५/०७/२०१४ रोजी संस्थानचे संकेतस्थळावर व दि. ३०/०७/२०१६ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहिरातीस अनुसरून दि. ०१/०३/२०१५ रोजी मा उच्च न्यायालयामार्फत नियुक्त केलेल्या तज्ञ समितीमार्फत मुलाखती घेणेत आल्या त्यानंतर दि.१२/०३/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत तज्ञ समितीमार्फत घेतलेल्या मुलाखतीच्या अहवालाचा आढावा घेणेत आला व तज्ञ समितीने नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या खालील उमेदवारांना १ वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी नेमणूक आदेश देण्यात आले.

| **अ. नं.** | **नाव व हुद्दा** | **वेतनबॅन्ड** | **हजर तारीख** | **एक वर्ष पुर्ण होत असलेची तारीख** | **तात्पुरते नेमणूकीचे कालावधीत घेतलेल्या रजा** | **परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेची तारीख** |
|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** |
| ०१ | डॉ. विजय बाळकृष्ण पाटील उपवैद्यकीय संचालक | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | २१/०३/२०१५ | २०/०३/२०१६ | ०९ | २९/०३/२०१६ |
| ०२ | डॉ.मयुर विलास म्हात्रे (न्युरोसर्जन) | रु. १५६००–३९१०० ग्रेड पे ६६०० | १८/०३/२०१५ | १७/०३/२०१६ | अर्जित रजा ३२ + विनावेतन १५ = ४७ | ०३/०५/२०१६ |
| ०३ | डॉ.मधुरा निहार जोशी मेडिकल ऑफिसर (पॅथॉलॉजी) | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | अर्जित रजा ११ + आजारी ४ = १५ | २८/०३/२०१६ |
| ०४ | डॉ. महेश जगन मिस्तरी क्लिनिकल असिस्टंट (सीव्हीटीएस) | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | २८/०३/२०१५ | २७/०३/२०१६ | अर्जित रजा २८ + गैरहजर १३ = ४१ | ०७/०५/२०१६ |
| ०५ | डॉ. महेंद्र विलासराव तांबे ज्यु. ॲनेस्थेसि-आलॉजिस्ट | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | अर्जित रजा २८ + आजारी २ = ३० | १२/०४/२०१६ |
| ०६ | डॉ. दिपक भाऊसाहेब कांदळकर ज्यु. इंन्टेसिव्हिस्ट | रु. १५६००- ३९१०० ग्रेड पे ५४०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | अर्जित रजा २१ + आजारी ६ = २७ | ०९/०४/२०१६ |
| ०७ | डॉ. आरजेव्हीएस साई महादेव (आरएमओ) | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | १९ | ०१/०४/२०१६ |
| ०८ | डॉ. सचिन देविदासराव बगाडे (आरएमओ) | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | १५ | २८/०३/२०१६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | डॉ. सुप्रिया गोरक्ष सुंब (आरएमओ) | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | १९ | ०१/०४/२०१६ |
| १० | डॉ. पैदी चैतन्य के (आरएमओ) | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | २० | ०२/०४/२०१६ |
| ११ | डॉ. देवराम विठ्ठलराव तांबे (आरएमओ) | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १५/०३/२०१५ | १४/०३/२०१६ | ०६ | २०/०३/२०१६ |
| १२ | डॉ. निर्मला स्वाधीन गाडेकर (आरएमओ) | रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १७/०३/२०१५ | १६/०३/२०१६ | अर्जित रजा १६ + विनावेतन ८ = २४ | ०९/०४/२०१६ |
| १३ | श्री. कुणाल बबनराव आभाळे (खरेदी व्यवस्थापक) | रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | १७/०३/२०१५ | १६/०३/२०१६ | १६ | ०१/०४/२०१६ |
| १४ | श्रीमती कविता मिलींद आरक (हिस्टोपॅथ टेक्निशियन) | रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | १८ | ०१/०४/२०१६ |
| १५ | श्री सुनिल नामदेव निकम (स्टोअर किपर) | रु. ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | ०७ | २०/०३/२०१६ |
| १६ | श्री सोमनाथ निवृत्ती चौधरी (सीएसएसडी टेक्निशियन) | रु. ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | ०८ | २१/०३/२०१६ |
| १७ | श्री मयुर पोपटराव दाभाडे (ज्यु स्ट्रेस/ इको टेक्निशियन) | रु. ५२०० – २०२०० ग्रेड पे २४०० | १४/०३/२०१५ | १३/०३/२०१६ | १४ | २७/०३/२०१६ |

उपरोक्त तक्त्यातील अ नं १ चे डॉ. विजय पाटील, उपवैद्यकीय संचालक (सध्या प्र. वैद्यकीय संचालक) यांचेबाबत **१)** प्र कामगार अधिकारी, **२)** प्रशासकीय अधिकारी (रूग्णालये) व **३)** तत्कालीन प्र.वैद्यकीय संचालक यांचेकडून गोपनीय अभिप्राय मागविणेत आले होते ते खालीलप्रमाणे.

**१)** प्र कामगार अधिकारी यांचेकडील गोपनीय अहवाल खालीलप्रमाणे आहे.

'डॉ.विजय बाळकृष्ण पाटील, निवासी उपवैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेबाबत कामगार विभागाकडे गैरशिस्त वर्तणुकीबाबतचे प्रकरणे चालु अथवा प्रस्तावित नाहीत. डॉ.पाटील यांचे संदर्भात कामगार विभागाकडे तक्रारी, अर्ज प्राप्त झालेले नाहीत.'

**२)** प्रशासकीय अधिकारी, रुग्णालये (श्री गमे हे रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी म्हणून दि. ०९ नोव्हेंबर २०१५ पासुन कार्यरत आहेत (४ महिने २१ दिवस) यांचेकडील गोपनीय अहवाल खालीलप्रमाणे-

'सदर कालावधीत १) डॉ विजय बाळकृष्ण पाटील यांची वर्तणुक चांगली आहे. २) ते हुकूमाप्रमाणे योग्य रितीने काम करतात. ३) त्यांचेबाबत गैरशिस्त वर्तणुकीची प्रकरणे चालु अथवा प्रस्तावित नाहीत. ४) डॉ विजय बाळकृष्ण पाटील यांना संस्थान सेवेत कायम करणेस हरकत नाही.'

**३)** डॉ पाटील यांनी डॉ. प्रभाकरराव, वरिष्ठ भुलतज्ञ (तत्कालीन प्र. वैद्यकीय संचालक) यांचे अधिपत्याखाली दि. २१/०३/२०१५ ते दि. ०६/०१/२०१६ (९ महिने १७ दिवस) पर्यंत काम केले असल्याने डॉ राव यांनी दिलेला गोपनीय अहवाल खालील अ व ब प्रमाणे आहे.

अ) श्री.संदिप कुलकर्णी व श्री.राजेंद्र गोंदकर यांनी मा. अध्यक्ष साहेब त्रिसदस्य समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि. २७/०८/२०१५ चे पत्रान्वये डॉ. पाटील यांनी नोकरी मिळविण्यासाठी अनुभवाची खोटी प्रमाणपत्रे सादर केल्याबाबत तक्रार अर्ज सादर केला होता. सदर पत्रास अनुसरुन मा कार्यकारी अधिकारी सो यांनी जा.क्र.एसएसएसटी/वशी-काअ/२०६६/२०१५ दि. २९/०८/२०१५ चे पत्रान्वये डॉ पाटील यांनी नियुक्ती होणेकामी सादर केलेल्या कागदपत्रांची काळजीपुर्वक तपासणी करुन माझा अभिप्राय मागविला होता त्यानुसार मी दि ०७/०९/२०१५ चे पत्रान्वये माझा अभिप्राय दिलेला आहे.

ब) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणातील त्रुटी / अपुर्ततांचा दोष – दुरुस्ती अहवालामध्ये वैधानिक लेखापरिक्षक यांनी Staffing pattern norms have not been followed while filling up the posts like Dy. Medical Director in Saibaba Hospital for newly recruited candidate during the year असे नमुद केले आहे. उपरोक्त अ व ब प्रकरणे विचारात घेता संबंधीत कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत मा. प्रशासन व मा. व्यवस्थापनाने निर्णय घ्यावा, असे माझे नम्र मत आहे.'

डॉ.प्रभाकरराव यांनी त्यांचे गोपनीय अहवालात नमुद केलेल्या "अ" बाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे .

अ) श्री. संदिप कुलकर्णी व श्री. राजेंद्र गोंदकर यांनी मा. अध्यक्ष साहेब त्रिसदस्य समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि. २७/०८/२०१५ चे पत्रान्वये डॉ. पाटील यांनी नोकरी मिळविण्यासाठी अनुभवाची खोटी प्रमाणपत्रे सादर केल्याबाबत तक्रार अर्जाबाबत दि. २७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ३८० नुसार चर्चा पुढे ढकलण्यात आली होती.

मध्यंतरीच्या काळात, श्री संदिप कुलकर्णी व इतर यांनी डॉ विजय पाटील यांचेबाबत मा उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं २७१८/२०१६ दाखल केले असल्याचे विधी विभागाने दि. ०७/०३/२०१६ चे पत्रान्वये कळविले होते.

आता विधी विभागाने दि. ०६/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये उपरोक्त सिव्हील ॲप्लिकेशनवर मा उच्च न्यायालयाने दि. ०१/०७/२०१६ रोजी दिलेले आदेश खालीलप्रमाणे झालेले आहेत असे कळविले आहे.

"Civil Application is disposed off as withdraw with liberty to file appropriate proceedings as may be permissible in law".

सबब, अ.नं. १ डॉ पाटील यांचेबाबतीत मा उच्च न्यायालयाने दिलेले उपरोक्त आदेश व मा उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या तज्ञ समितीने नेमणूकीसाठी केलेली शिफारस तसेच प्र.कामगार अधिकारी व प्रशासकीय अधिकारी रूग्णालये यांचे अभिप्राय विचारात घ्यावे लागतील.

तसेच उपरोक्त तक्त्यातील अ नं २ ते १७ या कर्मचा-यांचे एक वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक असुन त्यांची वर्तणूकही चांगली आहे, तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात, त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालु नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत, त्यांची संस्थान सेवा चालु ठेवणेस हरकत नाही असे संबंधित विभागप्रमुख/ प्र.वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय प्रशासक व वैद्यकीय संचालक यांनी शिफारस केलेली आहे. उपरोक्त कर्मचा-यांपैकी अ नं २ चे डॉ मयुर म्हात्रे यांचा दि. १०/०५/२०१६ अखेर राजीनामा मंजुर झाल्याने ते सध्या संस्थान सेवेत नाहीत.

तरी, उपरोक्त नमुद केलेल्या वस्तुस्थितीचा विचार करता टिपणीत नमुद केलेल्या कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी स्तंभ क्र ७ मध्ये दर्शविलेप्रमाणे पुर्ण झाला असल्याने त्यालगतचे दिनांकापासून त्यांना संस्थान सेवेत कायम करावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दरम्यानचे कालावधीमध्ये, प्रस्तावात नमुद केलेल्या तक्त्यामधील अ.नं.०१ चे उपवैद्यकिय संचालक या पदाच्या नियुक्तीसंदर्भात मामुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये जनहित याचिका क्र.१२९/ २०१६ दाखल असलेबाबत माहिती मिळाली. त्यामुळे मा.खंडपीठाचा आदेश होईपावेतो उपवैद्यकिय संचालक पदावरील नेमणूकीस कायम करणेबाबत तुर्त निर्णय घेता येणार नाही.**

**तसेच अ.नं.०२, न्युरोसर्जन या पदावर नेमणूक केलेले डॉ.मयुर विलास म्हात्रे यांनी राजीनामा दिलेला असल्यामुळे ते सध्या संस्थान सेवेत नाहीत, याकरीता त्यांना संस्थान सेवेत कायम करण्याचा प्रश्नच उद्धवत नाही, याकरीता सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबा रुग्णालयात Adhoc Basis पध्दतीने न्युरोसर्जन पदावर नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासन निर्णय क्र सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय मुंबई दि ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडीच्या आस्थापनेवरील रूग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर असुन न्युरोसर्जन पदाची आकृतीबंधानुसार मंजुरपदसंख्याव शैक्षणिक पात्रता खालीलप्रमाणे आहे.

| आकृतीबंधातील मंजुर पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | भरलेली पदे | | |
|---|---|---|---|---|
| | | स्थायी | कंत्राटी | व्हिजीटींग |
| २ | एमसीएच/ डीएनबी | ० | ० | २ |

सध्या न्युरोसर्जन पदावर 2 डॉक्टर्स व्हिजीटींग पध्दतीने कार्यरत आहेत त्यातील एक दररोज (रविवार व्यतिरीक्त) कार्यरत असुन त्यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे तर दुसरे न्युरोसर्जन पंधरवाड्यातुन एकदा (रविवार) मोफत सेवा देत आहेत. सध्या हॉस्पिटलमधील रूग्णसंख्येचा विचार करता आणखी न्युरोसर्जनची तातडीची आवश्यकता आहे.

श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयातील रिक्त पदांवर स्थायी स्वरूपात भरती होईपर्यंत Adhoc basis पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका करणेसाठी मा उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन नं २८७ दाखल करणेत आले होते त्यावर मा उच्च न्यायालयाने दि. १२/०१/२०१५ चे आदेशान्वये न्युरोसर्जन पदावर Adhoc basis पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेकामी परवानगी दिलेलीहोती.

आता, डॉ.किशोर उध्दवराव गोडगे, एमसीएच (न्युरो) यांनी न्युरोसर्जन या पदावर काम करणेसाठी परवानगीमिळणेकामी अर्ज केला असुन त्यांचे शैक्षणिक व इतर कागदपत्रे प्र वैद्यकीय संचालक यांनी तपासली असुन प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

तरी, रूग्णसंख्येचा विचार करता डॉ.किशोर उध्दवराव गोडगे यांची एक वर्ष कालावधी अथवा सदर पदावर स्थायी स्वरूपात उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत Adhoc basis पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस व त्यांना सदर पदासाठी आकृतीबंधात न्युरोसर्जन पदासाठी मंजुर असलेल्या वेतनश्रेणीनुसार होणारे सुरवातीचे वेतनाचे जवळपास (मुळ वेतन १८७५०+ ग्रेड पे ६६००+ महागाई भत्ता (११९%) ३०१६७+एनपीए (३५%) ८८७३=६४,३९०) एकत्रित मासिक मानधन रू.६४,०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता तसेच हजर दिवसाचे प्रमाणात अर्जित रजा देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता न्युरोसर्जन या पदावर स्थायी स्वरूपात उमेदवार मिळेपर्यंत अथवा एक वर्ष कालावधीसाठी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत डॉ.किशोर उध्दवराव गोडगे यांना न्युरोसर्जन या पदावर Adhoc basis पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. तसेच डॉ.किशोर उध्दवराव गोडगे यांना रु.६४,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**प्रास्ताविक:-** श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाने दि.२३/०१/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये Fully Automatic Bio-Chemistry / Analyser Machine ची मागणी केलेली आहे.

प्रयोगशाळा विभागामध्ये सध्या एक Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine असून सदर मशिन सन २०११ मध्ये रक्कम रु.१४,०६,७००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले असून दोन Semi Automatic Bio-Chemistry Analyser Machine हे सन २००८ मध्ये खरेदी करण्यात आलेले आहे, उपरोक्त सर्व मशिन व्यवस्थित कार्यान्वित आहेत, परंतु रुग्णांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, त्यामुळे प्रयोगशाळा या विभागाने आणखी एक Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine ची मागणी केली आहे.

उपरोक्त Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१५,००,०००/- (अक्षरी रुपये पंधरा लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.२३/०१/२०१६ रोजीचे (औषध भांडार विभाग प्राप्त दि.२७/०१/२०१६) अन्वये मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छानननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्था नतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३– रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** प्रयोगशाळा विभागामध्ये सध्या एक Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine आहे व एक Semi Automatic Bio-Chemistry Analyser Machine आहे, उपरोक्त दोन्हीही मशिन व्यवस्थित कार्यान्वित आहेत, परंतु रुग्णांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, त्यामुळे प्रयोगशाळा या विभागाने नविन एक Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine मागणी केलेली आहे, त्यामुळे त्यांना एक मशिन विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करुन देता येईल. तरी श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता एक Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.१५,००,०००/- (अक्षरी रु.पंधरा लाख मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता १ नग Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटरकरीता Video Laryngoscope व Flexible Intubation Video Endoscope with Monitor खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:- १७ (२) ण**

**प्रास्ताविक:-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२७/०८/२०१५ रोजीचे मागणी पत्रकान्वये Video Laryngoscope व Flexible Intubation Video Endoscope with Monitor प्रत्येकी १ नगाची नविन मागणी केलेली आहे.

जनरल ऑपरेशन थिएटर विभागमध्ये सध्या एक साध्या प्रकारचा Laryngoscope असून गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करताना रुग्णाचे श्वासनलिका व अन्ननलिकेचे आतून परिक्षण करणे आवश्यक असते. तसेच काही रुग्णांचे श्वासनलिका व अन्ननलिका यांचे परिक्षण हे नेहमीच्या वापरातील Laryngoscope ला कॅमेरा जोडलेला नसल्यामुळे शक्य होत नाही. अशा वेळेस Video Laryngoscope व Flexible Intubation Video Endoscope with Monitor वापरुन रुग्णाचे अंतर्गत नलिकांचे परिक्षण तसेच आवश्यक्क त्या नलिका रुग्णांचे अन्न व श्वास नलिकेत टाकणे आवश्यक असते, ते करणे सहज शक्य होते रुग्णांना त्रासदेखील कमी प्रमाणात होतो. सध्या रुग्णांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, त्यामुळे जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने प्रत्येकी एक नग नविन Video Laryngoscope व Flexible Intubation Video Endoscope with Monitor ची मागणी केली आहे.

उपरोक्त खरेदीकामी मे.कार्ल स्टोअर्ज एन्डोस्कोपी इंडीया प्रा.लि., नवी दिल्ली यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले असून त्यांनी दि.२३/०५/२०१६ रोजीचे ई-मेल अन्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहेत.

| Sr.No. | Description | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. In Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Video Laryngoscope | 1 | 2108919.00 | 2108919.00 |
| 2. | Flexible Intubation Video Endoscope with Monitor | 1 | 1294259.00 | 1294259.00 |
| | **Total Amt.in Rs.** | | | **3403178.00** |

वरीलप्रमाणे दरानुसार उपरोक्त खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.३४,०३,१७८/- (अक्षरी रुपये चौतीस लाख तीन हजार एकशे अठ्ठयाहत्तर मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२७/०८/२०१५ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१३/१०/२०१५) मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.– नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** जनरल ऑपरेशन थिएटर विभागामध्ये सध्या एक साध्या प्रकारचा Laryngoscope असून गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी अदयावत प्रकारच्या Video Laryngoscope व Flexible Intubation Video Endoscope with Monitor ची आवश्यकता असते. त्यामुळे शस्त्रक्रिया करणे सुलभ होते व रुग्णांना त्रासदेखील कमी प्रमाणात होतो. सध्या रुग्णांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, त्यामुळे जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Video Laryngoscope व Flexible Intubation Video Endoscope with Monitor खरेदी करण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता प्रत्येकी नविन एक नग Video Laryngoscope व Flexible Intubation Video Endoscope with Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.३४,०३,१७८/- (अक्षरी रुपये चौतीस लाख तीन हजार एकशे अठ्ठयाहत्तर मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता नविन ०१ नग Video Laryngoscope व Flexible Intubation Video Endoscope with Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता कामाकरिता ई-निविदा मागविण्याबाबत.**

**प्रस्ताव-** मे.बीव्हीजी इंडीया लि.पुणे यांना दि.२१.०१.२०१३ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह सफाईचे काम १ वर्ष कालावधीसाठी देण्यात आलेले होते. सदर कामाची मुदत संपल्याने त्यांना २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर देखील निविदा प्रक्रिया पुर्ण न झाल्याने दि.२८.०४.२०१४ चे मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने पुर्वीच्या अटी-शर्तीस अधिन राहुन आहे त्याच मंजुर दरामध्ये सदर कामास नविन ठेकेदाराची नेमणुक होइपर्यत मुदतवाढ दिलेली होती. दरम्यानच्या काळात दि.०३.०२.२०१४ ते १५.०२.२०१४ व १५.०२.२०१४

ते ३०.०५.२०१४ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. पंरतु दोन्ही ई-निविदा प्रक्रियेत दोनच निविदा प्राप्त झाल्याने फेर निविदा करण्याचे ठरले.

दि.१०.१२.२०१४ रोजीच्या मंजुर टिपणीनुसार श्री साईबाबा हॉस्पिटल करीता वाढीव २२ कर्मचारी व श्री साईनाथ रुग्णालया करीता वाढीव ६ कर्मचारी असे दोन्ही रुग्णालयाकरीता १२५+२८ असे एकुण १५३ कर्मचारी पॉईन्टची मान्यता मिळाल्याने सदर विषय मा.त्रिसदस्य समितीच्या दि.२८.११.२०१५ रोजीचे सभेपुढे सादर केला असता, "श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या स्वच्छतेचे काम यांत्रिकीकरणासह आउटसोर्स पध्दतीने देणेकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येउुन, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व खंडपीठाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी." असा निर्णय झाला होता. त्यानुसार संस्थानचे विधी विभागा मार्फत सिव्हील अर्ज दाखल केला होता. परंतु सध्या नव्याने मा. व्यवस्थापन समिती गठीत झाल्याने सदरचा सिव्हील अर्ज मागे घेणेबाबत विधी विभागास पत्र दिले आहे. त्यांचे मार्फत पुढील कार्यवाही चालु आहे.

सध्या दोन्ही रुग्णालयाकरीता सन २०१३-२०१४ करीताचे कंत्राटदारच १२५ कर्मचारी पॉईन्टवर स्वच्छते कामी आवश्यक असणारे केमीकल्स व आवश्यक साहित्यासह प्रती महीना रक्कम रु.१२,२२,८२०/- (अक्षरी रु.बारा लाख बावीस हजार आठशे वीस मात्र) प्रमाणे काम करत आहे. सदर कंत्राटदाराने किमान वेतनात व केमीकल किंमतीत वाढ झाल्याने वाढीव रक्कमेची मागणी केलेली होती. त्यामुळे नविन निविदा प्रक्रियेसाठी सदर रक्कमेमध्ये २५ टक्के वाढ ग्राहय धरल्यास व वाढीव कर्मचा-यांचे वेतन मिळून दोन्ही रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छते कामी एकुण १५३ कंत्राटी कर्मचारी व आवश्यक साहित्यासह/ सामुग्रीसह एक वर्षासाठीचा ठेका दिल्यास प्रती महिना अंदाजे रक्कम रु.१८,७०,९१४/- पुर्णांकित १९,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. याप्रमाणे (वार्षिक रक्कम रु.२,२८,००,०००/-) अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

तरी दोन्ही रुग्णालयांचे यांत्रिकीकरणासह स्वच्छते कामी सुधारीत मनुष्यबळ संख्येचा समावेश करुन आवश्यक साहित्यासह/ सामुग्रीसह एक वर्षासाठीचा ठेका देणेकामी प्रती महीना अंदाजे रक्कम रु.१९,००,०००/- याप्रमाणे (वार्षिक रक्कम रु.२,२८,००,०००/-) अंदाजीत खर्चास व ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **कार्डीयाक ओ.टी. 02 मधील ओ.टी. लाईट चे दुरूस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ओ.टी.02 विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 6013/2011, दि. 06/01/2011 अन्वये मे. मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा.ली., मुंबई या कंपनीचा एक H- LED OT Light मे.एस.बी. डायनामेड प्रा.लि.मुंबई यांचेकडुन एकुण रू. 23,70,960/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर ओ.टी. लाईट करीता कंपनीने दिलेला दोन वर्षाचा कालावधी दि.14/4/2013 रोजी संपला असुन सध्या H-LED OT Light ची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केले जात आहे. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्टची आवश्यकता असल्यास पुरवठाधारक कंपनीकडुन खरेदी केले जातात

सध्या ओ.टी. लाईट व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने पत्र 956, दि. 19/08/2016 अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर ओ.टी. लाईटची तपासणी केली असता ओ.टी.चे LED Module kit खराब झाल्याचे निदर्शनास आहे. सदर ओ.टी. लाईट कार्डीयाक ओ.टी विभागात विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करीता नियमीत वापरात असुन तातडीने दूरूस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी मुळ उत्पादक कंपनी मे. मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा. ली. मुंबई यांनी पत्र ई- मेल दि. 27/08/2016 अन्वये ओ.टी. लाईटचे LED Module kit बदलणेस सर्व करांसहीत एकुण रु. 70,000/- (अक्षरी रु. सत्तर हजार मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती वरील LED Module kit बदललेनंतर अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे.

सदर ओ.टी. लाईट चे स्पेअर पार्ट करीता मे. मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा. ली. मुंबई हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर उपरोक्त ओ.टी. लाईटचे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात. सदर LED Module kit करीता कंपनीने सहा महिन्यांची वॉरंटी दिलेली आहे.

तरी मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा. ली. मुंबई यांचेकडुन ओ.टी. लाईटचे LED Module kit खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 70,000/- च्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या कार्डीयाक ओ.टी. मधील लाईटचे LED Module kit, ओ.टी. लाईट स्पेअरपार्टचे एकमेव अधिकृत पुरवठाधारक मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा.ली., मुंबई यांचेकडुन खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **संस्थान रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्याच्या नेमणूका करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान रुग्णालये हे साईबाबांच्या सेवेचे प्रतिक म्हणून ओळखले जाते. दिवसेंदिवस रुग्णालयाचा नावलौकिक वाढतच चालला आहे. रुग्णांच्या संख्येचा विचार करता गरजेनुसार वेळोवेळी रुग्णालयामध्ये नवीन विभाग चालु करणेत आलेले आहेत किंबहुना येथुन पुढेही आवश्यकता भासल्यास आणखी विभाग चालु करण्याचा मानस आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पुढीलप्रमाणे विभाग कार्यरत आहेत. कार्डीयाक, कार्डीओथोरॅसीक, मेडीसीन, जनरल सर्जरी, आर्थोपेडिक, न्युरोसर्जरी, युरोसर्जरी, रेडिओलॉजी, डायलेसीस, इकोकार्डीओग्राफी व टीएमटी, अपघात विभाग, फस्ट एड, फिरते वैद्यकीय पथक, कार्डीयाक ॲम्ब्युलन्स. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात मेडिसीन, जनरल सर्जरी, आर्थोपेडिक, रेडिओलॉजी,अपघात विभाग, फस्ट एड, फिरते वैद्यकीय पथक, ॲम्ब्युलन्स, रक्तपेढीची शिबीरे, वृद्धाश्रमातील कायमस्वरुपी भेटी इ.मार्फत रुग्णांची सेवा केली जात आहे.

उपरोक्त विविध विभागातील रुग्णांचे सेवेसाठी तज्ञ वैद्यकीय अधिका-यांचे मार्गदर्शनाखाली निवासी वैद्यकीय अधिकारी (आरएमओ) सिस्टर इन्चार्ज, स्टाफनर्स, वॉर्डबॉय/ आया इ. कर्मचारी अहोरात्र काम करत आहेत.

सन २००९ सालचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी मंजुर आकृतीबंधानुसार निवासी वैद्यकीय अधिकारी/ आरएमओ (एमबीबीएस) पदाचा सद्यस्थिती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| रुग्णालय | मंजुर पदसंख्या | स्थायी भरलेली पदे | कंत्राटी भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| श्री साईबाबा | ४० | २६ | ०८ | १४ |
| श्री साईनाथ | १६ | ०९ | ०२ | ०७ |
| एकूण | ५६ | ३५ | १० | २१ |

संस्थान रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये एमबीबीएस शैक्षणिक पात्रता असलेले एकूण ५६ पदे मंजुर असुन सध्या फक्त ३५ निवासी वैद्यकीय अधिकारी/ आरएमओ कार्यरत आहेत.

परंतु, श्री साईबाबा हॉस्पिटलकडे स्थायी स्वरुपात भरलेल्या २६ आरएमओ पैकी १ अध्ययन रजेवर, १ रक्तपेढीकडे तर १ राजीवगांधी जीवनदायी योजनेकडे, 2 विनापरवानगी गैरहजर असल्याने प्रत्यक्षात २१ आरएमओचे काम करत आहेत.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकडील स्थायी स्वरुपात भरलेल्या ०९ आरएमओपैकी १ अध्ययन रजेवर, १ रक्तपेढी कडे असल्याने तसेच ३ आरएमओ ओपीडीमध्ये विशेष रुग्ण तपासणीचे (अस्थिरोग, नेत्ररोग व स्त्रीरोग) काम करत असल्याने प्रत्यक्षात ४ आरएमओचे कामकाज करत आहेत.

रुग्णालयात तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली रुग्णांना चोवीस तास तात्काळ सेवा देणेकामी निवासी वैद्यकीय अधिकारी यांची नितांत आवश्यकता असते. मात्र वेळोवेळी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुनही एमबीबीएस शैक्षणिक पात्रता असलेले डॉक्टर्स मिळत नाहीत. महतप्रयासाने जे निवासी वैद्यकीय अधिकारी मिळताता वे पुढील शिक्षणासाठी राजीनामे देऊन निघुन जातात. परिणामी इतर डॉक्टरांवर अतिरिक्त कामकाजाचा बोजा पडतो व रुग्णांना तात्काळ व चांगली सेवा देणे जिकीरीचे ठरते.

सण-उत्सवाचे वेळी शिर्डीमध्ये भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी वाढत असते अशा वेळी ठिकठिकाणी फस्ट एड सेंटर, ॲम्ब्युलन्स इ.सेवा उपलब्ध करावी लागते. अशावेळी उपलब्ध आरएमओंना अतिरिक्त वॉर्डची जबाबदारी देऊन त्यातुनच काही आरएमओंची ड्युटी अशा ठिकाणी लावण्यात येते. याशिवाय २ मोबाईल व्हॅन

सुरु करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. मात्र सध्या एकच मोबाईल व्हॅन क्लिनीक चालु असुन तीही कधीकधी डॉक्टरांच्या अभावी बंद ठेवावी लागते.

अ) श्री साईनाथ रुग्णालयात खालीलप्रमाणे आरएमओ/ वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता असलेबाबत वैद्यकीय अधिक्षक यांनी कळविले आहे.

| **अ. नं.** | **वॉर्ड/ ओपीडी** | **बेडसंख्या** | **आवश्यक वैद्यकीय अधिकारी** | |
|---|---|---|---|---|
| | | | **बीएएमएस** | **एमबीबीएस** |
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१. | आयसीयु | ०८ | ------ | ३+१= ४ |
| ०२. | सर्जरी वॉर्ड – १ | ५५ | ३+१= ४ | ------- |
| ०३. | सर्जरी वॉर्ड – २ | ३५ | | -------- |
| ०४. | आर्थोपेडिक वॉर्ड | ४७ | ३+१= ४ | ------- |
| ०५. | मेल मेडिसीन | २८ | ३+१= ४ | -------- |
| ०६. | फिमेल मेडिसीन | ३५ | | |
| ०७. | गायनिक | ३२ | ------- | ३+१= ४ |
| ०८. | बालरुग्ण विभाग | १५ | | --------- |
| ०९. | ईएनटी | २० | ३+१= ४ | --------- |
| १०. | ऑप्थल्मिक | ३० | | -------- |
| ११. | एसपीआर | १० | | -------- |
| १२. | प्रथमोपचार केंद्र | | २+१= 3 | |
| १३. | फिरते वैद्यकीय पथक | | २+१= 3 | --------- |
| १४. | अपघात कक्ष | | -------- | ३+१ = ४ |
| एकूण | | | २२ | १२ |

आ) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये खालीलप्रमाणे वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता आहे.

| **अ. नं.** | **वॉर्ड / ओपीडी** | **बेडसंख्या** | **आवश्यक वैद्यकीय अधिकारी** | |
|---|---|---|---|---|
| | | | **बीएएमएस** | **एमबीबीएस** |
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१. | सीव्हीटीस | | ------- | ०२ |
| ०२. | कार्डीयाक | | -------- | ०२ |
| ०३. | मेडिसीन | | ०२ | -------- |
| ०४. | सर्जरी | | ०१ | ------- |
| ०५. | आर्थो | | ०१ | ------ |
| ०६. | कॅज्युल्टी | | ०३+०१ | -------- |
| ०७. | आयसीयु | | ---------- | ०४ |
| ०८. | जीआयसीयु | | ---------- | ०४ |
| ०९. | सीआरयु - १ | | ------------ | ०४ |
| १०. | सीआरयु – ३ | | ----------- | ०४ |
| ११. | मेल जनरल वॉर्ड | | ०१ | ------ |
| १२. | फिमेल जनरल वॉर्ड | | ०१ | -------- |
| १३. | फस्ट एड सेंटर | | ०३+०१ | ------- |
| १४. | मोबाईल व्हॅन | | ०२+०१ | --------- |
| १५. | कार्डीयाक ॲम्ब्युलन्स – २ | | -------- | ०६+०१ |
| १६. | सीआरयु – २ | | ------ | ०१ |
| १७. | सीआरयु – ४ | | --------- | ०१ |
| १८. | टीएसआर, एसपीआर, डिलक्स | | ०१ | --------- |
| **एकूण** | | | **१८** | **२९** |

आकृतीबंधानुसार वेळोवेळी मोठ्या प्रमाणात खर्च करुन वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुनही एमबीबीएस शैक्षणिक पात्रता असलेले निवासी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नसल्याने यावर उपाय म्हणून उपरोक्त "अ" व "ब" मधील स्तंभ क्र. ४ मध्ये नमुद केलेप्रमाणे एकुण २२+१८= ४० बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक करणे अत्यंत गरजेचे वाटत आहे.

तथापि, रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये बीएएमएस डॉक्टरांच्या पदांचा समावेश नाही तसेच दि. ०९/०८/२००९ चे सभेतील निर्णय क्र. ७२६ नुसार श्री साईबाबा सुपरस्पेशियालीटी मध्ये इंटेनसिव्ह केअर व सुपरस्पेशियालिटीचे पेशंटस ॲडमिट असतात. त्यामुळे बीएएमएस आरएमओ नियुक्त करु नये व प्रस्ताव स्थगित ठेवावा, असे ठरले होते.

परंतु, सेंट्रल कॉन्सिल ऑफ इंडिया मेडिसीन, दिल्ली चे नं. ८५/९६ दि. ३०/१०/९६ रोजीचे नोटिफिकेशन नुसार आयुर्वेद शैक्षणिक पात्रता असणा-या डॉक्टरांना ॲलिओपॅथिक प्रॅक्टीस करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार बीएएमएस शैक्षणिक पात्रता असलेल्या डॉक्टरांना महाराष्ट्र शासनाने शासकीय रुग्णालयांमध्ये कंत्राटी पद्धतीने नेमणूकही दिलेल्या आहेत. (सोबत नमुन्यादाखल नेमणूक आदेशची प्रत जोडली आहे.)

त्याचप्रमाणे, संस्थानला कुशल/ अकुशल कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत बीएएमएस शैक्षणिक पात्रता असलेल्या वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक केल्यास संस्थानचे तिजोरीवरही भार कमी पडेल तसेच असे वैद्यकीय अधिकारीही मोठ्या प्रमाणात कायम उपलब्ध राहतील असे मत आहे. त्यासाठी त्यांना महाराष्ट्र शासन नियमाप्रमाणे प्रत्येकी रु. १६,२००/- एकत्रित मासिक मानधन देता येईल. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे ४० बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांना प्रत्येकी रु. १६,२००/- एकत्रित मानधन दिल्यास त्यांचा एकूण ६,४८,०००/- इतका मासिक खर्च येईल. बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांच्या मानधनाच्या बाबतीत शासन नियमाप्रमाणे वेळोवेळी होणा-या बदलाप्रमाणे त्यांना मानधन देता येईल असे वाटते.

तरी, संस्थानला कुशल/ अकुशल कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत बीएएमएस शैक्षणिक पात्रता असलेले ४० निवासी वैद्यकीय अधिकारी/ आरएमओ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने ११ महिने कालावधीसाठी घेणेबाबत टिपणी सादर केली होती.

पुणे येथील दिनानाथ मंगेशकर, इनलेक्स बुद्रानी व रुबी हॉस्पिटलमधील कामकाजाविषयी माहिती घेतली असता या तिनही हॉस्पिटलमध्ये बीएएमएस डॉक्टरांना नेमणूक दिलेली असुनत्यांना कन्सल्टंट सहाय्यक म्हणून काम पहाणेस सांगणेत येते तथापि, बीएएमएस डॉक्टरांना आयसीयु, ओटी, ॲम्ब्युलन्स, कॅज्युअल्टी या ठिकाणी ड्युटी दिली जात नाही व त्यांना साधारणतः रु. २०,०००/- पर्यंत वेतन दिले जाते.

पूर्वी नमुद केलेप्रमाणे ४० बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांना प्रत्येकी रु. १६,२००/- मानधन दिल्यास त्यांचा एकूण रु. ६,४८,०००/- इतका मासिक खर्च येईल. तसेच त्यांचे मानधन बाबतीत शासननियमाप्रमाणे वेळोवेळी होणा-या बदलाप्रमाणे त्यांना मानधन देणेबाबतचा प्रस्ताव दि. २८/१२/२०१५ रोजीच्या मा त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ६२९ खालीलप्रमाणे झाला आहे.

संस्थान रूग्णालयासाठी बीएएमएस वैद्यकीय अधिकारी मिळणेबाबत डॉ प्रविण शिनगारे, संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महराष्ट्र राज्य यांचेबरोबर पत्रव्यवहार झालेला आहे परंतु आजतागायत त्यांचेकडून बीएएमएस वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. याकारीता डॉ सिनगारे यांचेकडे प्रत्यक्ष जाऊन पाठपुरावा करणेत यावा. तसेच परिसरातील मोठ्या वैद्यकिय महाविद्यालयामधील बीएएमएस वैद्यकीय अधिकारी मिळणेकामी त्यांचेबरोबर पत्रव्यवहार करणेत यावा असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे डॉ सिनगारे यांचेकडे प्र. वैद्यकीय संचालक यांचेकडून पाठपुरावा चालु आहे.

एनएबीएच (नॅशनल ॲक्रेडेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल ॲण्ड हेल्थकेअर) च्या नॉर्मनुसार ३०० बेडच्या सुपर हॉस्पिटलसाठी १०९ व जनरल हॉस्पिटलसाठी ३९ अशा एकूण १४८ आरएमओंची आवश्यकता आहे. मात्र सध्या संस्थानचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी ४० व जनरल हॉस्पिटलसाठी १६ आरएमओंची पदे आकृतीबंधानुसार मंजूर असुन सध्यादोन्ही हॉस्पिटलमध्ये फक्त ३५ आरएमओ कार्यरत आहेत.

रुग्णसंख्या व त्याप्रमाणात डॉक्टरांची कमतरता यामुळे डॉक्टरांवर पडणारा अतिरिक्त कामाचा बोजा बघता तातडीची गरज म्हणून सध्या दोन्ही हॉस्पिटल मिळून कमीत-कमी एकूण ४८ बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता आहे. याकामी संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने बीएएमएस डॉक्टरांची नेमणूक केल्यास प्रत्येकी रू. १६,२००/- एकत्रित मासिक मानधन याप्रमाणे एकूण ७,७७,६००/- इतका मासिक खर्च येणार आहे.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांमधील रुग्णसंख्या व डॉक्टरांची असलेली कमतरता या बाबींचा विचार करता, रुग्णालयांमधील डॉक्टरांची पदे कायम स्वरुपी भरेपर्यंत रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता सध्या संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत कंत्राटी पद्धतीने प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, बीएएमएस डॉक्टरांची नेमणूक करणेस व त्यांनाप्रत्येकी एकत्रित मासिक रु.१६,२००/- मात्र मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव** **(अ) अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२)**

**प्रास्ताविक :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागांनी विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वार्ड / विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. विविध वॉर्ड / विभागांनी मागणी केलेल्या फर्निचरचा तपशिल सोबतच्या तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्निचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.९,४९,९००/- (अक्षरी रुपये नऊ लाख एकोणपन्नास हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ – २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागांनी विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वार्ड/ विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. त्यामुळे वार्ड/ विभागाचे मागणीप्रमाणे हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करुन देता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मागणी केलेले हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.९,४९,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख एकोणपन्नास हजार मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

**प्रस्ताव (ब)-**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२)**

**प्रास्ताविक :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागांनी विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वार्ड / विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. विविध वॉर्ड / विभागांनी मागणी केलेल्या फर्निचरचा तपशिल सोबतच्या तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्निचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.२,९४,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख चौ-यान्नव हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ – २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागांनी विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वार्ड/ विभागातील फर्निचर

हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. त्यामुळे वार्ड / विभागाचे मागणीप्रमाणे हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करुन देता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मागणी केलेले हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.२,९४,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख चौ-यान्नव हजार मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

**उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव (अ) व (ब)** दि.२३/०६/२०१६ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेमध्ये मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर सविस्तर चर्चा होऊन उपेराक्त अ व ब प्रस्तावामध्ये मागणी केलेप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयातील फर्निचर खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या एकत्रित अंदाजे रु.१२,३४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र सदरहू खरेदीपुर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले आहे.

तथापि दि.३१/०७/२०१६ रोजी मा.त्रिसदस्य समितीचे अस्तित्व संपुष्टात येऊन मा.व्यवस्थापन समिती सभेची नियुक्ती झालेली आहे, त्यामुळे वरीलप्रमाणे खरेदीकामी झालेला निर्णय रद्द करुन सदरहू खरेदी विहित पध्दतीने ई-निविदा मागवून करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदी करणेबाबत यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत येऊन, सदरहू फर्निचर खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरिता Refrigerated Blood bag Centrifuge Machine जुने Buyback (परत) करुन नवीन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद</u> –** १७ (२) ण

**प्रास्ताविक –** श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने ०१ नग Refrigerated Blood bag Centrifuge Machine ची मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकडे सध्या ०२ मशीन आहेत. त्यापैकी १) १९९९ साली रक्कम रु. १,४५,०००/- (अक्षरी रुपये – एक लाख पंचेचाळीस हजार मात्र) इतक्या किंमतीत खरेदी केली होती. ४ Cup ची Capacity चे मशीन खरेदी करण्यात आले होते. तसेच दुसरे ६ Cup ची Capacity चे मशीन रु. ७६३८१८/- (अक्षरी रुपये – सात लाख त्रेसष्ट हजार आठशे अठरा मात्र) इतक्या रक्कमेचा सन २००९ मध्ये खरेदी करण्यात आले होते. सध्या नवीन Techonology १२ Cup ची आवश्यकता आहे. सध्या पेशंटची संख्या वाढल्यामुळे रक्ताचे वेगवेगळे घटक Platelet, White Blood Cells, Red Blood Cells, Platelet Cells, तसेच रक्तातील Granulocytes. Lymtrocultes, Monocytes मोजण्यासाठी व रक्तातील इतर घटक मोजण्यासाठी होतो. सदर घटक हे रक्तदात्याकडून रक्त मिळाल्यानंतर या उपकरणात ठेवून अति शीत तापमानाला अवश्यकतेनुसार वेगवेगळे केले जातात व ते रुग्णांना दिले जातात.

उपरोक्त Refrigerated Blood bag Centrifuge Machine ची घसारा वजा जाता सन २०१५ या वर्षाअखेर किंमत रु.३,०६४/- (अक्षरी रुपये – तीन हजार चौसष्ट मात्र) इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनिय, २००४ मधील कलम १७ (४) अन्वये खरेदीपूर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही. त्यामुळे नवीन Refrigerated Blood bag Centrifuge Machine खरेदी करणेस व जुनी Refrigerated Blood bag Centrifuge Machine बायबॅक (Buyback) करणेस हरकत नाही.

उपरोक्त ०१ नग- Refrigerated Blood bag Centrifuge Machine खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. १३,००,०००/- (अक्षरी रुपये – तेरा लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –</u>**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

२) उपरोक्त खरेदीची रक्कम रु.१० लाखपेक्षा जास्त असल्यामुळे सदरहू खरेदीस मा. मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घ्यावी लागणार आहे.

३) सदर Refrigerated Blood bag Centrifuge Machine ची घसारा किंमती वजा जाता सन २०१५ या वर्षाअखेर किंमत रु. ३०६४ /- (अक्षरी रुपये – तीन हजार चौसष्ट मात्र) इतकी आहे. सदर रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकडे सध्या ०२ मशीन आहेत. त्यापैकी १) १९९९ साली रक्कम रु. १,४५,०००/- (अक्षरी रुपये – एक लाख पंचेचाळीस हजार मात्र) इतक्या किंमतीत खरेदी केली होती. ४ Cup ची Capacity चे मशीन खरेदी करण्यात आले होते. तसेच दुसरे ६ Cup ची Capacity चे मशीन रु. ७६३८१८/- (अक्षरी रुपये – सात लाख त्रेसष्ट हजार आठशे अठरा मात्र) इतक्या रक्कमेचा सन २००९ मध्ये खरेदी करण्यात आले होते. सध्या नवीन Techonology १२ Cup ची आवश्यकता आहे. सध्या पेशंटची संख्या वाढल्यामुळे रक्ताचे वेगवेगळे घटक Platelet, White Blood Cells, Red Blood Cells, Platelet Cells, तसेच रक्तातील Granulocytes. Lymtrocultes, Monocytes मोजण्यासाठी होतो. व रक्तातील इतर घटक मोजण्यासाठी होतो. सदर घटक हे रक्तदात्याकडून रक्त मिळाल्यानंतर या उपकरणात ठेवून अति शीत तापमानाला अवश्यकतेनुसार वेगवेगळे केले जातात व ते रुग्णांना दिले जातात.

उपरोक्त Refrigerated Blood bag Centrifuge Machine ची घसारा वजा जाता सन २०१५ या वर्षाअखेर किंमत रु. ३,०६४ /- (अक्षरी रुपये – तीन हजार चौसष्ट मात्र) इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनिय, २००४ मधील कलम १७ (४) अन्वये खरेदीपूर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही.

जुने Refrigerated Blood bag Centrifuge Machine बायबॅक (Buyback) परत करुन नवीन Refrigerated Blood bag Centrifuge Machine विहित पद्धतीने ई - निविदा मागवून खरेदी करता येईल.

सदरचे ०४ Cup Capacity असलेले जुने Refrigerated Blood bag Centrifuge Machine परत (Buyback) करुन, १२ Cup Capacity असलेले नवीन Refrigerated Blood bag Centrifuge Machine विहीत पद्धतीने ई - निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. १३,००,०००/- (अक्षरी रुपये – तेरा लाख मात्र) इतका खर्चाचा प्रस्ताव तसेच उपरोक्त खरेदीची रक्कम रु. १० लाखपेक्षा जास्त असल्यामुळे सदरहू खरेदीस मा. मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता.

त्यावर दि. २३/०६/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीसभेत निर्णय क्र. ४०५ अन्वये चर्चा होऊन "श्री साईनाथ रक्तपेढी या विभागातील जुने Refrigerated Blood bag Centrifuge Machine परत (Buyback) करुन नवीन मशीन खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यास व याकामी येणा-या अंदाजे रु. १३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र सदरहू खरेदी करणेपूर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकीलामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी" असे ठरले होते.

तथापी दि.३१/०७/२०१६ रोजी मा.त्रिसदस्य समितचे अस्तित्व संपुष्टात येऊन मा. व्यवस्थापन समिती सभेची नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे वरील प्रमाणे खरेदीकामी झालेला निर्णय रद्द करुन श्री साईनाथ रक्तपेढी या विभागातील जुने Refrigerated Blood bag Centrifuge Machine परत (Buyback) करुन नवीन मशीन खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यास व याकामी येणा-या अंदाजे रु. १३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी विभागातील जुने Refrigerated Blood bag Centrifuge Machine Buyback (परत) करुन नवीन मशिन खरेदी करणेबाबतच्या प्रस्तावावर यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत येऊन, सदरहूकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१३ (अ) जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर

त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री.देवकर द्वारकानाथ रामचंद्र विभाग-कॅन्टिन हुद्दा- मदतनीस | आई | CVA | डॉ.साबळे | साईनाथ रुग्णालय | ९५४०.०० | ९५४०.०० | संस्थानच्या औषध भांडारात औषधे उपलब्ध नसलेमुळे बाहेरुन विकत घेतली आहे. |
| २ | श्री.लहानु पुंजा पठारे विभाग-लेखाशाखा हुद्दा-लिपीक | पत्नी | Typhoid | डॉ.साबळे | साईनाथ रुग्णालय | ९४२१.०० | ९४२१.०० | |
| ३ | श्री.गुलाम रसुल गुलामहबीब पठाण विभाग-मंदिर,हुद्दा-मदतनीस | स्वंतः | Heart Attack | डॉ.मोरे | साईनाथ रुग्णालय | २०३९१.०० | १९९७४.०० | |
| | | | | | **एकूण** | **३९३५२.००** | **३८९३५.००** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| ०४ | श्री.बबन लक्ष्मण वाघे विभाग- कॅन्टिन हुद्दा-मदतनीस | मुलगा | Accident | डॉ.म्हात्रे | बॉम्बे हॉस्पिटल,मुंबई | ६०८१५.०० | ५८०९०.०० | अ.नं.०4 ते १६ करीता सदरचे उपचार हे संस्थानच्या रुग्णालयात होत नसलेमुळे संस्थानच्या मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पाठविणेत आले आहे. |
| ०५ | श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे विभाग-द्वारावती भक्तनिवास ,हुद्दा – मदतनीस | स्वंतः | Ca | डॉ.देवरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | १८८९४०.०० | १७६४८०.०० | |
| ०६ | सुरेखा राजु गायकवाड विभाग-श्री साईनाथ रुग्णालय,हुद्दा – परिचारीका | पती | Ca | डॉ.रामनाईक | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | १२५००.०० | १२५००.०० | |
| ०७ | श्री.वसंत भानुदास लबडे विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा-टेक्नीशियन | वडिल | Chronic Kidney disease | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ६४३६०.०० | ४८८४०.०० | |
| ०८ | सौ.स्वाती इंद्रभान कडु विभाग-ज्यु.कॉलेज हुद्दा-सहा.शिक्षीका | पती | Heamolytic anemia with jaundice | डॉ.गोरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ९५५५७.०० | ८७४०७.०० | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | श्री.जगन्नाथ देवराम डांगे विभाग–साईनाथ रुग्णालय, हुद्दा – डायलेसीस तंत्रज्ञ | स्वंतः | Ca | डॉ.जोशी व डॉ.कुलकर्णी | टाटा मेमोरियल, मुंबई | ७९९१.०० | ७९९१.०० | |
| १० | श्री.देवराम तुकाराम धाकतोडे विभाग-पाणीपुरवठा, हुद्दा-प्लंबर | वडिल | Hepatoma | डॉ.पोरवाल | टाटा मेमोरियल, मुंबई | ९९५९.०० | ९७२१.०० | |
| ११ | श्री.कैलास उध्दवराव तुपे विभाग-साईनाथ रुग्णालय,हुद्दा-लिपीक टंकलेखक | वडिल | COAD | डॉ.मनोहर शिंदे | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, मुंबई | ३३२८९.०० | २६०५५.०० | |
| १२ | श्री.अनिल जिजाबा गायकवाड विभाग-लेखाशाखा, हुद्दा-लीपिक टंकलेकखक | मुलगी | Acute Hepatitis | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल,नाशिक | १८५५१८.०० | १७७४५८.०० | |
| १३ | वैशाली अभिजीत काळे विभाग-श्री साईबाबा हॉस्पिटल,हुद्दा-परिचारीका | आई | Ca | डॉ.भुषन कदम | प्रवरा रुग्णालय,लोणी | ११८४१.०० | ११८४१.०० | |
| १४ | श्री.भाऊसाहेब निवृत्ती औताडे विभाग-कॅन्टिन,हुद्दा-कुपन विक्रेता | वडिल | Ca | डॉ.देवरे | टाटा मेमोरियल,मुंबई | ७१७८३.०० | ७१७८३.०० | |
| १५ | श्री.सुभाष मल्हारी बंदावणे विभाग-ध्वनिक्षेपन, हुद्दा-ध्वनिक्षेपक पर्यवेक्षक | मुलगा व स्वंतः | Kidney Transplant | डॉ.देसाई | रुबी हॉल,पुणे | ५७१३१०.०० | ५५८२८०.०० | |
| १६ | शकुंतला शंकर मोहिते विभाग- श्री साईनाथ हॉस्पि. हुद्दा-परिचारीका | आई | Ca Esophagus | डॉ.नितीन ताठे | रुबी हॉल,पुणे | १५५००.०० | १५५००.०० | |
| | | | | | **एकुण** | **१३२९३६३/-** | **१२६१९४६/-** | |
| **क – संस्थानच्या यादीत रेफर केले होते परंतु उपचारास विलंब होत असल्यमुळे खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार केले होते.** | | | | | | | | |
| १७ | श्री.भाऊसाहेब निवृत्ती औताडे विभाग-कॅन्टिन, हुद्दा-कुपन विक्रेता | वडिल | Ca | डॉ.देवरे | टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई व सुयश हॉस्पि., नाशिक | १३८९७.०० | १०२६२.०० | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | श्री.योगेश त्र्यंबक साळवी विभाग-लेखाशाखा,हुद्दा-मदतनीस | स्वंतः | Ca | डॉ.खांदे | टाटा मेमोरियल, मुंबई व क्युरी मानवता कॅन्सर सेंटर, नाशिक | १४६५६.०० | ९६५३.०० | |
| | | | | | एकुण | २८५५३.०० | १९९१५.०० | |
| | **ड-संस्थानच्या यादीत उपचार होत नसल्यामुळे खाजगी रुग्णालयात उपचार घेतले.** | | | | | | | |
| १९ | डॉ.मधुरा निहार जोशी विभाग-साईनाथ रुग्णालय,हुद्दा-पॅथोलॉजिस्ट | स्वंतः | Lab test (Genetic test) | डॉ.महेंद्र नेमनाथ | जेनिटीक हेल्थ ॲण्ड रिसर्च सेंटर,नाशिक | ४०५००.०० | ३२४००.०० | |
| | | | | | **एकूण** | ४०५००.०० | ३२४००.०० | |
| **इ-रेफर न केलेले परंतु रुग्णाचे वास्तव्य बाहेरगांवी असतांना संस्थानच्या मान्य यादीत उपचार घेतले.** | | | | | | | | |
| २० | श्री.दिलीप बाळकृष्ण औदिच्य विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल, हुद्दा – स्टोअर मॅनेजर | आई | Fracture of D 9 Vetibra Body Osteoporotic Vs M.M. | डॉ.विशाल खुदांनी | बॉम्बे हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर मुंबई | ४६०४९.०० | ४६०४९.०० | |
| | | | | | **एकुण** | ४६०४९.०० | ४६०४९.०० | |
| | **अ + ब+ क +ड+इ एकूण** | | | | | **१४८३८१७/-** | **१३९९२४५/-** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.१३९९२४५/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले.तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली. सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस मान्यता असावी.

निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६७०** **(अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१३** **(ब) जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**श्री.आण्णा त्र्यबक लोंढे, विभाग- साईबाबा भक्तनिवासस्थान, हुद्दा– मदतनीस**

श्री.आण्णा त्रिंबक लोंढे यांची मुलगी कु.सिद्दी आण्णा लोंढे आजारी असतांना दि.०७-०४-२०१६ रोजी साईनाथ रुग्णालयातील बालरोग तज्ञ डॉ.रचना साबळे यांना दाखविले असता तेथे प्रथमोपचार घेतले. परंतु रुग्णांस इलाज न झाल्यामुळे त्यांनी पुन्हा दुस-या दिवशी रुगास दाखविले असता येथे उपचार हावु शकत नसल्यामुळे पुढील उपचाराकरीता साईबाबा रुग्णालयातील डॉ.गोरे यांना दाखविले. तपासणीअंती त्यांना रुग्णास सोनाग्राफी करुन Seviour abdominal pain for emergency hydroreduction/acute abdominal pain diagnosed to Intussuction या आजाराचे निदान झाल्याने तसेच साईबाबा रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे त्यांनी रुग्णांची परिस्थितीअंती जवळील संस्थान मान्य यादीत जाण्यास सांगीतले तसेच त्यांनी जवळचे प्रवरा ग्रामीण रुग्णालय येथे चौकशी केली असता तेथे डॉक्टर उपलब्ध नाही असे त्यांनी दिलेल्या अर्जात नमुद केले आहे.त्यांनी कोपरगांव येथील जवळचे रुग्णालय श्री साई पॉली क्लीनिक ॲण्ड एंन्डोस्कोपी सेंटर येथे दाखविले असता तेथे रुग्णास लगेचच अंतरुग्ण म्हणुन दाखल करुन घेतले.दि.०८-०४-२०१६ ते दि.११-०४-२०१६ दरम्यान अंतरुग्ण म्हणुन उपचार करुन घेतले.

श्री.आण्णा त्र्यंबक लोंढे यांनी वैद्यकिय बिलाचा परतावा मिळणेकामी रक्कम रु.३२०९१/- इतक्या रक्कमेची बिले सादर केलेले आहे.संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये आकस्मीक निकडीच्या प्रसंगी एकुण २३ आजारापैकी मधील पत्रक नं.२ नुसार अ.नं.७ तीव्र उदर वेदना / आंत्र अवरोध (Acute abdominal pains / Intestinal obstruction) नुसार उपचारापोटी रक्कम रु.३२०९१/- पैकी खाट भाडे वजा जाता रु.८०% रक्कम रु.२५६७३/- देता येईल असे मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले.तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली व सदर पडताळणी करुन घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७०** **(ब) यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.आण्णा त्रिंबक लोंढे, मदतनीस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी सादर केलेल्या वैद्यकिय बीलाची, संबंधीत सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे तसेच वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छानननी केलेली असल्यामुळे त्यांना देय असलेली रु.२५,६७३/- मात्र रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **इंटर्न डॉक्टरांचे निवासव्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये विरार होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज, विरार (मुंबई) व आयुर्वेदीक मेडीकल कॉलेज, राहुरी यांचे इंटर्न व पी.जी. डॉक्टर्स वेळावेळी येत असतात. तसेच काही डॉक्टर्स व्हिजीटींग म्हणुन व काही डॉक्टर्स नव्याने रुजु झालेमुळे व त्यांना क्वॉर्टर मिळाली नसलेमुळे त्यांना रुग्णालयाच्या कॅम्पसमध्ये असणा-या रुम आतापर्यंत वापरण्यासाठी दिल्या गेल्या होत्या. एकुण साधारणपणे १५ ते १६ इंटर्न डॉक्टर्स श्री साईनाथ रुग्णालयाकडे डयुटीसाठी दोन्ही कॉलेजमधुन येत असतात.

परंतु रुग्णालयामध्ये असलेल्या आय.सी.यु.बेडची व इतर बेडची संख्या वाढविण्याच्या दृष्टीकोनातुन सदर रुम रिकम्या करणे आवश्यक आहे. तसेच रुग्णालयात असणा-या १६ रुम या अतिरिक्त बेड संख्या वाढविणेकामी उपयोगी पडु शकतात. तसेच रुग्णालयासाठी नविन प्रस्तावीत बिल्डींग उभारणीस व काम चालु करणेस बराचसा वेळ लागणार असलेमुळे रुग्णालयाची तात्पुरत्या स्वरुपात अडचण दुर होणार असुन याचा फायदा जास्तीत जास्त रुग्ण भरती होणेकामी होणार आहे.

तसेच दि. ३१/०८/२०१६ चे व्यवस्थापन समितीचे आयत्या वेळचे विषयांमध्ये, विषय नं.२३ मधील मा.विश्वस्तांच्या सुचनाबाबत निर्णय क्र. ६३७(११) अन्वये रुग्णालयाच्या अडचणीबाबत चर्चा होऊन त्यात श्री साईनाथ रुग्णालयाचे शेजारी असलेली प्रसादालयाची कॅन्टीन बंद करण्यात येऊन, तेथे श्री साईनाथ रुग्णालयाचे विस्तारीकरण करण्यात यावे असे ठरले.

त्यास अनुसरुन दि. ०९/०९/२०१६ रोजी मा. उप कार्यकारी अधिकारी, डॉ आहेर साहेब, रुग्णलयाचे वैद्यकिय संचालक, डॉ विजय पाटील व रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षिका, डॉ मैथिली पितांबरे तसेच रुग्णालयाचा इतर स्टॅाफ समवेत मिटींग झाली असता, असे ठरले की सदर रुम रिकाम्या करुन इंटर्न व इतर डॉक्टरांना व जवळच असणा-या व्दारावती भक्तनिवास येथे एकुण ६ रुम मिळाव्यात. पैकी ३ रुम लेडीज डॉक्टरांना व ३ रुम जेन्टस डॉक्टरांना वापरण्यासाठी कायमस्वरुपी मिळाव्यात. असे मत आहे.

सदरहु प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे सभे समोर चर्चा होऊन, प्रस्तावास मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांसाठी बेडची संख्या वाढविणेसाठी श्री साईनाथ रुग्णालय इमारतीमध्ये इंटर्न डॉक्टरांच्या निवासासाठी रिकाम्या ठेवण्यात आलेल्या खोल्यांचा वापर करणेत यावा व इंटर्न डॉक्टरांच्या निवासासाठी द्वारावती भक्तनिवास इमारतीमध्ये आवश्यकतेनुसार खोल्या उपलब्ध करुन देण्यात याव्या, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक/ प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **साईभक्तांना दर्शनाव्यतिरिक्त मंदिर परिसरात दररोज धार्मिक कार्यक्रम (साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन) करुन वेबसाईटवर प्रसिद्ध करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १(झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल, व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व सर्व गोष्टी करील. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** दि.३१ जुलै २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी साईभक्तांना दर्शनाव्यतिरिक्त इतर वेळेमध्ये मंदिर परिसरात दररोज धार्मिक कार्यक्रम किर्तन प्रवचन इत्यादी आयोजित करुन तो कार्यक्रम अगोदरच वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार प्रतिवर्षी संस्थानमार्फत साजरे होणारे प्रमुख उत्सव, पारायण सोहळा, पालखी/रथ मिरवणूक अथवा संस्थानचे उपक्रमांचे वेळी/ दिवशी वगळता साईभक्तांना दर्शनाव्यतिरीक्त दररोज आरतीचे वेळेव्यतिरीक्त दुपारी ०४ ते सायं.०६ असे ०२ तास (धुपारती ०६ वा असल्यास त्याअगोदर) तसेच सायंकाळी धुपारतीचेनंतर ७.३० ते १०.०० असे ०२.३० तास विविध भक्तीमय, सांस्कृतिक भजन, प्रवचन, प्रबोधनपर व्याख्यान, तसेच प्रत्येक एकादशीचे व संतांचे पुण्यतिथीचे दिवशी कीर्तन इ. असे दर्जेदार कार्यक्रम करता येतील. त्याकामी खालीलप्रमाणे नियोजन करणेस मान्यता असावी-

१. बांधकाम विभागामार्फत समाधी मंदिराचे उत्तरेकडील भागात असलेल्या सरंजाम बाग येथे स्टेज बांधुन त्याचे शेजारी कपडे बदलण्यासाठी खोली, विद्युत व ध्वनिक्षेपणाकरिता एक खोली अशा सोयी-सुविधाकरिता युक्त व्यवस्था करणेस मान्यता असावी.

२. विविध ठिकाणचे दर्जेदार भजन, नृत्य कलाकार, प्रबोधनकार, कीर्तनकार यांना निमंत्रण देऊन त्यांचे उपलब्ध तारखेनुसार कार्यक्रम घ्यावे लागतील. तसेच कलाकार, कीर्तनकार यांचेकडुन येणे-जाणेचा व कलाकारांचे अपेक्षेप्रमाणे व दर्जेप्रमाणे मानधन व प्रवासभाडे किंवा मागणीप्रमाणे संस्थान वाहन मोफत पुरविणे, याबाबतची माहिती घेऊन त्याबाबत खर्चाची रक्कम लेखाशाखा विभागाकडुन प्रत्येक महिन्यात घ्यावी लागणार आहे. तरी त्याकरीता सदर खर्चाची रक्कम सामान्य प्रशासन शाखा (वशी-०५) विभागामार्फत घेऊन कलाकारांना देणेस मान्यता असावी.

३. निमंत्रीत करण्यात येणा-या कलाकारांची राहण्याची व चहा-पानाची व्यवस्था साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत मंदिराचे जवळ असलेल्या साईउद्यान इमारतीमध्ये कायमस्वरुपीसाठी करणेस मान्यता असावी तसेच जेवण, नाष्ट्याची व्यवस्था प्रसादालय विभागामार्फत व कलाकारांना मोफत दर्शन व्यवस्था जनसंपर्क कार्यालयामार्फत करणेस मान्यता असावी. तसेच सदर कलाकार वर्षभरामध्ये इतर वेळेस आल्यास त्यांना मोफत दर्शन व्यवस्था जनसंपर्क कार्यालयामार्फत करावी अशा प्रकारच्या सुचना मा.अध्यक्ष साहेब यांनी केल्या आहेत.

४. भजन संध्या, नृत्य कलाकार, प्रबोधनकार, कीर्तनकार यांना यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत वेबसाईटवर आवाहन देऊन त्यासाठीचे अर्ज मागविणेस मान्यता असावी.

५. मंदिर विभागामार्फत दैनंदिन नोंदविण्यात येणारे कलाकार हजेरीचे कार्यक्रम उपरोक्त दर्शविलेल्या ठिकाणी करणेस मान्यता असावी, फक्त मा.विश्वस्त, श्री.सचिन तांबे साहेब यांचे सुचनेनुसार श्रीगुरुपाठाचे अभंगांचा कार्यक्रम समाधी मंदिराचे समोरच करण्यात यावा अशी सूचना केली आहे त्यास मा.अध्यक्ष साहेब यांनी सहमती दर्शविलेली आहे.

६. उपरोक्त नियोजन करणेकामी संगीत क्षेत्रातील तज्ञ नेमल्यास याबाबत दर्जेदार कार्यक्रमाचे सादरीकरण करता येईल. त्याकामी श्री.सुधांशु प. लोकेगांवकर हे संस्थानकडे कायम कर्मचारी असून ते संगीत व कला मार्गदर्शक या पदावर काम करत आहेत. त्यांना उपरोक्त कलाकार हजेरीकामी पुर्णवेळ नेमल्यास कलाकारांचे व कार्यक्रमाचे नियोजन, त्यांचे मानधन-प्रवास भाडे व इतर तत्सम कामे त्यांचेकडुन करुन घेता येतील. त्याचप्रमाणे त्यांना कागदोपत्री काम करुन घेणेकामी, जमा-नांवे, पैसे हाताळणे व इतर कामी एक लिपीक-टंकलेखक व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत एक कॉम्प्युटर/ लॅपटॉप, प्रिंटरसह देणेस मान्यता असावी. त्याचप्रमाणे सदर ठिकाणी स्टेजजवळ विद्युत व्यवस्था, ध्वनिक्षेपण व्यवस्था संबंधीत विभागाकडुन करुन घेणेस मान्यता असावी.

**विभागाचे मत/ अभिप्राय-** तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे संस्थानमार्फत साजरे होणारे प्रमुख उत्सव, पारायण सोहळा, पालखी/रथ मिरवणूक, ग्रहणकाल अथवा संस्थानचे उपक्रमांचे वेळी/ दिवशी वगळता साईभक्तांना दर्शनाव्यतिरीक्त दररोज दुपारी ०४ ते सायं.०६ (धुपारती ०६ वा असल्यास त्याअगोदर) असे ०२ तास व सायंकाळी धुपारतीचेनंतर ७.३० ते १०.०० असे ०२.३० तास विविध प्रकारचे भक्तीमय, सांस्कृतिक भजन, प्रवचन, प्रबोधनपर व्याख्यान व प्रत्येक एकादशीचे व संतांचे पुण्यतिथीचे दिवशी कीर्तन इ. असे दर्जेदार कार्यक्रम करणेस व त्यास योग्य ते मानधन लेखाशाखेकडुन घेऊन सामान्य प्रशासन शाखा (वशी-०५) मार्फत घेऊन संबंधीत कलाकारांना देणेस मान्यता असावी. तसेच त्याकामी उपरोक्तप्रमाणे व्यवस्था करुन माहे- ऑक्टोबर-२०१६ पासून सदर व्यवस्था सुरु करणेकामी सदर प्रस्तावास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.६७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, मंदिर परिसरामध्ये दररोज धार्मिक कार्यक्रमाचे (साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन) आयोजन करणे व तसे संस्थानचे संकेस्थळावर प्रसिद्ध करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**मंदिर परिसरामध्ये दररोज धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणेचे काम मंदिर विभागाने आहे त्याच कर्मचाऱ्यांकडून करुन घ्यावे व श्री.सुधांशु प लोकेगांवकर, संगीत व कला मार्गदर्शक यांनी त्यांचे काम सांभाळून याकामी मंदिर विभागाने सुचविलेले काम करावे, त्यासाठी श्री.लोकेगांवकर यांना वेगळा भत्ता देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच सदरहू ठिकाणी कार्यक्रम सादर होणारे कार्यक्रम श्री साईबाबांच्या विचारांशी सुसंगत असावेत, आक्षेपाहर्य नसावेत, याकरीता कार्यक्रम सादर करणाऱ्या कलाकारांना तसे कळविणेत यावे, अशा सुचना दिल्या.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ मुख्यलेखाधिकारी/ सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **श्री साईबाबांच्या चामड्याच्या पादुकांना सोन्याचे ताट व सटका यांना सोन्याचे कवच देणगी स्विकारणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १(झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल, व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व सर्व गोष्टी करील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** मंदिर विभागामार्फत श्रींना अर्पण करावयाच्या अथवा मंदिरामध्ये दैनंदिन वापराच्या दृष्टीने सोने अथवा चांदीच्या स्वरुपामध्ये देणेगीदाराने देणगी देणेबाबत इच्छा प्रदर्शीत केल्यास त्याबाबतचा प्रस्ताव ठेवुन मान्यता घेण्यात येते. मंदिर विभागाचे ताब्यात अशा अनेक प्रकारच्या अलंकार, भांडी अशा सोने-चांदीच्या वस्तु आहेत. सदर वस्तुंची देणगी पावती लेखाशाखा विभागाचे मुख्य रोखपाल यांचेकडे करुन त्यानंतर ती मंदिर विभागाचे डेडस्टॉकला ट्रान्सफर करण्याची प्रथा आहे. त्यामुळे या वस्तुंची नोंद मुख्य रोखपाल यांचेकडे राहते व वापर मंदिर विभागाकडे होतो.

**प्रस्ताव-** शिर्डी येथील रहिवासी सौ.सुरेखा मंगेश रणमाळे यांनी श्रीसाईबाबांच्या मुळ चामड्याच्या पादुकांना थाळी व श्रींच्या काठीस (दंड्यास) कवच असे ५१० ग्रॅम सोन्याचे देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शीत केलेली आहे.

**विभागाचे मत/ अभिप्राय-** मंदिर विभागाकडे अनेक प्रकारच्या सोन्याच्या व चांदीच्या वस्तू आहेत. श्रीसाईबाबांच्या मुळ पादुका या चामड्याच्या आहेत, तसेच त्यावरील सटका हा लाकडी आहे. श्रींच्या पादुका व सटका या दोन्ही वस्तू अतिशय महत्वाच्या व दुर्मिळ व प्रतिष्ठेची बाब म्हणून ओळखल्या जातात . त्यामुळे श्रींच्या या पादुका व सटका समाधी मंदिरातील सभामंडपाचे येथील शोरुममध्ये ठेवण्यात आलेले आहेत. श्रींच्या पादुका व सटका यांना अॅक्रेलिकच्या बॉक्समध्ये ठेवण्यात आलेले आहे. या पादुका व सटका फक्त प्रत्येक गुरुवारी व रथ/ पालखीचे मिरवणूकीचे वेळीच काढण्याची प्रथा आहे व ती आजतागायत चालू ठेवण्यात आलेली आहे. श्रींच्या पादुकांना सोन्याचे ताट व सटका यांना सोन्याचे आवरण अथवा कवच देण्याकरीता पादुका अथवा सटका बाहेर देता येणार नाही. तसेच श्रींच्या काठीला (सटका) यांना सोन्याचे आवरण करतांना त्यास इजा पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच देणगीदार साईभक्त या पादुका-सटका यांचे मोज-माप घेणेकामी/ कवच लावणेकामी पाहणेबाबत विचारणा करु शकतात.

तरी श्रींच्या पादुका व सटका यांचे संरक्षण व संवर्धन होणे ही संस्थानची सर्वात महत्वाची जबाबदारी आहे. करीता श्रींच्या पादुका अथवा सटका यांना सोन्याचे आवरण (कवच) लावता येणे शक्य नाही. तसेच भविष्यामध्ये हे कवच काढण्याचे झाल्यास पादुका-सटका यांना इजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी आपण पादुक-सटका करीता सोने आवरण देणगी देण्याचे ऐवजी मंदिर विभागाकरीता आपल्या इच्छेप्रमाणे इतर दैनंदिन उपयोगी असणारे सोन्याचे अलंकार किंवा इतर तत्सम साहित्य देणगी दिल्यास स्विकारणेकामी सोईचे होईल. तसे सौ.सुरेखा मंगेश रणमाळे, शिर्डी यांना इकडील जा.क्र.एसएसएस/ मंदिर/ २४२६/ २०१६ दि.१३/०८/२०१६ चे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

०१) तरी सौ.सुरेखा मंगेश रणमाळे यांनी विनंती केल्याप्रमाणे पादुका व सटका या वस्तुं ऐवजी त्यांचेकडुन इतर सोन्याची वस्तू घ्यावी

किंवा

०२) सौ.सुरेखा मंगेश रणमाळे श्रींच्या पादुका अथवा सटका यांना सोन्याचे आवरण (कवच) देणगी स्विकारावी किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या पादुका, सटका यांचे संरक्षण व संवर्धन होणे ही संस्थानची सर्वात महत्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रींच्या पादुका ठेवणेसाठी सोन्याचे ताट व सटक्यास सोन्याचे आवरण देणगी स्वरुपात स्विकारणेपुर्वी मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष तसेच सदस्यांनी श्रींच्या पादुका, सटका यांची प्रत्यक्ष पहाणी करावी व त्यानंतर अंतीम निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-9) Hyderabad यांना लाईव्ह दर्शन सुविधेसाठी मुदतवाढ देणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 21 (1) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, यानुसार श्री साईभक्तांना त्यांचे घरी बसून दररोज श्रींचे दर्शनाचा लाभ मिळावा या हेतूने सदर सुविधा सुरु करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** 1) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 08/10/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७१० 2) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 08/10/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.711.

**प्रस्ताविक:** मा. व्यवस्थापन समितीचे दि.08/10/2013 रोजीचे सभेतील निर्णयानुसार TV चॅनेलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेकामी Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-9) Hyderabad तिन वर्षासाठीचे दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले आहे. तसेच त्यांच्या या सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदातज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा, यासाठी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार त्यांना दि. 01/01/2014 रोजीचे पत्रान्वये दि. 01/09/2013 ते दि. 31/08/2016 या कालावधीसाठी कार्यादेश देण्यात आला आहे.

दि. 21/07/2016 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये लाईव्ह दर्शन पुरविणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा (व्दितीय वेळेस) मागविणेकामी www.mahatenderd.gov.in व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार व्दितीय वेळेस जाहिरात प्रक्रिया करण्यात आलेली आहे. त्याची तांत्रिक निविदा स्विकारणेची अंतिम दि. 13/09/2016 रोजी आहे. सदर ई-टेंडरव्दारे पुरवठाधारकांची निवड प्रक्रियेसाठी बराचसा वेळ लागणार असल्याने तसेच Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-9) Hyderabad यांचा कालावधी दि. 31/08/2016 रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यांना चारही आरत्यांसह संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल पुर्वीच्या कार्यादेशातील दराप्रमाणे पुढील निवड प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देता येईल. त्यानुसार कार्यादेशाप्रमाणे एका तिमाहीकरीता रक्कम रुपये 6,32,500/- मात्र इतकी रक्कम त्यांचेकडून घेण्यात येत होती. दि. 06/09/2016 रोजीचे ई-मेलने Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-9) Hyderabad यांनी पुर्वीच्या कार्यादेशातील दराप्रमाणे दर देणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी, चारही आरत्यांसह संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल पुरवणिकामी पुढील निवड प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-9) Hyderabad यांना चारही आरत्यांसह संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल पुर्वीच्या कार्यादेशातील दराप्रमाणे मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.६७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिरातील चारही आरत्यांसह संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल पुरवित असलेले Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-9) Hyderabad यांची मुदत संपुष्टात येत असलेने पुढील कालावधीसाठीची ई-निविदा प्रक्रिया होऊन, नवीन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत, त्यांना पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **संस्थानचे सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक:-** सध्या स्मार्ट फोन वापरणाऱ्या भक्तांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. स्मार्टफोन व्दारे विविध ॲप्लीकेशन वापरुन रेल्वे रिझर्वेशन, बस तिकीट, विमान बुकींग, हॉटेल बुकींग आदी सेवा घेणे सहज

शक्य झाले आहे. त्याचप्रमाणे विविध धार्मीक ठिकाणे, प्रेक्षणीय स्थळे आदींची माहिती इंटरनेटवर सहज उपलब्ध आहे.

श्री साईभक्त शिरडीमध्ये आल्यानंतर त्यास स्वत:चे स्मार्ट फोन, टॅब, लॅपटॉपवर वरीलप्रमाणे, इ. सेवा मोबाईलव्दारे घेता येतात तसेच विविध प्रेक्षणीय स्थळे, देवस्थान इत्यादींची इत्यंभुत माहिती इंटरनेटवर (वेबसाईट व मोबाईल ॲप्सवर) उपलब्ध आहे. त्यामुळे वरील सर्व गोष्टींचा विचार करता, श्री साईभक्त शिरडीत आल्यानंतर त्याचा उपरोक्त प्रमाणे बुकींगसाठी अथवा शिरडी जवळील परतीच्या प्रवासात धर्मस्थळे अथवा पर्यटन स्थळे इत्यादीची माहिती घेण्यासाठी इंटरनेट आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे संस्थानचे परिसरात Wi-Fi सुविधा उपलब्ध करता येईल त्यातील ठिकाणे खालीलप्रमाणे.

1. Shri Sai Prasadalay
2. Sai Ashram
3. Sai Bhakta Niwassthan
4. Dwarawati Bhakta Niwas with Garden
5. Sai Prasad Niwassthan
6. Sai Dharmashala
7. Shri Saibaba & Sainath Hospital Aria
8. Bus Stand
9. Railway Station

उपरोक्त ठिकाणी Wi-fi सुविधा उपलब्ध करुन देता येईल. फक्त मंदिर परीसरात मोबाईल व Wi-Fi सुविधा मज्जाव असल्यामुळे सदर ठिकाणचा विचार करता येणार नाही. भविष्यात सुरक्षा करणास्तव, निवासस्थान व प्रसादालयात Wi-Fi सेवा बंद करावयाची असल्यास ती तात्काळ बंद करता येईल.

याबाबत दि.01 सप्टेंबर, 2016 रोजी स्थानिक Wi-fi ऑपरेटर यांची प्राथमिक चर्चा मा.अध्यक्ष सो यांचेसमोर झालेली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे प्रत्येक लोकेशनवर Wi-Fi सुविधा असावी, असे नम्र मत आहे. त्यानुसार साईभक्तांसाठी खालीलप्रमाणे Wi-Fi सुविधा देता येईल.

1. प्रत्येक लोकेशनला किमान 2 Mbps Bandwidth असावी.
2. प्रत्येक साईभक्तास (Users) संस्थान परीसरामध्ये आल्यास त्यास 250 Mb Data विनामुल्य दरात उपलब्ध असावा.
3. रजिस्ट्रेशन (Wi-Fi Access) One Time Password (OTP) द्वारे उपलब्ध असावा.
4. सदर इंटरनेट Wi-Fi सुविधा पुरविणेत येत असतांना काही साईट ब्लॉक करण्याची सुविधा असावी.
5. संस्थानची साईट किंवा मोबाईल ॲप्स प्रायव्हेटेड करण्याची सुविधा असावी.

त्यानुसार खालील पर्यायावर विविध Wi-Fi सुविधा पुरविणाऱ्या विविध कंपन्यांकडून प्रस्ताव घेता येतील.

**पर्याय क्र.01.** प्राथमिक स्वरुपात वरील नमुद केलेल्या तांत्रीक विश्लेषणानुसार रॉयल्टी बेस (Donation) स्वरुपामध्ये विविध ऑपरेटरमार्फत ई-निविदा मागविता येतील. त्यामुळे भक्तांना सुविधा उपलब्ध होतीलच शिवाय यातून मोबदलाही मिळू शकेल. यासाठी फक्त संस्थानला संबंधीत कंपनीसाठी केबल टाकणेस मंजुरी व Network Device केबल द्यावी लागेल. तसेच सदरचे यंत्रणेसाठी लागणारा विद्युत पुरवठा द्यावा लागेल.

**पर्याय क्र.02.** वरील तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे सदर यंत्रणा संस्थानला विकसीत करावी लागेल. यासाठी संस्थानला सर्व खर्च उचलावा लागेल. तसेच दुरूस्ती देखभालीसाठी कर्मचारी आऊटसोर्सेसद्वारे नेमावे लागतील. त्यामुळे साहजिकच सदरचा प्रस्ताव खार्चिक आहे. परंतू भविष्यातील नुतणीकृत साईटेक प्रकल्पासाठी DPR प्रस्तावित आहे. त्यामध्ये सदर गोष्टीचा समावेश करता येऊ शकतो.

**मागणी:** तरी, उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे संस्थान परिसरात (मंदिर परीसर वगळून) तातडीने Wi-Fi सुविधा सुरू करणेकामी पर्याय क्र.01 उपयुक्त आहे असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त विवेचंनानुसार संस्थान परिसरात (मंदिर परीसर वगळून) Wi-Fi सुविधा सुरू करणेकामी रॉयल्टी (Donation) स्वरुपामध्ये विविध ऑपरेटरमार्फत ई-निविदा मागविणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानमधील सर्व निवासस्थाने व प्रसादालय विभाग परिसरामध्ये साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलर करीता वार्षिक इंधन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) २१ (१) चा (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

२) २१ (१) चा (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्तावीक–** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात सन-२००० पासुन लॉण्ड्री युनिट कार्यान्वित करण्यात आलेले आहे. सदर युनिटमध्ये साईप्रसाद निवासस्थान, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, मंदिर, वाहन विभाग, शैक्षणिक संकुले इ. विभागाकडील बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, पडदे, रग, बसेसचे शिटकव्हर, आदी कपडे धुवून इस्त्री केली जातात.

लॉण्ड्रीचे कामकाज गरजेनुसार दोन शिफ्टमध्ये करण्यात येते. त्याद्वारे प्रतिदिवशी (दोन शिफ्ट असल्यास) साधारणपणे १५०० ते १६०० नग कपडे धुवून इस्त्री केले जातात. धुण्यासाठी येणा-या कपडयांमध्ये प्रामुख्याने नमुद निवासस्थान विभागाकडील व्हि.आय.पी. खोल्यांचे धुतलेले टॉवेल सुकविण्यासाठी तसेच पावसाळा व हिवाळा सिझनमध्ये उन्हाचे प्रमाण कमी असते अशा वेळी धुतलेले कपडे सुकविण्यासाठी ड्रायर मशिनचा वापर केला जातो त्यासाठी बॉयलरद्वारे स्टीम देवून कपडे सुकविले जातात, त्याचप्रमाणे धुतलेल्या कपडयांना इस्त्रीकरणेसाठी कॅलेंडर मशिनचा दैनंदिन वापर केला जातो. याकरीता कॅलेंडर मशिनला स्टीम दयावी लागते. मशिनमध्ये धुवून पिळलेले बेडशिट, उशिकव्हर घातल्यावर सुकून इस्त्री होऊन बाहेर पडतात. या दोन्ही मशिनसाठी २०० किलो क्षमतेचा स्टिम बॉयलर कार्यान्वित आहे.

लॉण्ड्रीकरीता माहे- जुलै -२०१५ ते माहे – जुन २०१६ करीता वार्षिक इंधन खरेदी करणेस व याकामी येणा-या रुपये ५,१०,०००/- (अक्षरीरुपये पाच लाख दहा हजार मात्र) खर्चास दि.२४/०६/२०१५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मान्यता देण्यात आलेली होती. सदरचा कालावधी संपलेला असुन, संस्थानचे वाहन विभागामार्फत इंधन खरेदीचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन दि.१९/०५/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मान्यता मिळालेली आहे, यामध्ये संस्थानचे विविध विभागांकरीता लागणारे सर्व प्रकारचे इंधन खरेदीकामी मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरी शिव, शिर्डी यांचे प्रचलीत इंधन दरामध्ये रु.०.५० पैसे मात्र सवलत व मागणीतील अटी/शर्तीनुसार बीलास ३० दिवसाचे क्रेडीट हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, पुरावठा आदेश देण्यात यावा असे नमुद असल्याने जा.नं.एसएसएस/ वाहन/ १२९७/२०१६ दि.१६/०६/२०१६ अन्वये वाहन विभागाने पुरवठा आदेश पारीत केला आहे. तरीसुध्दा सदरकामी येणा-या अंदाजे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता आवश्यक आहे.

लॉण्ड्रीतील स्टिम बॉयलरकरीता दररोज सरासरी २० लिटर डिझेल X ३० दिवस = ६०० लिटर X १२ महिन्याकरीता = ७२०० लिटर लागते, एका वर्षाकरीता स्टिम बॉयलर व कॅलेंडर मशिनकरीता ०५ लिटर ऑईल व सर्व मशिनरी करीता ०३ किलो ग्रीस लागते.

**मागणी-** माहे- जुलै २०१६ ते जुन -२०१७ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७२०० लिटर डिझेल स्टिम बॉयलरसाठी व कॅलेंडर मशिनसाठी ०५ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरीसाठी ०३ किलो ग्रीसची आवश्यकता भासणार आहे.

वरील इंधन खरेदीकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च (संभाव्य वाढ विचारात घेवून ) अपेक्षित आहे .

७२०० लिटर डिझेल X ६० अंदाजे दर रुपये प्रती लिटर = ४,३२,०००/-

०५ लिटर ऑईल X २६० अंदाजे दर रुपये प्रती लिटर = १,३००/-

०३ किलो ग्रीस X ३०० अंदाजे दर रुपये प्रती किलो = ९००/-

**एकूण रुपये - ४,३४,२००/-** **पुर्णांकित रुपये - ४,४०,०००/-**

(अंदाजे पुर्णांकित रुपये चार लाख चाळीस हजार मात्र)

**संस्थान अधिनियम यानुसार छाननी करुन अनुमान–** नमुद अधिनियमातील तरतुदी नुसार व संमत मा.व्यवस्थापन समितीचे मंजुर ठरावानुसार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात असणा-या लॉण्ड्रीतील मशिनरी करीता इंधन खरेदी करता येईल. सदर खर्चाची तरतुद सन २०१६/२०१७ चे अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय –** माहे - जुलै २०१६ ते माहे- जुन २०१७ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७२०० लिटर डिझेल स्टिम बॉयलरसाठी, कॅलेंडर मशिनसाठी ०५ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरींसाठी ०३ किलो ग्रीसची आवश्यकता असून त्याकामी येणा-या अंदाजे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलर करीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वार्षिक इंधन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **सोलापुर चादर खरेदी करणेबाबत.**
**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–**

१) २१ – १ चा (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२) २१ चा २- भक्तांना राहण्यासाठी व वापरण्यासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**प्रस्तावीक–** साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये एकूण ५४४ खोल्या असुन ४८४ खोल्या साईभक्तांचे वापरात आहेत. प्रत्येक खोलीमध्ये साईभक्तांचे मागणीनुसार सोलापुर चादर पुरविल्या जातात. सध्या विभागाकडे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजी झालेल्या सभे मधील विषय नं.२७ व निर्णय क्र.४१५ तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०५/२००८ रोजी झालेल्या सभे मधील विषय नं.४७ व निर्णय क्र.४६० अन्वये खरेदी केलेल्या चादर खालीलप्रमाणे उपलब्ध आहे.

| अ. नं | संगणक कोड | तपशिल | नग | प्रती नग किंमत रु. पैसे | एकूण रुपये | खरेदी दिनांक | मंजुर ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | CLT/६०५२ | सोलापुर चादर | ११७ | १९८/- | २३,१६६/- | ०५/०१/२००६ | २७/४१५ ०६/०८/२००५ |
| २ | CLT/६०५३ | सोलापुर चादर | ५०० | १९६/- | ९८,०००/- | ३१/०१/२००६ | |
| ३ | CLT/६०५४ | सोलापुर चादर | ५०० | १९६/- | ९८,०००/- | ०७/०३/२००६ | |
| ४ | CLT/६०५५ | सोलापुर चादर | ५०० | १९८/- | ९९,०००/- | २३/०३/२००६ | |
| ५ | CLT/६०५७ | सोलापुर चादर | ५०० | १९८/- | ९९,०००/- | ३१/०३/२००६ | |
| ६ | CLT/६०५८ | सोलापुर चादर | ५०० | १९८.६०/- | ९९,३००/- | २९/०४/२००६ | |
| ७ | CLT/६०७६ | मयुर पंखी जॅकवॉर्ड चादर | ६०० | २९०/- | १,७४,०००/- | १०/०१/२००९ | ४७/४६० २४/०५/२००८ |
| ८ | CLT/६०७७ | मयुर पंखी जॅकवॉर्ड चादर | ३०० | २९०/- | ८७,०००/- | ०३/०२/२००९ | |
| ९ | CLT/६०७८ | मयुर पंखी जॅकवॉर्ड चादर | ६०० | २९०/- | १,७४,०००/- | १४/०१/२००९ | |
| | एकुण | | ४११७ | -- | ९,५१,४६६/- | | |

उपरोक्तप्रमाणे सोलापुर चादर गेली ६ ते १० वर्षापासुन वापरात आहेत, दि.०६/०८/२००५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चादरी, गादी व बेडशिट हे जास्तीत जास्त ०३ वर्षाचे धरण्यात यावे व दर तीन वर्षांनी गादी, चादर व बेडशिट बदलण्यात यावे असे ठरले आहे. साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी असते सुमारे ९० ते ९५ % खोल्या भक्तांना निवासासाठी दिलेल्या असतात. सध्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे वर्षातुन सुमारे ८ ते १० महिने तापमान जादा असते. फक्त थंडीच्या ०२ महिन्यांमध्ये चादरमागणी जादा असते, त्यामुळे चादर खराब होण्याचे प्रमाण कमी आहे.

सध्याच्या चादरचा वापर कालावधी जादा झाला आहे परंतु चादर निरुपयोगी झालेल्या नाहीत वापरात आहेत. भावी काळात सदरच्या चादर बदलणे क्रमप्राप्त आहे. सध्या विभागाकडे १७२७ कॉट आहेत प्रत्येक कॉटसाठी ०१-०१ याप्रमाणे १७२७ + १९८ लॉकर्ससाठी प्रत्येकी ०१ व ज्या भक्तांना खोल्या मिळत नाहीत किंवा काही कारणाने खोल्या घेऊ शकत नाही असे साईभक्त कुटुंबीयासमवेत येतात त्यांचे सामान विभागाकडील मोफत क्लोकरुम मध्ये ठेवतात व गादी, चादर घेऊन मोकळे पॅसेज व जनरल हॉलमध्ये झोपतात त्यांची संख्या २५० इतकी आहे म्हणुन १७२७ कॉट + १९८ लॉकर्स + २५० क्लोकरुम मिळून २१७५ चादर एकवेळ लागतात. चादर आपण प्रत्येक आठवडयात धुलाईसाठी देतो व धुतलेल्या स्वच्छ चादर पुरवतो.

यासाठी २१७५ X २ = ४३५० नग + जादा व्यक्ती व चादरी खराब होणे,फाटणे, गहाळ होणे, इत्यादींसाठी ६५० विचारात घेता ५००० नग चादरीची नव्याने खरेदी केल्यास साईभक्तांना चांगल्या दर्जाच्या चादरी पुरविणे सोयीचे होईल. मागील खरेदी केलेल्या प्रत्येक चादरीवर संस्थानचे नाव आहे, याबाबत अनेक साईभक्तांनी यावर मौखिक नाराजी दर्शविली आहे कारण श्री साईबाबांचे नाव, चादर अंगावर घेते वेळी पायाखाली येते. करीता नाव नसलेल्या चादरी खरेदी कराव्यात असे नम्र मत आहे.

**विभागाची मागणी–** सध्या वापरात असणा-या चादरचा वापर कालावधी सुमारे ०६ ते १० वर्ष इतका झाला आहे. श्रीं चा महाशताब्दी सोहळा नजिक आहे. संपूर्ण देशातुन साईभक्त या अभुतपुर्व सोहळयासाठी येण्याची शक्यता आहे, त्यासाठी त्यांना उच्च प्रतीची सेवा सुविधा पुरविणेसाठी सदर नविन ५००० नग सोलापुर चादर खरेदी करणे आवश्यक आहे.

**छाननी करुन अनुमान–** मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने खरेदी करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–** आपणास आवश्यक ५००० नग सोलापुर चादर खालील स्पेसिफिकेशन प्रमाणे खरेदी करावे लागणार आहेत.

| अ.नं | तपशिल | नग |
|---|---|---|
| १ | **सोलापुर चादर** (उच्च दर्जाच्या) - ६०" X ९०" मापाच्या व १४०० ते १५०० ग्रॅम वजनाच्या, १०० % कॉटन. | ५००० |

सदर खरेदीकामी येणा-या अंदाजे खर्चाची तरतुद सन २०१६/२०१७ चे सुधारीत अंदाजपत्रकात करता येईल. येणारा खर्च हा भक्तोपयोगी सेवा, सुविधा प्रदान करण्यासाठीचा असल्याने त्यास शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही, तरी –

१) नमुदप्रमाणे ५००० नग सोलापुर चादर खरेदीकामी येणा-या अपेक्षित खर्चास
२) जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत निविदा सुचना प्रसिध्द करण्यास
३) सदरहु खरेदी, खरेदी विभागामार्फत ई - टेंडर पध्दतीने करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी आवश्यक असलेल्या ५००० नग दर्जेदार चादरी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या चादरींवर पुर्वीप्रमाणे साईबाबा संस्थानचे नावाची छपाई करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२१** **सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** दि.22-23/09/2001 रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र. 418 अन्वये, दिनांक 01 ऑक्टोबर, 2001 पासुन संस्थान कर्मचाऱ्यासांठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी योजना (Policy No.635692) लागु करण्यात आलेली आहे. तसेच निर्णय क्र. 93 दि.12/03/2015 अन्वये दिनांक 01 एप्रिल, 2015 पासुन IRDA च्या नियमानुसार नवीन कर्मचाऱ्यांसाठी नवीन ग्रुप ग्रॅच्युटी योजना (Policy No.709002248) लागु करण्यात आलेली आहे.

सदर दोन्हीही योजनेचे नुतनीकरण दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात करण्यात येत असते. नुतनीकरण करताना त्या वर्षाच्या अंशदानाची रक्कम, लाईफ कव्हर प्रिमीयम आदा करण्यात येतो. मागिल वर्षी मा.व्यवस्थापन

सभेतील निर्णय क्र.355, दि.08.10.2015 अन्वये रु.2.80 कोटी रक्कम डिपॉझीट व प्रिमीयम म्हणून भरण्यास मान्यता मिळाली होती. चालू वर्षासाठी एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांनी दि. 03.09.2016 चे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे रक्कम ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत डिपॉझिट करणेबाबत कळविलेले आहे.

| Policy No:GGCA/635692 | | | Policy No:NGGCA/709002248 | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr** | **Premiun Detail** | **Amount** | **Sr** | **Premiun Detail** | **Amount** |
| 1 | Current Year Contribution | 2,08,63,945.00 | 1 | Current Year Contribution | 5,17,720.00 |
| 2 | Life Cover Premium | 20,26,022.00 | 2 | Life Cover Premium | 36,924.00 |
| 3 | Service Tax | 3,03,903.00 | 3 | Service Tax | 5,539.00 |
| 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 35,32,205.00 | 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 11,85,152.00 |
| 5 | Total Amount Payable | 2,67,26,075.00 | 5 | Total Amount Payable | 17,45,335.00 |
| | **Total Amount Payable for both Policies** | | | | **2,84,71,410.00** |

सदर संपुर्ण रक्कम संस्थानचा खर्च नसुन एलआयसी ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत गुंतवणुक म्हणुन होते व त्यावर वार्षिक 8.35% सरासरी दराने व्याज जमा होते. अशाप्रकारे 31/03/2016 अखेर ग्रॅच्युटी फंडात एकुण रक्कम रु.43,42,81,884/- मात्र जमा असून मागिल वर्षी त्यावर रक्कम रु.3,30,22,439/-मात्र व्याज जमा झाले होते. यामधून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास ग्रॅच्युटी देण्यात येते व मयत झालेल्या कर्मचाऱ्यास त्याच्या उर्वरीत सेवेच्या प्रमाणात क्लेम रक्कम ग्रॅच्युटी फंडातील रक्कमेव्यतीरिक्त क्लेम म्हणून प्राप्त होते. तरी सालाबादप्रमाणे एलआयसी, पुणे यांचेकडून उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे कळविलेली रक्कम रु 2.84,71,410/-मात्र एवढी होते. पुर्णांकीत रक्कम रु.2,85,00,000/-(अक्षरी रुपये दोन कोटी, पंचाऐंशी लाख) मात्र एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी फंडात RTGS द्वारे वर्ग करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.६७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरणाबाबतचे उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेवुन लेखापरिक्षीत लेख्यांसह शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम-२००४ संस्थानसाठी लागु केला असुन, त्या अनुसार संस्थानचे कामकाज सुरु आहे. अधिनियम-२००४ मध्ये कलम १७(२)(ग) मधील तरतुदीनुसार, "विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची, राज्यशासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगतवर्षातील अशा तारखेपर्यत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील. व कलम २९(१)मधील तरतुदीनुसार समिती, त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक साहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारणाऱ्या संस्थांची (संपुर्ण पत्त्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक साहाय्य मागण्यामागील उददेश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवुन घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्ताला, त्या वर्षाच्या ३० जूनच्या आत सादर करील '' अशी तरतुद आहे.

त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्य विधी व न्याय विभाग यांनी जा.क्र.लेखाप-२०१६/३४९/प्र.क्र.७५/ का.सोळा. दि.१६ मे,२०१६.अन्वये मे.शिंदे चव्हाण गांधी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट्स लातुर, यांचेकडून वैधानिक लेखापरिक्षण करुन घेण्याचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन त्यांनी वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण करुन त्याचा अहवाल दि.१४.०९.२०१६ रोजी संस्थानला सादर केला आहे. सदर अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्तांना सादर केल्यानंतर त्यामधील दोष दुरूस्ती बाबतचा अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल.

तरी सदर अहवालाची नोंद घेणेस व लेखापरिक्षित लेख्यांसह शासनाकडे सादर करणेस त्याचप्रमाणे संस्थानचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करणेस, तसेच संस्थान अधिनियम-२००४ मधील

कलम २९(२) नुसार दरवर्षी संस्थानचा वार्षिक अहवाल (प्रशासकीय अहवाल व लेखापरिक्षण अहवाल) नागपुर येथे होणा-या हिवाळी अधिवेशनात विधीमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे बंधनकारक आहे. त्यासाठी सदर अहवालाच्या ५०० प्रती छपाई व ९०० CD तयार करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु. ९०,०००/-(अक्षरी रक्कम रुपये नव्वद हजार मात्र) च्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.६७९** **यावर सविस्तर चचा्र होऊन असे ठरले की, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवाल स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा व त्यावर चर्चा करणेसाठी करणेसाठी संबंधीत लेखापरिक्षकांनाही बोलविणेत यावे.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **शिर्डी नगरपंचायतीस 'शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र. ५४ दफनभुमी जागेसाठी १९ आर क्षेत्र भुसंपदनाकरीता' निधी मंजूर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत यांनी विषयांकित पत्रात खालील प्रमाणे नमुद केले आहे. "शिर्डी शहराची विकास योजना मा.संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य पुणे यांनी त्यांचेकडील अधिसुचना क्रडी.पी./शिर्डी/टीपीव्ही– ०४/ ७३३४ दि.१५.१२.२०१५ अन्वये मंजुर केलेली असून दि.२५.०२.१९९३ पासुन अंमलात आलेली आहे. शिर्डी मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.५४ हे दफनभुमी जागेसाठी आरक्षीत असून आरक्षणाखालील एकुण क्षेत्र १९ आर इतके आहे. सदर आरक्षणाची भुसंपादन यंत्राणा शिर्डी नगरपंचायत आहे. श्री साईबाबा संस्थानकडे निधीसाठी प्रस्ताव सादर करणेसाठी शिर्डी नगरपंचायत सर्वसाधारण सभा दि.२९.०६.२०१५ ठराव क्र.२० अन्वये मंजुरी मिळालेली आहे. आरक्षणाखालील जमीनीची अंदाजीत किंमत रेडी रेकनर २०१५ नुसार रु.१.५१ कोटी इतकी आहे. नगरपंचायतीकडे इतकी मोठी रक्कम उपलब्ध नाही. तरी भुसंपादनाकरीता रु.१.५१ कोटी निधी मंजुर करण्यात यावा." असे त्यांचे पत्रात नमुद केले आहे.

**संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्त अधिनियम २००४ मधील तरतुदीस अनुसरुन मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचा भुसंपादन आरक्षण क्र.५४ हे दफनभुमी जागेसाठी (श्री बिरोबा बनाकडील नविन दफनभुमी) आरक्षीत असून आरक्षणाखालील एकुण क्षेत्र १९ आर इतके आहे. सदर क्षेत्र भुसंपादनासाठी रु.१.५१ कोटी इतका निधी मिळण्याच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास, छाननी समिती समारे विषय ठेवणे आवश्यक आहे, मात्र सध्या छाननी समिती अस्तित्वात नसलेने सदर प्रस्ताव मंजुरीसाठी, मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे पाठविता येईल

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दफनभुमीच्या जागेसाठी शासनामार्फत जागा उपलब्ध करुन देण्यात येत असते, त्याचा पाठपुरावा करणेत यावा अथवा देणगीदाखल जागा मिळणेसाठी प्रयत्न करावेत. तोपर्यंत सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **शिर्डी विमानतळावरील प्रवाशांना बससेवा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम-२००४ मधील तरतुद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिडी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (१)मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच कलम २१ (१) (ग) मध्ये

भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही भक्तांना धार्मीक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, असे नमुद आहे.

**प्रास्ताविक-** उपरोक्त संदर्भिय पत्रात D.C.L. यांनी शिर्डी (काकडी) विमानतळावर येणारे प्रवाशांकरीता शिर्डी येथेजाणे व येणे संस्थानमार्फत A/C बससेवा उपलब्ध करुन द्यावी, असे कळविले आहे.

या पत्रात येणारे विमानाच्या संख्या, वेळा व प्रवासी संख्या इत्यादी माहिती नसलेने किती प्रवाशांची बसव्यवस्था करावयाची याचा अंदाज करता येत नाही.तात्पुरते स्वरुपात ३६ आसनी बस उपलब्ध करुन दिलेस त्यास खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

**अ) संस्थान मार्फत बस खरेदी करुन द्यावयाचे झाल्यासः-**

| **अ.नं.** | **तपशिल** | **भांडवली खर्च (रु.)** | **अंदाजे वार्षिक खर्च(रु.)** |
|---|---|---|---|
| ०१ | **नवीन ०२ वातानुकूलीतबसेस खरेदी खर्च-** (३६+२ सिटर), पुशबॅक सिट, प्रति बस अंदाजे रु२६.००,०००/- प्रमाणे | ५२,००,०००.०० | १०,४०,०००.०० (२०% घसारा) |
| ०२ | **कंत्राटी कर्मचारी वेतन खर्च (वार्षिक)–** **चालक** -२ बस X २ शिफ्ट प्रमाणे ४ X प्रति महा रु.१०,०००/- X १२ महिने = रु.४,८०,०००/- **मदतनीस**-२ बस X २ शिफ्ट प्रमाणे ४ X प्रति महा रु.७,५००/- X १२ महिने = रु.३,६०,०००/- | --- | ८,४०,०००.०० |
| ०३ | **इंधन खर्च (वार्षिक)-** ०१ बसेस करीता प्रति शिफ्ट १२० X २शिफ्ट =२४० X २ बस ४८० कि.मी करीता सरासरी ५ प्रमाणे ९६ लिटर डिझेल करीता X रु.५६/- = रु.५,३७६/- प्रति दिन प्रमाणे वार्षि खर्च (३६५ दिवस). | --- | १९,६२,२४०.०० |
| ०४ | **दुरुस्ती व देखभाल खर्च (वार्षिक)-** प्रतिबस रु.५०,०००/- प्रमाणे. | --- | १,००,०००.०० |
| ०५ | **विमा खर्च (वार्षिक)-** अंदाजे प्रतिबस रु.३५,०००/- प्रमाणे. | --- | ७०,०००.०० |
| ०६ | **RTO टॅक्स खर्च (वार्षिक)–** ३६ सिटर २ वातानुकूलीतप्रवासी बसेस करीता प्रति सिट रु.६,६०० प्रमाणे. | --- | ४,७५,२००.०० |
| ०७ | इतर अनुशंगिक खर्च- | --- | २,५६०.०० |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **५२,००,०००.००** | **४४,९०,०००.००** |

**ब) आऊटसोर्स पध्दतीने बसेस द्यावयाचे झाल्यास-** शिर्डी (काकडी) विमानतळ येथून प्रवासी ने-आण करणे कामी बस सुविधा काम ट्रॅव्हलर कॉन्ट्रक्टर मार्फत आऊट सोसींग पध्दतीने (**प्रवासी भाडे तत्वावर**) ई-निविदा काढुन निम्नतम प्रवासी भाडे घेणेचे मान्य केलेल्या एजन्सीला सदर काम देता येईल.

**क) प्रवाशाकडून घ्यावयाचे सेवाआकार बाबतः-** उपरोक्त **'परिशिष्ट अ'** मधील खर्च विचारात घेता विमानतळावर प्रति दिवस दोन शिफ्ट मध्ये दोन बस करीता नेहमी (३६+३६) असे एकुण ७२ प्रवासी मिळाल्यास शिर्डी येथे आणणे करीता रु.५०/- व सोडविणे करीता रु.५०/- प्रति व्यक्ती सेवाआकार घेतल्यास खालील प्रमाणे सेवाआकार प्राप्त होईल.

| **प्रति बस प्रति शिफ्ट** (आणणे+सोडणे = एकुण) १,८००+१,८०० | **प्रति दिन प्रति बस २ शिफ्ट** (३,६००X२) | **वार्षिक सेवाआकार प्रति बस** (७,२००X३६५) | **वार्षिक सेवाआकार ०२ बस** (२६,२८,०००X २) |
|---|---|---|---|
| ३,६००/- | ७,२००/- | २६,२८,०००/- | ५२,५६,०००/- |

(क-मिळणारा सेवाआकार) रु.५२,५६,०००/- वजा (अ मधील वार्षिक खर्च) रु.४४,९०,०००/- शिल्लक रु. ७,६६,०००/- नुसार ना नफा ना तोटा या तत्वावर बससेवा उपलब्ध करुन देता येईल. (उपलब्ध प्रवासी संख्या कमी झालेस मिळणारे उत्पन्नात त्या प्रमाणात बदल होईल.)

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने, खाली नमुद केलेल्या बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे -

**०१.** विमानातील प्रवाशांकरीता 'अ'संस्थान मार्फत नवीन बसेस खरेदी करुन बससेवा उपलब्ध करुन देणे किंवा 'ब' निम्नतम भाडे आकारुन बससेवा आऊटसोर्स पध्दतीने बससेवेचे काम देणे.

**०२. परिच्छेद 'क'प्रमाणे बस प्रवास सेवाआकार निश्चित करणे.**

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस तसेच वर नमुद केलेप्रमाणे संस्थानमार्फत बससेवा उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास, बस खरेदी कामी किंवा आऊटसोर्स पध्दतीने बससेवेचे काम देणे कामी ई-निविदा प्रक्रिया विहित पध्दतीने राबविणेस तसेच याकामी येणारे सर्वसमावेशक अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणे कामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ तथा निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी विमानतळावरील प्रवाशांकरीता संस्थानमार्फत विमानतळ प्राधिकरणाच्या मागणीप्रमाणे ए.सी.बस उपलब्ध करुन देण्यात याव्या, असे ठरले. त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना फिरते शौचालय देणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी जा.क्र.न पं/टिबल क्र ०६/२४३९/२०१६ दि.१७/०९/२०१६ चे पत्रान्वये,"शिर्डी शहरातील उघडयावरील शौच (ओ.डी.एफ.) तपासणी कामी केंद्रीय पथक शिर्डी येथे येणार आहेत. शहरामध्ये ज्या भागामध्ये काही नागरीक उघडयावर शौचास जात आहे. अशा ठिकाणी फिरते शौचालय ठेवणे आवश्क आहे. तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडील फिरते शौचालय दि.१७/०९/२०१६ ते दि.२३/०९/२०१६ पर्यंत ४ नग मिळणेस विनंती आहे.", असे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानचे वाहन विभागाकडे ०९ फिरते शौचालय आहेत. उपरोक्त मागणी तात्पुरत्या स्वरुपाची असलेने ४ नग फिरते शौचालय वाहन विभागातुन घेवुन जाणे व मुदतीनंतर सुस्थितीत परत आणणे या अटीवर मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उपलब्ध करुन देता येतील.

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दि.१७/०९/२०१६ ते दि.२३/०९/२०१६ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात ४ नग फिरते शौचालय देणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्या प्रस्तावित मागणीस अनुसरुन त्यांना तात्पुरत्या स्वरुपात दि.१७/०९/२०१६ ते दि.२३/०९/२०१६ या कालावधीमध्ये ४ नग फिरते शौचालय वाहन, नगरपंचायतचे काम झाल्यानंतर सुस्थितीत जमा करणेचे अटीवर, उपलब्ध करुन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६** **शिर्डी शहरामध्ये प्रवेश करणाऱ्या वाहनांवर शिर्डी नगरपंचायत मार्फत विशेष स्वच्छता कर वसूल न केल्यामुळे भरपाई रक्कम वाढीव दरासह मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** 01) शिर्डी येथे, श्री साईबाबांचे दर्शनासाठी देशातून व परदेशातून दररोज हजारो साईभक्त येतात संस्थान तर्फे साईभक्तांना आवश्यकतेप्रमाणे सेवा सुविधा देण्यात येतात, तसेच, शिर्डी नगरपंचायती मार्फत देखिल आवश्यक उपाय योजना राबविल्या जातात, शिर्डी नगरपंचायतीकडून दि.1/4/1992, पासून वाहन कर (विशेष स्वच्छता व आरोग्य कर) आकारला जात होता, मात्र, या कर आकारणीमुळे भक्तांच्या भावना दुखावतात व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, यांचेकडूनच सदरचे कराची आकारणी होते, असा साईभक्तांचा गैरसमज निर्माण होतो, असे दिसून आले.

शिर्डी नगरपंचायतीने अशी कर आकारणी करु नये, यासाठी संस्थानने, जा.नं.एसएसएस/वशी-02/13210/2004, दि.31/12/2004, चे पत्राने, शिर्डी नगरपंचायतीस लेखी कळविले होते, याबाबत, नगरपंचायतीने, दि. 11/05/2005, चे पत्राने, टोल नाक्यापासून प्रतिवर्ष मिळणाऱ्या रक्कमे एवढी रक्कम, त्यांना, श्री साईबाबा संस्थानमार्फत मिळावी, सन,2004-05, साली रु.45,61,990/- एवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यात 20% वाढ करण्यात यावी, असे संस्थानला कळविण्यात आले होते.

नगरपंचायतीचे उपरोक्त पत्राबाबत, मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांना द्यावयाच्या अनुदानाबाबत तत्वता: मान्यता देण्यात आली, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांना द्यावयाच्या रक्कमेबाबत, मा.जिल्हाधिकारी, अ.नगर, व स्थानिक विश्वस्त यांचे समंतीने निर्णय घ्यावयाचे ठरले, त्या नंतर, दि.01/10/2005, रोजीचे सल्लागार परिषद सभेमध्ये भक्तांकडुन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांना स्वच्छता व आरोग्य (प्रदुषण) नियंत्रण कर आकारु नये, यासाठी, शिर्डी नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम प्रतिवर्षी रु.40,00,000/- (अक्षरी रुपये चाळीस लाख) मात्र, म्हणजेच प्रति 3 महिन्यास रु.10,00,000/- (अक्षरी रुपये दहा लाख) आगाऊ देण्यात यावे, असे, मा.जिल्हाधिकारी, अ.नगर, यांनी सांगितले व सर्वानुमते त्यास मान्यता देण्यात आली.

त्या नंतर, मा.व्य.समितीचे, दि.5/11/2005, च्या सभेत, विषय नं.2, निर्णय क्र.651 (6) उपरोक्त प्रमाणे रक्कम अदाईसाठी मान्यता देणेत आली, तसेच, याकामी शासनाची परवानगी घ्यावी, असे ठरले.

02) उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांनी भक्तांकडुन स्वच्छता व आरोग्य (प्रदुषण) कर आकारु नये, भक्तांच्या सोईसाठी अनुदान रक्कम रु.40,00,000/- (अक्षरी रुपये चाळीस लाख) मात्र, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांना प्रतिवर्षी देण्यास मान्यता मिळणेकामी संस्थानने जा.नं.एसएसएस/वशी-02/13054/05 दि.09/11/2005, अन्वये, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना प्रस्ताव सादर केला होता, त्यावर, महाराष्ट्र शासनाचे क्र.बैठक 2010-प्र.क्र.16/10/का-सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.7/4/2010, रोजीचे पत्रा सोबतचे, दि.27/1/2010, रोजीचे, बैठक इतिवृत्तात, रक्कम रु.50,00,000/-, मात्र दर वर्षी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांना अदा करणेबाबत मान्यता दिलेली आहे, परंतु, त्याबात इतिवृत्ता शिवाय वेगळा आदेश प्राप्त झालेला नाही.

03) दरम्यानच्या काळात संस्थानने, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांना, मा.व्यवस्थापन मंडळाच्या ठरावास अनुसरुन व शासन मान्यतेस अधिन राहुन खालील प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे.

नोव्हेंबर -२००५ ते मार्च २०१२ अखेर शिर्डी नगरपंचायत यांना अदा करण्यात्त आलेली रक्कम.

| **अ. क्र.** | **शिर्डी नगरपंचायत यांचेकडील मागणी दिनांक/ महिना** | **मा. व्यवस्थापन मंडळाचा ठराव क्र. निर्णय क्र.** | **शिर्डी न.पं. यांना अदा केलेली रक्कम रु.** | **शिर्डी न.पं. यांना अदा केलेल्या रक्कमेचा पा.क्र.** |
|---|---|---|---|---|
| १ | नोव्हें./ डिसें, २००५ ते जाने, २००६ | दि. ४/०२/२००६<br>आ.वे.वि.नं.२३, निर्णय क्र. ९८ | १०,००,०००/- | पा.नं. ५०३०३<br>दि. १३/०३/२००६ |
| २ | फेब्रुवारी/ मार्च / एप्रिल २००६ | दि. ३/६/२००६<br>आ.वे. वि.नं.३३, निर्णय क्र. ४०८ | १०,००,०००/- | पा.नं. ५१७४६<br>दि. २७/०६/२००६ |
| ३ | मे २००६ ते जुलै २००६ | दि. १४/१०/२००६<br>आ. वे.वि.नं.४४,निर्णय क्र. ८२७ | १०,००,०००/- | पा.नं. ५३२२९<br>दि. १९/१०/२००६ |
| ४ | ऑगष्ट २००६ ते ऑक्टोबर २००६ | दि. ०६/०१/२००७<br>आ. वे.वि.नं.३८,निर्णय क्र. १०६ | १०,००,०००/- | पा.नं. ५४६६४<br>दि. २६/०१/२००७ |
| ५ | नोव्हेंबर /डिसेंबर २००६ ते जाने, २००७ | दि. ०६/०१/२००७<br>आ. वे.वि.नं.३८,निर्णय क्र. १०६ | १०,००,०००/- | पा.नं. ५४६७९<br>दि. १३/०३/२००७ |
| ६ | फेब्रुवारी २००७ ते डिसेंबर २००७ | दि. १०/०१/२००८<br>आ. वे.वि.नं.२२,निर्णय क्र. १३३ | ३६,६६,६६६/- | पा.नं. ५६७०७<br>दि. ०१/०२/२००८ |
| ७ | जानेवारी २००८ ते जुन २००८ | दि. ७/७/२००८<br>आ. वे.वि.नं. १९,निर्णय क्र. ६२४ | २०,००,०००/- | पा.नं. २६७६<br>दि. १६/०७/२००८ |
| ८ | जुन २००८ अखेर १० % वाढ | दि. ७/७/२००८<br>आ. वे.वि.नं. ३५,निर्णय क्र. ५९३ | ९,५९,९९९/- | पा.नं. ६३४४०<br>दि. १८/०८/२००८ |
| ९ | जुलै २००८ ते ऑगष्ट २००८ | दि. ७/७/२००८<br>आ. वे.वि.नं. ३५,निर्णय क्र. ५९३ | ८,०६,६६६/- | पा.नं. ४६२२५१<br>दि. १८/१०/२००८ |
| १० | सप्टेंबर २००८ ते डिसेंबर २००८ | दि. ७/७/२००८<br>आ. वे.वि.नं. ३५,निर्णय क्र. ५९३ | १६,१३,३३२/- | पा.नं. ६५५१०<br>दि. १८/०२/२००९ |
| ११ | जानेवारी २००९ ते मार्च २००९ | दि. ७/७/२००८<br>आ. वे.वि.नं. ३५,निर्णय क्र. ५९३ | १२,०९,९९९/- | पा.नं. ६६८८९<br>दि. ०४/०५/२००९ |
| १२ | एप्रिल २००९ ते मार्च २०१० | शासन मंजुरी क्र. २०१० प्रक्र. १६/१० का. १६ विधी व न्याय | ५०,००,०००/- | पा.नं. ७६७०२<br>दि. १४/०५/२०१० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विभाग मुंबई येथील विशेष सभा दि.२७/०१/२०१० रोजी सभेतील विषय नं. १३ अन्वये मंजूरी | | |
| १३ | एप्रिल २०१० ते मार्च २०११ | शासन मंजुरी क्र. २०१० प्रक्र. १६/१० का. १६ विधी व न्याय विभाग मुंबई येथील विशेष सभा दि २७/०१/२०१० रोजी सभेतील विषय नं. १३ अन्वये मंजूरी व दि २६/०३/२०११ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं. ४१ निर्णय क्र. २४१ अन्वये | ५०,००,०००/- | रु. ५०,००,०००/- युनियन बॅंक शाखा शिर्डी चा चेक क्र. ५८७७४१ दि. ०८/०६/२०११ ने रक्कम अदा केली आहे. पा.नं. ८५९०६ दि. ०६/०७/२०११ |
| १४ | एप्रिल २०११ ते जुन २०११ | शासन मंजुरी क्र. २०१० प्रक्र. १६/१० का. १६ विधी व न्याय विभाग मुंबई येथील विशेष सभा दि.२७/०१/२०१० रोजी सभेतील विषय नं. १३ अन्वये मंजूरी व दि २८/०८/२०११चेमा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं. ५७ निर्णय क्र.६५२ व दि. २४/०९/२०११विषय नं. १ निर्णय क्र. ६७४ अन्वये | १२,५०,०००/- | रु. १२,५०,०००/- युनियन बॅंक शाखा शिर्डी चा चेक क्र. ०३९१७२ दि. १८/१०/२०११ ने रक्कम अदा केली आहे. पा.नं. ८५९४७ दि. २९/१०/२०११ |
| १५ | जुलै २०११ ते सप्टेंबर २०११ | वरिल प्रमाणे | १२,५०,०००/- | रु.१२,५०,०००/- कार्पोरेशन बॅंक शाखा शिर्डी चा चेक क्र. ३८८९२ दि. १९/०३/२०१२ ने रक्कम अदा केली आहे. पा.नं. ९१३५० दि. ३०/०३/२०१२ |
| १६ | ऑक्टोबर २०११ ते मार्च २०१२ | वरिल प्रमाणे | २५,००,०००/- | रु. २५,००,०००/- युको बॅंक शाखा शिर्डी चा चेक क्र. ९६४५८० दि. ०१/०८/२०१२ ने रक्कम अदा केली आहे. |
| | | **एकुण रक्कम रु.** | **३,०२,५६,६६२/-** | |

04) शिर्डी, नगरपंचायत शिर्डी, यांचेकडुन, पुन्हा, दि.17/10/2013, रोजीचे पत्राने, सन 2012-2013, कालावधीचे रक्कम रु.50,00,000/- व सन, 2013-2014, या कालावधीसाठी रक्कम रु.50,00,000/- असे, एकुण रक्कम रु.1,00,00,000/-, मिळणेस विनंती करण्यात आली होती, त्यानुसार, मा.त्रिसदस्य समितीचे, दि.14/11/2013, रोजीचे सभेत, विषय नं.28, निर्णय क्र.917, अन्वये, सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांना दिल्या जाणाऱ्या विशेष स्वच्छता कर/आरोग्य कर (नाके) अनुदानाबाबत अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही. शासनाकडून मान्यता आल्यानंतर संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी व त्यानंतर सदरहू अनुदान शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना आदा करणेत यावे, असे ठरले आहे. प्रस्तुतचे ठरावास अनुसरुन जा.क्र. एसएसएस वशी विधी / 4537/2013, दि.3/1/2014, ने शासनास मान्यता देणेबाबत विनंती केली आहे (अद्याप शासनाची मान्यता प्राप्त नाही.)

05) शासनाने आता, दि.15/1/2014, रोजीचे पत्राने, शिर्डी, येथील, तत्कालीन व्यवस्थापन समितीच्या, दि.27/1/2010, रोजी झालेल्या बैठकीत, शिर्डी नगरपंचायतीस, प्रतिवर्षी रु.50/-, लाख देण्याबाबत निर्णय घेण्यात आला, तथापि, याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला नाही, असे इकडेस कळविले आहे, त्याच प्रमाणे, श्री साईबाबा संस्थानकडून, शिर्डी नगरपंचायतीस, सदर करापोटी देण्यात येणाऱ्या रकमांचा

वर्षनिहाय सविस्तर तपशील, तसेच, नगरपंचायतीकडून संस्थानला कोणत्या सवलती दिल्या जातात, याचा सविस्तर तपशील शासनाकडून मागविणेस आला आहे, तसेच, या बाबींचा आढावा घेऊन, या संदर्भात निश्चीत धोरण ठरविण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, संस्थानकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशा आशयाचे पत्र पाठविले आहे.

आता, शिर्डी नगरपंचायतीने, जा.क्रं.न.पं./टी-2/220/2014, दि.20/1/2014, रोजीचे, संस्थानला पत्र पाठविले आहे, त्या पत्रामध्ये, दि.1/4/2002, पासून, शिर्डी, शहरात येऊन थांबणाऱ्या वाहनांवर विशेष स्वच्छता/आरोग्य कर आकारणेस सुरुवात केली व माहे नोव्हेंबर, 2005, पर्यंत विशेष स्वच्छता/आरोग्य कराची आकारणी केलेली आहे, त्या नंतर, श्री साईबाबा संस्थानने, सन 2004-05, या आर्थीक वर्षातील उत्पन्ना इतकी विशेष स्वच्छता/आरोग्य करापासूनची मिळालेली रक्कम, नगरपंचायतीस दिल्यास, सदर कर बंद करणेस परवानगी दिलेली होती, त्या नुसार, प्रत्येक वाहनाकडून प्रत्यक्ष फी वसूल करणेऐवजी साईबाबा संस्थानकडून, शिर्डी नगरपंचायतीस, नोव्हेंबर 2005, पासून, प्रतीवर्षी रु.40,00,000/-, रक्कम आणि त्या पुढील, प्रतिवर्षी 10% वाढीसह एकरकमी रक्कम आर्थीक मदत म्हणून देणेचे ठरले व त्या नुसार, नगरपंचायतीस खालील प्रमाणे वर्षनिहाय आर्थीक मदत प्राप्त झालेली आहे, असे प्रस्तुत पत्रात नमुद केले आहे, प्राप्त रक्कमेचा तपशिल खालील 10% रक्कमेची वाढीव रक्कम त्यांचे हिशोबाप्रमाणे संस्थानकडून मागणी केली आहे.

| अ.क्र. | वर्ष | ठरल्याप्रमाणे संस्थानकडून नगरपंचायतीस देय रक्कम | नगरपंचायतीस प्रत्यक्षात अदा करण्यात आलेली रक्कम | १०% वाढीव फरकासह शिल्लक रक्कम | १०% वाढीव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००५ - २००६ | ४०,००,०००/- | ४०,००,०००/- | निरंक | -- |
| २ | २००६ - २००७ | ४४,००,०००/- | ४४,००,०००/- | निरंक | -- |
| ३ | २००७ - २००८ | ४८,४०,०००/- | ४८,४०,०००/- | निरंक | -- |
| ४ | २००८ - २००९ | ५३,२४,०००/- | ५०,००,०००/- | ३,२४,०००/- | **१०%** |
| ५ | २००९ - २०१० | ५८,५६,४००/- | ५०,००,०००/- | ८,५६,४००/- | **१०%** |
| ६ | २०१० - २०११ | ६४,४२,०४०/- | ५०,००,०००/- | १४,४२,०४०/- | **१०%** |
| ७ | २०११ - २०१२ | ७०,८६,२४४/- | ५०,००,०००/- | २०,८६,२४४/- | **१०%** |
| ८ | २०१२ - २०१३ | ७७,९४,८६८/- | -- | ७७,९४,८६८/- | **१०%** |
| ९ | २०१३ - २०१४ | ८५,७४,३५५/- | -- | ८५,७४,३५५/- | **१०%** |
| | **एकुण रु. -** | **५,४३,१७,९०७/-** | **३,३२,४०,०००/-** | **२,१०,७७,९०७/-** | **१०%** |

संस्थानकडून, शिर्डी नगरपंचायतीस ठरविल्याप्रमाणे विशेष स्वच्छता/ आरोग्य रक्षण करापोटी आर्थीक मदत प्राप्त झालेली नाही व चालू आर्थिक वर्ष, सन 2013-2014, अखेर, रु.2,10,77,907/-, एवढी रक्कम अप्राप्त राहिलेली आहे, असे त्यांचे म्हणणे प्रस्तुत पत्रात नमुद केले आहे, शिर्डी, शहर, श्री साईबाबांच्या मंदीराच्या अस्तित्वामुळे जगप्रसिध्द झाले आहे, त्यामुळे, शिर्डीला, दररोज सुमारे एक लाख भाविक साईबाबांचे दर्शनासाठी भेट देत आहेत, तसेच, महत्वाच्या वर्षिक सण व उत्सवांच्या कालावधीत भाविकांची संख्या सुमारे 2 ते 3 लक्ष एवढी प्रचंड प्रमाणात वाढत असते, नगरपंचायतीचे स्वत:चे उत्तन्न रहीवाशी नागरीकांकडून वसूल घेणाऱ्या घरपट्टी, पाणीपट्टी, व दुकानभाडे व विविध फी व्दारे जमा होत असून, सदर उत्पन्न वार्षिक सरासरी रु.2.5 कोटी एवढेच आहे, नगरपंचायतीने सदर उत्पन्नामधून आपल्या रहीवाशी नागरीकांना स्वच्छता, दिवाबत्ती, पाणीपुरवठा, रस्ते, बाजार, सांडपाणी निकासी, बगीचे इ., नगरपरिषद कायदा, 1965, कलम 49, मध्ये नमुद, सुमारे 62 प्रकारची कामे पार पाडावयाची आहेत, सदरची जबाबदारी पार पाडणेसाठी नगरपंचायत स्वत:चे तुटपूंजे उत्पन्न व शासनाच्या विविध योजनांमधून अनुदान मिळवून प्रयत्न करीत आहे, साईबाबांची महती जगभर झपाट्याने पसरत गेल्यामुळे भाविक व वाहनांचे प्रमाण प्रतीवर्ष तीन ते चार पटीने वाढत चाललेले आहे.

तरी, शिर्डी नगरपंचायतीस संस्थानकडून विशेष स्वच्छता/आरोग्य कर पोटी ठरल्याप्रमाणे अदा करण्यात न आलेली सन, 2008-2009 ते 2013-2014, या आर्थीक वर्षाची शिल्लक रक्कम रु.2,10,77,907/-, मिळावी, तसेच, दि.1 एप्रिल, 2014, पासून, पुढील कालावधीत प्रती वर्षी विशेष स्वच्छता करापोटी रु.2,00,00,000/-, नगरपंचायतीस मिळणेस विनंती आहे, आपणाकडून सदर करापोटी भरपाई न मिळाल्यास, शिर्डी नगरपंचायत, दि.1 एप्रिल, 2014, पासून, शिर्डी शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांकडून विशेष स्वच्छता

कर/आरोग्य रक्षण कराची (नाके) पुर्ववत वसुली चालू करेल, याची नोंद घ्यावी ही विनंती, अशा आशयाचे पत्र शिर्डी नगरपंचायतीने दिलेले होते.

शिर्डी नगरपंचायत, यांनी वाढीव 10% रकमेची मागणी, या पुर्वीही, दि.4/2/2012, व दि.29/10/2012, रोजीचे पत्राने केली होती, मात्र शासनाचे इतिवृत्तास अनुसरुन, नगरपंचायतीस रु.50/- लाख अदा करीत असल्याचे, नगरपंचायतीस,या पुर्वीच, जा.क्र.एसएसएस वशी विधी/1508/2012, दि.7/7/2012, व जा.क्र.एसएसएस वशी विधी/4921/2013, दि.28/1/2013, चे पत्राने कळविणेत आले आहे, आता देखील, नगरपंचायतीने 10% वाढ हिशोबी धरुन रक्कम कळविलेली आहे, त्याच प्रमाणे, शिर्डी, येथे येणारे गर्दीचे हिशोबाने रक्कम रु.2/- कोटी प्रतिवर्षी नगरपंचायतीस मिळणेबाबत विनंती केलेली आहे, नगरपंचायतीस, शासनाचे, दि.7/4/2010, रोजीचे पत्राप्रमाणे, प्रतिवर्षी द्यावयाचे रक्कम रु.50/- लाख मात्रचे, मंजूरीसाठी, मा.त्रिसदस्य समितीचे, दि.14/11/2013, रोजीचे सभेत, विषय नं.28, निर्णय क्र.917, अन्वये, सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांना दिल्या जाणाऱ्या विशेष स्वच्छता कर/ आरोग्य कर (नाके) अनुदानाबाबत, अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही, शासनाकडून मान्यता आल्यानंतर संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी व त्यानंतर, सदरहू अनुदान, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, यांना आदा करणेत यावे, असे ठरले आहे.

शिर्डी नगरपंचायतीस रक्कम अदायगीसाठी शासन स्तरावर प्रकरण चालू आहे, शासनाने, दि.15/1/2014, रोजीचे पत्राने कळविले आहे की, शिर्डी नगरपंचायतीस प्रतिवर्षी रू.50/- लाख देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, तथापी, याबाबत शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला नाही, असे कळविले असून, शासनाने खालील मुद्यांवर संस्थानकडून माहिती मागविणेत आलेली आहे.

1) श्री साईबाबा संस्थानकडून, शिर्डी नगरपंचायतीस, सदर करापोटी देण्यात येणाऱ्या रकमांचा वर्षनिहाय सविस्तर तपशील, तसेच, नगरपंचायतीकडून संस्थानला कोणत्या सवलती दिल्या जातात, याचा सविस्तर तपशील.

2) तसेच, या बाबींचा (उपरोक्त बाबींचा) आढावा घेऊन, या संदर्भात निश्चीत धोरण ठरविण्याचा प्रस्ताव, शासनास, संस्थानकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर शासन स्तरावर पुढील निर्णय देणार आहे.

नगरपंचायतीकडून संस्थानला पुरविणेत येणारे सुविधांबाबत, संस्थानचे संबंधित विभागांनी/खात्यांनी नगरपंचायतीकडून, संस्थानला सवलती देणेत येत नसल्याचा अहवाल दिलेला आहे, नगरपंचायतीकडून याबाबत माहिती प्राप्त होत आहे.

संस्थानकडून, शासन निर्णया प्रमाणे, मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे रक्कम, नगरपंचायतीस अदा करणेत येईल, असे नगरपंचायतीस कळविता येईल, त्या प्रमाणे, त्यांनी, रु.2/- कोटी वाढीव रक्कमेची प्रतिवर्षी मिळणेबाबत, दि.1/4/2014, पासून स्वच्छता कराची रक्कम मिळणेबाबत मागणी केलेली आहे, संस्थानकडून करापोटी भरपाई (रक्कम) न मिळालेस, दि.1/4/2014, पासून, शिर्डी, शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांकडून विशेष स्वच्छता कर/ आरोग्य रक्षण कराची (नाके) पुर्ववत वसुली चालू करेल, याची नोंद घ्यावी, अशा आशयाचे पत्र नगरपंचायतीने दिलेले आहे.

शिर्डी, येथे येणारे भक्तांचे संख्येत दिवसें दिवस होणारी वाढ, शिर्डी, येथे रस्ते, साफसफाई, रहदारी, बाजार, पार्किंग, पाणी इ. पायाभूत सुविधावर तान येत आहे इ. मुद्दे, नगरपंचायतीने त्यांचे पत्रात नमुद केलेले आहेत, उपरोक्त, परिस्थीतीबाबत, शिर्डी नगरपंचायतीस, रु.2/- कोटी वाढीव द्यावयाचे पथकराचे रक्कमेबाबत व शासनास सादर करावयाचे प्रस्तावाबाबतचा विषय, दि.5/6/2014, चे, मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता, त्यावर खालील प्रमाणे निर्णय झाला आहे.

निर्णय क्र. 434:- प्रस्तावित कामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले आहे.

प्रस्तुतचे निर्णयास अनुसरुन, मा.उच्च न्यायालयात, सिव्हील अर्ज नं.4753/2015 दाखल करण्यता आला होता, सदरचा सिव्हील अर्ज, मा.व्यवस्थापन समितीचे, दि.16/8/2016, चे सभेतील निर्णय क्र.566, अन्वये, मा.उच्च न्यायालयातून, दि.8/9/2016, रोजी मागे घेण्यात आलेला आहे.

तरी, शिर्डी, येथे येणारे भक्तांचे संख्येत दिवसें दिवस होणारी वाढ, शिर्डी, येथे रस्ते, साफसफाई, रहदारी, बाजार, पार्किंग, पाणी इ. पायाभूत सुविधावर ताण येत आहे इ. मुद्यांचा विचार करता, शिर्डी नगरपंचायतीस,

रु.2/- कोटी वाढीव द्यावयाचे पथकराचे रक्कमेबाबत शासनास प्रस्ताव सादर करुन शासनाची मान्यता घेवून रक्कम अदा करणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमार्फत, शिर्डी नगरपंचायतीस साफ-सफाईसाठी दररोज ४० सफाई कर्मचारी पुरविले जात आहेत, तसेच श्री साईबाबा संस्थान व शिर्डी शहर/ परिसरातील कचऱ्यांचे व्यवस्थान करणेसाठी घनकचरा प्रकल्प राबविणेबाबतची कार्यवाही चालू असून, त्या संदर्भात वेगवेगळया कंपन्यांचे सादरीकरणही झालेले आहे व हा सर्व खर्च संस्थान करणार आहे. यामुळे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना वेगळा विशेष स्वच्छता/ आरोग्य रक्षण कर देणे उचित वाटत नाही, असे समितीचे मत झाले, सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७** **संस्थानचेसाईआश्रम-१ लगत असलेल्या वाटाघाटीने जमीनी सर्वे नं.१०७/४, १०७/१०, १०७/११, १०७/१४, १०७/६ या कायम खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव-** संस्थानचे साईआश्रम प्रकल्पाचे लगतची मौजे शिर्डी येथील जमीन संस्थानने कायम खरेदी करणेकामी खालील जमीन मालकांनी प्रस्ताव सादर केलेले आहेत.

| अ.नं. | नांव | क्षेत्र<br>हे.आर.चौमी |
|---|---|---|
| १ | श्री.प्रभाकर गोविंदराव कोते, श्री.कैलास गोविंदराव कोते व सौ.सुमित्रा कैलास कोते<br>सर्वे नं.१०७/४,१०७/१०,१०७/११,१०७/१४ | ०.२६.०४<br>०.४९.८८ + पोटखराबा ०.०७<br>०.६१.०० + पोटखराबा ०.०६<br>०.५६.१३ + पोटखराबा ०.०४<br>२.१०.०५ |
| २ | श्री.कैलास गोविंदराव कोते,श्री.नितीन भानुदास औताडे व श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर<br>सर्वे नं.१०७/६ | ०.६०.००<br>०.४२.२५<br>१.०२.२५ |

**प्रस्तावना–** श्री.प्रभाकर गोविंदराव कोते,श्री.कैलास गोविंदराव कोते व सौ.सुमित्रा कैलास कोते तसेच श्री.कैलास गोविंदराव कोते,श्री.नितीन भानुदास औताडे व श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर,रा.शिर्डी,ता.राहाता यांचे दि.१५/०२/२०१६ रोजीचे अर्जान्वये त्यांचे मालकीची वरीलप्रमाणे वर्णन असलेली जमीन संस्थानला कायम खरेदी देणेबाबत इकडेस प्रस्ताव सादर केलेले आहेत. सदरहू जमीन संस्थानचे साईआश्रम-१ लगत आहे.

सदरचे एकूण क्षेत्र २.१०.०५ ही कलेक्टर एन.ए.जमीन व क्षेत्र १.०२.२५ ही येलो झोन मधील जमीन श्री साईबाबा संस्थानला थेट पध्दतीने (वाटाघाटीने) विकत देणेबाबत श्री.प्रभाकर गोविंदराव कोते व इतर २ तसेच श्री.कैलास गोविंदराव कोते व इतर दोन यांनी विषयांकित अर्ज केलेले आहेत त्यात त्यांनी उपरोक्त जमीनी देतांना त्यांना सन २०१५ च्या भूसंपादन कायद्याप्रमाणे जमीन देणे आहे. तसेच सदर जमीन भूसंपादन कायद्याप्रमाणे संस्थानने विचार केल्यास अर्जदार सदर जमीन संस्थानला देण्यास तयार आहेत,असे बाबत दि.१५/०२/२०१६ रोजीच्या अर्जात नमूद केलेले आहे.

सदरचे अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०५/२०१६ रोजीचे सभेत विषय नं.२१ व २२ अन्वये सादर करण्यात आले असता त्यावर सविस्तर चर्चा होवून निर्णय क्रं.२८५ व २८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

"यावर सविस्तर चर्चा होवून प्रस्तावित जमीन अर्जदार शासकीय रेडी रेकनरच्या दराप्रमाणे देण्यास तयार असेल तर त्याकामी येणा-या एकूण खर्चास मान्यता मिळणेकामी संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज दाखल करणेत यावा",असे ठरले.

त्यानुसार जमीनमालक यांना मा.त्रिसदस्य समितीचा झालेला निर्णय दि.०७/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेला आहे.

त्यानुसार जमीनमालक यांनी दि.०९/०७/२०१६ रोजीचे अर्जान्वये उक्त जमीनीची किंमत प्रति गुंठा रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी रु.वीस लाख मात्र) प्रमाणे अपेक्षित असल्याचे कळविलेले आहे. तसेच त्यांना वाटाघाटीसाठी बोलवावे,अशी विनंती केलेली आहे.

उक्त जमीनींचे मुल्यांकनाबाबत दुय्यम निबंधक श्रेणी -१ राहाता यांनी त्यांचेकडील दि.१३/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये मौजे शिर्डी ता.राहाता येथील उक्त जमीन स.नं.१०७ चा बाजारमुल्य दर तक्ता २०१६-१७ च्या विभाग क्र.१/६०अ मध्ये समाविष्ट असून सदर विभागात जमीनीचे प्रती चौ.मी.दर रु.९३००/- इतके देणेत आलेले आहेत. त्याप्रमाणे प्रती आर (१०० चौ.मी.) चे मुल्यांकन रु.९,३०,०००/- (अक्षरी रु.नऊ लाख तीस हजार) इतके होईल.

प्रस्तुतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४/०७/२०१६ रोजीच्या सभेत विचारार्थ सादर करणेत आला होता. त्यात विषय नं.१९ निर्णय क्रं.४३२ व विषय नं.२० निर्णय क्रं.४३३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून प्रस्तावित जमीन संस्थान मिळकतीच्या लगतची असल्यामुळे ती विकत घेणे संस्थानसाठी फायदेशीरच ठरेल. परंतु सदरहू जमीन विकत घेणेपूर्वी जमीन मालकांशी जमीनीच्या दराबाबत चर्चा करुन अंतिम रक्कम ठरवून घेण्यात यावी व सदरहू खर्चास मान्यता घेणेकामी संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेबाबतचा प्रस्ताव मंजूरीसाठी समितीसमोर सादर करणेत यावा." असे ठरले.

सदरच्या निर्णयाप्रमाणे उपरोक्त जमीन मालकांना इकडील दि.०८/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविणेत येवून उक्त जमीन ते अंतिम कोणत्या दराप्रमाणे संस्थानला कायम खरेदी देण्यास तयार आहेत याबाबतची विचारणा करण्यात आली.

त्यास अनुसरुन त्यांनी दि.०९/०९/२०१६ रोजीचे अर्जान्वये त्यांना जमीनीची किंमत प्रती गुंठा रक्कम रु.२०,००,०००/- (रु.वीस लाख मात्र) प्रमाणे अपेक्षित असलेचे कळविले असून त्यात वाटाघाटीनेच सदर जमीन ते देणेस तयार आहेत. तरी जमीन खरेदी करणेसाठी त्यांना वाटाघाटी (निगोशिएशन) करीता बोलवावे,असे बाबत अर्जात नमूद केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** सदर जमीन संस्थानचे साईआश्रम-१ लगत आहे. करीता भक्तनिवास बांधणे तथा भक्तांकरीता सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी सदर जमीन उपयोगी ठरेल.

तरी मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४/०७/२०१६ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार जमीन मालक यांचेशी जमीनीचे दराबाबत चर्चा करुन अंतिम रक्कम ठरविणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित मिळकती खरेदी करणेबाबत दि.१४.०७.२०१६ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन व्यवस्थापन समितीचे सध्याचे मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांनी जमीन मालकांशी चर्चा करुन जमीनीची किंमत अंतीम करावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **दरवर्षीप्रमाणे सन २०१७ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन विक्री करणेकामी सिलबंद पाकीटे व तांत्रिक ई- निविदा (Technical Bid) पात्र निविदाकार यांचे सिलबंद दरपत्रके (Commercial Bid) उघडणे, निम्मत्तम दर देऊ केलेल्या निविदाकारांना कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन किफायतशिर किंमतीला विक्री केल्या जातात.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव:-** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका सन २०१७ ची छपाई करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये. ४,८६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली तसेच संबंधीत विभागाने प्रस्तावित प्रकाशने श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये विक्रीसाठी उपलब्ध होतील यादृष्टीने कार्यवाही करावी, असा निर्णय मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १६.०८.२०१६ रोजी निर्णय क्र. ५७४ नुसार झालेला आहे.

**प्रस्ताव:-** सन २०१६ चे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनुसार वृत्तपत्रात व संस्थान संकेतस्थळावर ई-निविदा सुचना प्रसिध्द

करुन दि.०६.०९.२०१६ ते दि. १३.०९.२०१६ पर्यंत ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सिलबंद पाकीटे दि.१४.०९.२०१६ अखेर मुंबई व शिर्डी कार्यालयाकडे जमा झालेली आहे.

मा.उपसमिती दि. १६.०९२०१६ रोजीच्या सभेमध्ये १० प्राप्त ई-निविदेतील सिलबंद पाकीटे व लिफाफा क्र.०१ तांत्रिक बीड (Technical Bid) उघडून कागदपत्रे व दैनंदिनी, दिनदर्शिका नमूने निविदेतील अटी/शर्तीनसार असल्याची तपासणी करुन पात्र/ अपात्र स्पर्धक निविदाकारांचा तक्ता खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

| अ.नं. | **निविदाकारांचे नावे** | **पात्र / अपात्र** |
|---|---|---|
| ०१ | अदीनाथ प्रिंट, मुंबई | पात्र |
| ०२ | निट प्रिंटर्स,अहमदनगर | पात्र |
| **०३** | **विकास प्रिटिंग कॅरीअर्स प्रा.लि., नाशिक** | **अपात्र** |
| ०४ | चेरी ऑफसेट, सोलापूर | पात्र |
| **०५** | **सकाळ पेपर्स प्रा. लि., कोल्हापूर** | **अपात्र** |
| ०६ | प्रिन्ट प्लस प्रा. लि , मुंबई | पात्र |
| ०७ | टॅको व्हीजन प्रा. लि. मुंबई | पात्र |
| ०८ | जयंत प्रिन्टरी, मुंबई | पात्र |
| ०९ | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि, मुंबई | पात्र |
| १० | मनिपल टेक्नालॉजी, मनिपल कर्नाटक | पात्र |

**विभागाची मागणी:-** प्रस्तावित श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये विक्रीसाठी उपलब्ध होतील यादृष्टीने कार्यवाहीकामी तांत्रिक ई निविदेतील पात्र निविदाकार यांचे दरपत्रके उघडणे व दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी कार्यादेश देणे आहे.

प्राप्त ई-निविदेतील लिफाफा क्र.०१ तांत्रिक बीडमधील ०८ पात्र निविदाकारांचे सिलबंद दरपत्रके (Commercial Bid) आजचे व्यवस्थापन समिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| अ.नं. | निविदाकारांचे नाव | श्री साई दैनंदिनी-२०१७ | श्री साईबाबा दिनदर्शिका-२०१७ (आकार११"X२१") | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स- २०१७ | श्री साईबाबा मॅटपेंट वॉल कॅलेंडर्स-२०१७ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स- २०१७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स- २०१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या | २,५०,००० नग | ३,२५,००० नग | २०,००० नग | ७००० नग | ४००० नग | १५००० नग |
| | मागील छपाई दर रु. | ६६.१५ | १५.९० | २३४.०० | २९३.०० | २७३.७० | २३८.०५ |
| | ई-निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. | | | | | | |
| ०१ | जयंत प्रिन्टरी, मुंबई | ७२.०० | २०.७० | ४५०.०० | ५५०.०० | ५५०.०० | ४५०.०० |
| ०२ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | ६३.०० | १५.८५ | ००.०० | ००.०० | ००.०० | ००.०० |
| ०३ | मनिपल टेक्नालॉजी, मनिपल कर्नाटक | ६९.४६ | १८.६५ | ११००.०० | १३२०.०० | २५००.०० | १५००.०० |
| ०४ | अदीनाथ प्रिंट, मुंबई | ८६.४५ | १८.६८ | ००.०० | ००.०० | ००.०० | ००.०० |
| ०५ | प्रिन्ट प्लस प्रा. लि., मुंबई | ७२.०० | २०.०० | ००.०० | ००.०० | ००.०० | ००.०० |
| ०६ | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि, मुंबई | ६६.५० | १८.०० | २७५.०० | ३५०.०० | **२२५.००** | ४००.०० |
| ०७ | टॅको व्हीजन प्रा.लि., मुंबई | ६८.५० | १४.८३ | **२२३.००** | **२७३.००** | ३२७.०० | **२०६.००** |
| ०८ | चेरी ऑफसेट, सोलापूर | **६२.६२** | **१४.४०** | २५६.०० | ३०१.०० | ३८५.०० | २२८.०० |

**निर्णय क्र.६८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन घेणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्तनम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना तात्काळ छपाईचा कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **समन्वय अधिकारी नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना विविध सेवा-सुविधा पुरविणेत येतात. दिवसेंदिवस शिर्डी येणा-या भक्तांची लक्षणीय वाढ तसेच सन २०१८ मध्ये साईबाबांचे समाधीला १०० वर्ष पुर्ण होत असल्याने भक्तांच्या सेवा-सुविधेसाठी विविध प्रकल्प कार्यान्वीत करणेकामी शासकीय/ निमशासकीय सेवेतील कामाचा अनुभव व शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या उमेदवाराची थेट मुलाखतीद्वारे (Walk in Interview) रु.५०,०००/- इतक्या एकत्रित मानधनावर समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.६३६ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

समन्वय अधिकारी या पदासाठी शासकीय/निमशासकीय सेवेतील कामाचा अनुभव व शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या उमेदवाराची थेट मुलाखतीद्वारे (Walk in Interview) नेमणूक करणेकामी शासकीय दराने वर्तमानपत्रात जाहिरात देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरून जनसंपर्क कार्यालयामार्फत शासकीय दराने वृत्तपत्रामध्ये तसेच संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर दि.१३/०९/२०१६ रोजी जाहीरात प्रसिध्द करुन समन्वय अधिकारी या पदाचे भरतीबाबत दि.१९/०९/२०१६ रोजी सकाळी १० वाजता थेट मुलाखतीद्वारे उमेदवाराची निवड करणेत येणार असल्याचे कळविणेत आले होते.

त्यास अनुसरून दि.१९/०९/२०१६ रोजी विविध क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण केलेले ५५ उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित होते. त्यांच्या शैक्षणिक व अनुभव प्रमाणपत्राच्या प्रती संस्थान दप्तरी जमा करुन उपस्थित उमेदवारांच्या मा.व्यवस्थापन समितीचे समोर मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत, अशी वस्तुस्थिती आहे.

वरीलप्रमाणे मुलाखती घेणेची कार्यवाही पुर्ण झालेली असून समन्वय अधिकारी म्हणून योग्य उमेदवाराची निवड करणेस तसेच त्यांना द्यावयाचे मासिक एकत्रित मानधन व इतर सेवा-सुविधा या विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आजचे सभेत समन्वय अधिकारी या पदासाठी उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. सदरहू उमेदवारांपैकी, डॉ.संजय विठ्ठल पत्तीवार, नवी मुंबई यांचा राज्य शासन व महानगरपालिका सेवेतील ३१ वर्षाचा प्रदीर्घ अनुभव तसेच सार्वजनिक रुग्णालय व आरोग्य सेवा/ परिवहन सेवा/ शहराचे घनकचरा व्यवस्थापन/ नागरी पायाभूत व मुलभूत सुविधा व त्यांचे नियोजन या सेवेतील त्यांची कामगिरी पहाता, डॉ.संजय विठ्ठल पत्तीवार, नवी मुंबई यांची दि.०१ ऑक्टोबर, २०१६ पासून संस्थानचे समन्वय अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करणेत यावी.**

**डॉ.संजय विठ्ठल पत्तीवार, नवी मुंबई यांना प्रती माह रु.५०,०००/- एकत्रित मानधनासह शासकीय नियमाप्रमाणे प्रवासखर्च देण्यात यावा. तसेच शिर्डी येथे निवास, भोजन, दर्शन/ आरती व वाहन व्यवस्था मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत**

**निर्णय क्र.६८७** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

**(१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील कलम ११ (२) नुसार व्यवस्थापन समिती सभेसाठी आठ सदस्यांची गणपुर्ती असावी, अशी तरतूद असून विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२८.०७.२०१६ रोजीचे अधिसुचनेनुसार अध्यक्ष, उपाध्यक्ष व १० सदस्यांची व्यवस्थापन समिती अस्तित्वात आणलेली आहे. काही अपरिहार्य कारणास्तव सभेसाठी सर्व सदस्यांना उपस्थित रहाणे शक्य होत नाही व त्यामुळे सभेची गणपुर्ती पुर्ण होत नाही. याकरिता अधिनियम- २००४ मध्ये दुरुस्ती करणेबाबत.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील कलम १४ पोटकलम (२) (ख) अन्वये मा.कार्यकारी अधिकारी यांना रु.२५,०००/- मात्र पर्यंतचे खर्चाचे अधिकार दिलेले आहेत. सध्या श्री साईबाबा संस्थानचा वाढता कारभार पहाता, मा.कार्यकारी अधिकारी यांना रु.१,००,०००/- मात्र पर्यंत खर्चाचे अधिकार मिळावेत, यासाठीही अधिनियम- २००४ मध्ये दुरुस्ती करणेबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

**(२)** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता निधी कसा उभारता येईल, याबाबतचा सर्वांगिन विचार करुन प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(३)** संस्थानमार्फत साईभक्तांना विक्री करण्यात येत असलेल्या लाडू प्रसादाचा खराब वास येत असलेमुळे त्यासाठी वापरण्यात येत असलेल्या गावरान तुपाच्या दर्जाबाबत शंका उपस्थित केली, त्यामुळे सध्या संस्थानला प्राप्त होणाऱ्या गावरान तुपाचे नमुने वेगवेगळया ३-४ प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविणेत यावे. तसेच संस्थानसाठी किराणा माल/ इतर साहित्य ज्या अधिकृत पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यत येते, ते पुरवठाधारक अधिकृत आहेत का, याची पडताळणी करणेत यावी व चहा, कॉफी याप्रकारचे आयटेम खरेदी करणेसाठी उत्पादक कंपन्यांना विचारणा करण्यात यावी. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**(४)** समितीचे उपाध्यक्ष श्री.चंद्रशेखर कदम तसेच समिती सदस्य सर्वश्री भाऊसाहेब वाकचौरे व सचिन तांबे यांचे दक्षता पथक तयार करणेत आले. या पथकाने संस्थानच्या वेगवेगळया ठिकाणी अचानक भेटी देऊन, तेथील कामकाजाची तपासणी करावी. तसेच या पथकास त्या ठिकाणी आवश्यकता वाटल्यास तात्काळ कारवाई करण्याचे अधिकार प्रदान करणेत आले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(५)** संस्थान रुग्णालयांमध्ये डायलेसीसची सुविधा मोफत करण्यात यावी. तसेच साथीच्या रोगाचे कालावधीमध्ये इतर रुग्णांना प्रादुर्भाव होऊ नये, याकरीता संस्थान रुग्णालयांध्ये साथीच्या रुग्णांसाठी वेगळा कक्ष तयार करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(६)** श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये साईभक्तांसाठी सोयी-सुविधा करणेसाठी जमीनींची आवश्यकता असून जे लोक संस्थानला विकत जमीन देणेस तयार असतील, त्यांची यादी बनविणेत यावी व महसुल खात्याच्या अधिकाऱ्यांसह सदरहू जमीन मालकांना अंतीम चर्चेसाठी स्थानिक उपसमिती सभेमध्ये निमंत्रीत करणेत यावे. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**(७)** श्री साईबाबा संस्थानमार्फत प्रायोगिक तत्वावर ५०० घरे असलेले ग्रामीण/ दुर्गम भागातील एक गाव दत्तक घेण्यात येऊन, त्याचा विकास करावा. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(८)** संस्थान अधिकारी/ कर्मचाऱ्यांना संगणकीय प्रशिक्षण देणेसाठी नामांकित एजन्सीची नेमणूक करणेसाठीचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(९)** संस्थानमध्ये जवळपास १६ वर्षाहून अधिक काळ कंत्राटी पध्दतीने, कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून त्यांना महाराष्ट्र शासनाचे किमान वेतन दराप्रमाणे वेतन अदा करणेत येत आहे. सध्याच्या वाढत्या महागाईचा विचार करता, सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन वाढविणेबाबत तौलानिक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**(१०)** श्री साईबाबा समाधी शताब्दीच्या पार्श्वभुमीवर दि.०४ डिसेंबर, २०१६ रोजी शिर्डी येथे ग्लोबल साई सम्मीट भरविणेत यावे, यासाठी जगभरातील साई मंदिरांचे प्रतिनिधींना बोलविणेत यावे.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**(११)** संस्थानमधील बिंदुनामावली, सेवाप्रवेश नियम इ. आस्थापनाविषयक व इतर प्रस्तावांबाबत मंत्रालयीन पातळीवर तसेच विविध वरिष्ठ प्रशासकीय कार्यालयामध्ये, ज्या अडचणी येतील, त्या सोडविणेसंदर्भात तसेच सदरहू प्रस्ताव तातडीने मंजुर होणेसंदर्भात व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांचे वेळोवेळी आवश्यकतेनुसार मार्गदर्शन व सहकार्य घेण्यात यावे.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ प्र.अधिक्षक, मागासवर्ग कक्ष)

---

वरील निर्णय क्र.६३८ ते ६८७ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर व्यवस्थापन समितीची पुढील सभा दि.०९.१०.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता शिर्डी कार्यालयात होईल, असे मा.अध्यक्ष महोदय यांनी जाहीर केले व सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (बाजीराव शिंदे) | (सुरेश हावरे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**